पुस्तकाचे नाव	:	भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या
लेखक	:	बाळकृष्ण नारायण सहस्त्रबुद्धे
प्रकाशक	:	राजवाडे संशोधन मंडळ, धुळें
प्रकाशन वर्ष	:	१९४४
मूळ ग्रंथ प्रत	:	शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथमाला

ग्रंथ १३ वा

सल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या

लेखक— श्री. बा. ना. सहस्त्रबुद्धे

१९४४

मूल्य २ रुपये

॥ श्रीविश्वनाथो विजयते ॥

श्री. दत्तोपंत पोतदार यांस लेखकाकडून सादर भेट

राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथमाला

ग्रंथ १३ वा

भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या

लेखक

श्री. बाळकृष्ण नारायण सहस्रबुद्धे-गोंदिया

प्रकाशक

राजवाडे संशोधन मंडळ, धुळें

१९४५

मूल्य २ रुपये


हें पुस्तक रा. नीलकंठ भास्कर भट, संपादक, प्रबोध, ह्यांनीं धुळें येथें
आत्माराम छापखान्यांत गल्ली नंबर २ घर नंबर १२ मध्यें छापलें
व रा. भास्कर वामन भट, चिटणीस, राजवाडे संशोधन
मंडळ, धुळें ह्यांनीं राजवाडे संशोधन मंदिर,
गल्ली नंबर १ मध्यें प्रसिद्ध केलें.

पहिले रघूजी भोंसले



मृत्यु इ. स. १७५५

भास्करराम कोल्हटकर यांचें पत्र व हस्ताक्षर



(श्रीयुत शंकर लक्ष्मण वैद्य वाईकर यांच्या कृपेनें त्यांच्या घराण्याच्या दप्तरांतील वरील पत्र मिळालें.)

वरील पत्राचें बाळबोध लिप्यंतर

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री भास्कर भट बावा स्वामी यांस सेवक भास्करराम सा। नमस्कार विनंति उपर येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे विशेष श्रीमंत राजश्री बावा साहेबास राजश्री स्वामीच्या ब॥ चिठ्या बलावणे याच्या आल्या त्या वरून दरमजल राजश्रीच्या दर्शनास फौजेनसीं सीघ्रवत् येतात आपणास कळावे म्हणोन लिहिले असे सविस्तर वर्तमान राजश्री बावानी लि॥ आहे त्यावरून निवेदन होईल बहुत काय लिहिणे हे वि॥

ग्रंथार्पण

बरोबर २०० वर्षांपूर्वी शके १६६६ वैशाख शुद्ध २ मंगळवार (ता. ३ एप्रील इ. सन १७४४) रोजीं मुर्शिदाबाद–कटवा यांच्या मध्यंतरीं गंगाकिनारीं मनकारा येथें ज्या मर्द मराठे वीरांचे प्राण मराठी साम्राज्यवाढीकरितां खर्ची पडले त्या वीरांच्या पुण्य स्मृतीस हा ग्रंथ अर्पण असो. त्या वीरांचीं नांवें एणेंप्रमाणें:–

सेनापति भास्करपंत पंडित कोल्हटकर,
अह्लीकरवाल, यशवंतराव गुजर,
निळकंठराव मोहिते, दादाजी भोंसले,
बापूजी महाडीक, शहा महमदखां, मानाजी
भोंसले, नारायण भोंसले, संभाजी भोंसले,
कृष्णराव निंबाळकर, बापूजी कदम, श्रीपतराव मेहकर,
व्यंकटराव भाऊ, दाजीबा पाटणकर, यशवंतराव
शिर्के, गोविंदराव शेळकर, सटवाजी जाधव, शिवाजी
जामदार, सुभानजीराव, नाना बक्षी, जोतीबा कारभारी !!

ग्रंथपरिचय

राजवाडे संशोधन मंडळाच्या ग्रंथप्रकाशनकार्यास प्रारंभ, शके १८५४ चैत्र शुद्ध १, दिनांक ६ एप्रिल सन १९३२ रोजीं संशोधक त्रैमासिक प्रसिद्ध करण्यास मंडळानें सुरुवात केली, तेव्हांपासून झाला. संशोधकांत प्रसिद्ध करण्यांत आलेल्या वाङ्मयाशिवाय मंडळानें कांहीं अन्य ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याचा परिपाठ ठेविला. अशा ग्रंथांपैकीं ' भाऊंच्या वीरकथा ' हा पहिला ग्रंथ कै. शंकर पुरुषोत्तम जोशी यांनीं पानिपतच्या घनघोर युद्धाविषयीं लिहिलेला प्रथम सन १९३४ सालीं प्रसिद्ध करण्यांत आला. त्यानंतर ' राजस्थान महाराष्ट्र संघर्ष ' हा जोश्यांनीं लिहिलेला दुसरा ग्रंथ मंडळानें प्रसिद्ध केला. मराठी राज्याच्या उदयानंतर त्यांच्या राजकीय सत्तेचा प्रसार जसजसा उत्तर प्रदेशांत होत गेला तसतसा उत्तर प्रदेशांतील निरनिराळ्या राजसत्ताधारी राजघराण्यांशीं मराठ्यांचा संघर्ष होऊं लागला. उत्तरेकडील माळवाप्रांत मराठ्यांनीं काबीज केल्यावर राजस्थानांतील मोंगल बादशाहांचे अंकित रजपूत राजे यांच्याशीं मराठ्यांचा संघर्ष सुरू झाला. तेव्हांपासून मराठी साम्राज्याच्या लयापावेतोंची या संघर्षाची तपशीलवार हकीकत या ग्रंथांत दिली आहे.

या ग्रंथाच्या धर्तीवर गोंदियाचे श्री. बा. ना. सहस्रबुद्धे यांनीं मराठी साम्राज्याचे एक प्रमुख सरदार नागपूरकर भोंसले यांचा बंगालप्रांताशीं जो संघर्ष झाला त्याविषयींची ऐतिहासिक माहिती या ग्रंथांत दिली आहे. हा ग्रंथ रचण्याची कल्पना ग्रंथकर्त्यास प्रथम कशी सुचली, त्यावर त्यानें कोणकोणते ग्रंथ हा इतिहास लिहिण्याकरितां वाचले, हा ग्रंथ लिहिण्याचा त्याचा उद्देश इत्यादि बाबींचा खुलासा प्रास्ताविक निवेदनांत केलाच आहे. प्रस्तुत ग्रंथापैकीं कांहीं भाग सह्याद्रि मासिक व संशोधक त्रैमासिकांत प्रसिद्ध झाला. भास्करराम व त्याचे सरदार यांची विश्वासघातानें व अकल्पितपणें जी कत्तल करण्यांत आली त्याला बरोबर शके १८६६ वैशाख शु॥ २ (ता. २४।४।४४) रोजीं २०० वर्षे झालीं. त्यावरून हा ग्रंथ त्या घटनेच्या स्मरणार्थ त्याच तारखेस प्रसिद्ध करावा अशी कल्पना ग्रंथकर्त्यांचे मनांत आली व त्यानें पूर्वी प्रसिद्ध झालेल्या सर्व लेखांचे आधारें या घटनांचा सुसंगत इतिहास तयार करून प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. परंतु महायुद्धजन्य परिस्थितीमुळें ग्रंथ प्रकाशनास लागणारा जरूर तो कागद त्यास मिळणें दुर्घट झालें. अखेर राजवाडे मंडळास या ग्रंथाच्या छपाईस लागणारा कागद मिळाला. हा ग्रंथ मंडळाचें प्रकाशन म्हणून प्रसिद्ध व्हावा अशी इच्छा ग्रंथकर्त्यानें आमच्याशीं त्यांच्या असलेल्या स्नेहसंबंधामुळें प्रदर्शित केली व तदनुसार हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा सुयोग आला आहे. हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यानें एका स्नेह्याची सदिच्छा तृप्त झाली इतकेंच नव्हे, परंतु राजवाडे संशोधन मंडळाच्या हेतूंत अंतर्भूत होणारें इतिहासरचनेचें कार्य या ग्रंथाच्या प्रसिद्धीनें साध्य झालें

आहे. मराठ्यांच्या व बंगाल प्रांतांतील लोकांच्या संबंधाची स्वतंत्रपणें तपशीलवार ऐतिहासिक माहिती देणारा ग्रंथ मराठी ऐतिहासिक वाङ्मयांत आजपावेतों प्रसिद्ध झाला नाहीं. या दृष्टीनें या ग्रंथाच्या प्रसिद्धीनें मराठी ऐतिहासिक वाङ्मयांत एका चांगल्या ग्रंथाची भर पडली गेली आहे असें आम्हांस वाटतें. महाराष्ट्र-इतिहासप्रेमी जनतेस या ग्रंथाचा हा अल्पपरिचय करून देऊन तो तिजला सादर करितों.

भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्यांमधील पहिले रघूजी भोंसले व सेनापति भास्करराम कोल्हटकर यांच्या हालचालींचा कालानुक्रम पुस्तकाच्या शेवटीं दिला आहे.

भा. वा. भट
चिटणीस रा. सं. मंडळ धुळें.

अनुक्रमणिका

		पृष्ठ
भाग १ ला – प्रास्ताविक निवेदन	....	१
,, २ रा – ऐतिहासिक पार्श्वभूमि	....	३
,, ३ रा – स्वाऱ्यांचा उपक्रम व भास्कररामचें चरित्र		३१
,, ४ था – मराठ्यांनीं केलेली अलीवर्दीखानाची दुर्दशा		४१
,, ५ वा – भास्करपंत दक्षिण बंगाल काबीज करितो		५०
,, ६ वा – बाळाजी बाजीराव व अलीवर्दीखान यांची अभूतपूर्व भेट ...	....	५९
,, ७ वा – भास्करपंताची बंगालवर फिरून स्वारी व त्याचा खून	....	६३
,, ८ वा – रघूजी ओढिसा व दक्षिण बंगाल घेतो		७०
,, ९ वा – अफगाण अलीवर्दीवर सूड उगवितात		८२
,, १० वा – मराठे पुरून उरतात	....	८९
,, ११ वा – चौथाईच्या युद्धाचा आढावा	....	१००
कालानुक्रमणिका	....	१०१

भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या

(१)

प्रास्ताविक निवेदन

बंगालमध्यें खरगपूर येथें रेल्वेस्टोअरमध्यें सन १९०४ ते १९४० पर्यंत कामावर असतांना बंगाली व ओढिया बाबू लोकांत मिसळून राहण्याचा मला योग आला. त्यामुळें बंगाली व ओढिया लोकांच्या मनामध्यें ऐतिहासिक मराठ्यांबद्दल एक प्रकारचा द्वेषभाव रुजून गेलेला दिसे. आम्हां मराठी मंडळीशीं गप्पागोष्टी करतांना थट्टेनें ते आम्हां लोकांना ' बरगी ' म्हणून संबोधीत व म्हणत कीं, " पूर्वी तुम्ही बरगी लोकांनीं आमच्या देशांत शिरून आमच्या लोकांवर जुलूम-अत्याचार करून लुटलेंत व आतांही आमच्या देशांत नोकरी-निमित्तानें येऊन लुटीत आहांत. " प्रथम प्रथम हें " बरगी " प्रकरण काय आहे हें आम्हांस माहीत नसल्यानें कांहींतरी उत्तरें देऊन आम्ही वेळ मारून नेत असूं. पुढें बरगी रेडस् ऑन बेंगाल यासारखे लेख वर्तमानपत्रांतून किंवा मासिकांतून येत. शिवाय " बंगेबरगी " नाटकाचेहि प्रयोग पाहण्यांत आले. त्यामुळें आमचें लक्ष या ' बरगी ' प्रकरणाकडे वेधलें व त्यासंबंधीं ऐतिहासिक माहिती वाचूं लागलों. पुढें सन १९२९ सालीं डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर एम्. ए. पी. एच्. डी. यांनीं बरगी लोकांच्या अत्याचारांचें वर्णन असलेल्या गंगाराम भाटानें बंगाली भाषेंत कवनात्मक लिहिलेल्या एका " महाराष्ट्र पुराण " चोपडीवर एक लेख, कलकत्त्यास निघणाऱ्या ' बृहन्महाराष्ट्र ' या वार्षिकांत लिहिला. तेव्हां " महाराष्ट्र पुराणांतील " अतिशयोक्तीचीं विधानें खोडून टाकण्याकरितां व मराठ्यांची बाजू मांडण्याकरितां ज्या पद्धतीनें बंगाली व ओढिया मित्रमंडळीशीं आम्ही वादविवाद करीत असूं, त्याच पद्धतीनें आम्हीं " बरगी म्हणजे कोण ? ", " मराठ्यांची ओरिसा देशांतील कामगिरी ", त्यास आणखी " पुरावा ", " विष्णूपूरचें राज्य मराठ्यांनीं बुडविल्याचा आरोप ", " ओढिसांतील अवशिष्ट ऐतिहासिक मराठी घराणीं ", " बंगाली रंगभूमीवर ऐतिहासिक सत्यांचे खून " अशा लेखांची एक लहान लेखमाला कलकत्त्यांतील " बृहन्महाराष्ट्र वार्षिक व बृहन्महाराष्ट्र " मासिकांत चालू केली होती. परंतु शेवटचा लेख आम्हीं पाठविला त्या सुमारास बृहन्महाराष्ट्र मासिक बंद पडलें व दिल्लीस " महाराष्ट्रविस्तार " सुरू होण्यापूर्वी जबलपुरास " महाराष्ट्रवृत्ताच्या " दुसऱ्या वृत्तांत शेवटचा लेख कसाबसा अर्धवट छापला. तोहि पुढें पूर्ण छापला नाहीं अगर महाराष्ट्र विस्ताराकडेही पाठविला नाहीं. शेवटचा " बंगाली रंगभूमीवर ऐतिहासिक सत्यांचे खून " हा लेख सोडून बाकीचे लेखांत, बंगाल-ओढिसांत चौथाईनिमित्त शिरलेल्या मराठ्यांनीं

केले म्हटलेले अत्याचार, लूट इत्यादि आरोपांचें खंडण करण्याच्या हेतूनें, तिकडील नबाब अधिकारी यांनीं केलेल्या अत्याचारांची माहिती देऊन तुलनात्मक दृष्टीनें जास्त अत्याचारी कोण, हें दाखविण्याचा प्रयत्न त्यामधून केला होता. त्यांत " बंगेबरगी " या बंगाली नाटकाचा व " लछमा " या ओढिया भाषेंतील प्रसिद्ध ऐतिहासिक कादंबरीचा उल्लेख केला होता. त्यामुळें ऐतिहासिक गोष्टींची सत्यासत्यतेची चर्चा चालू असतां नाटकें अगर कादंबऱ्यांचा उल्लेख केल्याबद्दल वृत्तपत्रांत आमच्यावर टीकेचा भडिमार झाला. आम्हीही त्या टीकांना उत्तरें देऊन, आमचे लेख लिहिण्याचा हेतु स्पष्ट केला.

" सह्याद्रि " मासिकाच्या ' पराक्रमी महाराष्ट्र ' या विशेषांकाकरितां लेख पाठविण्याविषयीं संपादकांनीं विचारल्यावरून ' बरद्वान ते कटवा ' हा लेख बंगालकडील प्रसिद्ध इतिहासकार सय्यद गुलाम हुसेनखान याच्या " शेरे मुताखरीन " या इतिहासाधारें (अर्थात् भाषांतराधारें) लिहून पाठविला. तो जून १९३९ च्या " सह्याद्रि " अंकांत प्रसिद्ध झाला. वरील इतिहासलेखक नबाब अलीवर्दीखानाकडे सरदार होता व नबाबाच्या मराठ्यांशीं झालेल्या कांहीं लढायांतून तो प्रत्यक्ष हजर होता, म्हणून त्याच्या वरील इतिहासग्रंथास महत्त्व आहे.

भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्यांची सुरुवात वरील बरद्वानच्या वेढ्यापासून होते. तेव्हां, या स्वाऱ्या होण्यापूर्वींच्या नबाबी राजवटीचा थोडा बंगालकडील इतिहास व भोंसल्यांचा व नबाबाचा तह होईपर्यंत (१७४२–१७५१) चालू असलेल्या स्वाऱ्यांची हकीगत धुळें येथील राजवाडे सं. मंडळामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या संशोधकाच्या संपादकांच्या कृपेनें त्या त्रैमासिकांत " भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या " या मथळ्याखालीं छापून निघाली.

इतिहासकार कितीही निःपक्षपाती असला तरी त्याच्या लिखाणांत डावी उजवी बाजू दिसते. वरील " शेरे मुताखरीन " च्या लेखकानें बंगालकडील नबाबांना जरी बहुतेक उचलून धरलें असलें तरी त्यांची हकीगत लिहीत असतां त्यांच्या खाजगी वर्तणुकीवर, त्यांच्या राज्यकारभारावर, त्यांच्या राजनीतीवर, प्रसंगीं स्पष्ट कोरडे त्यानें ओढले आहेत. मराठ्यांची बाजू मांडतांना लेखकाच्या वरीलसारख्या स्पष्टोक्तीचा आम्हांस चांगला आधार झाला.

भोंसल्यांचा सेनापति भास्करपंत कोल्हटकर यानें बंगाल्यांत जाऊन नबाब अलीवर्दीखानाशीं सामने देऊन, लढाया देऊन त्यास तह करण्यास भाग पाडलें. त्या भास्करपंताचा व त्याच्या २१ सरदारांचे खून विश्वासघातानें, नबाबानें त्यांना आपल्या तंबूंत तहाच्या मिषानें बोलावून अत्यंत निर्दयपणानें केले (वैशाख शुद्ध २ शके १६६६ इ. स. १७४४); त्या गोष्टीस गेल्या वैशाखांत २०० वर्षें झालीं ! मराठ्यांच्या एका सरसेनापतीसह २१ सरदारांचे खून एका नबाबानें

विश्वासघातानें केले असतां मराठी इतिहासांतून या गोष्टीला महत्त्व दिलें नाहीं हें आश्चर्य आहे ! वास्तविक पाहतां येवढ्या मोठ्या महत्त्वाच्या मराठी इतिहासांतील घटनेबद्दल ज्या मनकारा गांवीं गंगातटाकीं, नबाब अलीवर्दीखानानें हें विश्वासघातकी कृत्य पार पाडलें, त्या गांवीं (हा गांव मूर्शीदाबाद–कटवा यांच्या मध्यंतरीं आहे) वरील सर्व शूर मराठ्यांचें कांहींतरी स्मारकच व्हावयास पाहिजे होतें, परंतु तें अद्याप झालें नसलें तरी त्या सेनापती भास्करपंताचें व त्याच्या त्या २१ सरदारांचें द्विशतसांवत्सरिक श्राद्ध "भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्यांच्या" मराठी प्रकाशनानें व्हावें, असें, ते लेख एकत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचें विशेष कारण आहे.

या स्वाऱ्यांसंबंधींचा पहिला लेख "बरद्वान–कटवा" लिहिण्यास कारण "सह्याद्रि" मासिकाच्या म्यानेजरांचें पत्र. त्यामुळें त्यांचे आभार मानले पाहिजेत. भोंसल्यांच्या स्वाऱ्यांची हकीगत लिहा, "राजवाडे संशोधक" मध्यें छापूं अशा प्रकारें श्रीयुत भास्कर वामन ऊर्फ तात्यासाहेब भटांनीं उत्तेजन दिलें म्हणूनच ते लेख मीं लिहिले व संस्थेच्या पुरस्काराखालीं तेच आतां पुस्तकरूपानें छापून प्रकाशित करण्याचेंही त्यांनीं अंगावर घेतलें आहे याबद्दल मी त्यांचा ऋणीच राहीन. त्याचप्रमाणें या पुस्तकांत भास्कररामच्या पत्राचें छायाचित्र श्रीयुत शंकर लक्ष्मण वैद्य यांच्या कृपेनें आम्हांस मिळालें याबद्दल त्यांचाही आभारी आहें.

ता. ३० मार्च सन १९४४ **बा. ना. सहस्रबुद्धे, वांईकर**

गोंदिया (सी. पी.)

(२)

ऐतिहासिक पार्श्वभूमि

अकबर बादशाहानें सर्व धर्मांच्या प्रजाजनांना समानतेनें वागविण्याचा डाव मांडून, परधर्मसहिष्णुता दाखवून, हिंदू, रजपूत राजेमहाराजांना निरनिराळीं आमिषें दाखवून, त्यांना मोठमोठ्या अधिकाराच्या जागा व पदव्या देऊन, केलें काय, तर बहुतेक त्यांच्याच हातून मोंगल साम्राज्याचीच वाढ करविली. त्यांत अडथळा आणणारा राणा प्रतापसारखा एखादा कट्टर राजा सोडला तर बहुतेक सर्व हिंदू राजेमहाराजांनीं अकबरापुढें नमतें घेतलें. ह्या वेळपर्यंत या मोंगली राजसत्तेची वाढ पूर्वेस ढाकाबंगाल व कटकजगन्नाथपुरीपर्यंत पूर्वसमुद्रापर्यंत गेली होती. यानंतर शहाजहान बादशाहापर्यंत वरील राजनीतीच्याच धोरणावर ही मोंगली साम्राज्यवाढ गुजराथ, खानदेश, अहमदनगर, औरंगाबादेपर्यंत होत आली होती.

यापुढें औरंगजेब बादशहानें मागील बादशहांची सर्व धर्मीयांना समानतेनें वागविण्याची राजनीति धुत्कारून, प्रत्यक्ष आपल्या बापास अटक करून, भावांचा निकाल लावून, स्वतः बादशहा बनून, हातीं आलेल्या साम्राज्यसत्तेच्या मदानें, साम्राज्यांतील लाखों सैनिकांच्या बळावर परधर्माचा व विशेषतः परधर्मीय राजसत्तेचा नायनाट करण्याचा चंग बांधून त्या दृष्टीनें, साम्राज्याची वाढ करण्याचें कार्य जोरांत चालू ठेविलें. दक्षिणेंतील हिंदू राज्यें व विजापूर गोवळकोंड्यासारखीं मुसलमानी राज्येंही साम्राज्यांत मिळविण्याकरितां त्यानें रजपूत व मुसलमान सेनानी दक्षिणेंत पाठविले. विजापूरगोवळकोंड्याचे सुलतान आपापल्यापरी त्याला विरोध करीतच होते, परंतु औरंगजेब बादशहाच्या या मुसलमानी साम्राज्यवाढीस जर कोणीं जबरदस्त धक्का दिला असला तर तो छत्रपति शिवाजी महाराजांनीं नुकत्याच स्थापन केलेल्या उदयोन्मुख मराठी राष्ट्रानें दिला ! मुसलमान व हिंदू सेनानी आले व गेले व मराठ्यांना नामशेष करण्याचे सर्व सव्यापसव्य उपाय करून संपले, परंतु हें चिमुकलें चिवट मराठी राष्ट्र ते नामशेष करूं शकले नाहींत. असें पाहून व हें हिंदू राज्य आहे, हा कांटा समूळ उपटून टाकलाच पाहिजे, प्रसंगीं मराठे व विजापूरगोवळकोंड्याचे सुलतान संगनमतानेंही विरोध करतात, शिवाय विजापूर-गोवळकोंड्यांचीं राज्यें हीं शियापंथी असल्यानें तींही नामशेष करून कायमचीं साम्राज्यांत विलीन करण्याच्या इराद्यानें औरंगजेब बादशहा स्वतः बरोबर ४।५ लाख फौज घेऊन दक्षिणेंत आला (ता. २२ मार्च १६८२). त्याचा स्वभाव अत्यंत संशयी होता. प्रत्यक्ष आपल्या सेनापतीवरही त्याचा विश्वास नसे. निरनिराळ्या सेनापतींवर प्रत्यक्ष लक्ष ठेवतां यावें म्हणून तो स्वतः दक्षिणेंत हजर होता.

स्वतःस हिंदुस्थानचा शहानशहा बादशहा म्हणवून घेणारा हा मोंगल सम्राट् औरंगजेब, पण स्वतःची राजधानी सोडून त्यानें आपल्या आयुष्याचीं २ नव्हे, ४ नव्हे, सतत २५।२६ वर्षें या साम्राज्य तृष्णेपायीं हजारबाराशें मैल दूर परदेशीं दक्षिणेंत घालविलीं ! विजापूरगोवळकोंडाही पडला व साम्राज्यांत मिळून गेला, परंतु एवढेंसें तें नवोदित मराठी राज्य त्यास कायमचें साम्राज्यांत मिळवितां आलें नाहीं ! बादशहा स्वतः राजधानी सोडून सारखा वर्षानुवर्षें दक्षिणेंत फिरत राहिल्यानें व शेवटीं तो वृद्ध झाल्यानें दरबारी वजीर अधिकारी व दक्षिणेपासून दूर दूरचे सुभेदार नबाब यांच्यावर पूर्वी इतका करडा वचक राहिला नाहीं. बादशहा अत्यंत संशयी असल्यानें आपण आपल्या बापास अटकेंत ठेऊन जसा राज्यकारभार हातीं घेतला त्याप्रमाणें आपलीं मुलेंही तोच प्रयोग आपल्यावर करतील म्हणून कांहींना कांहीं कारणानें अगर त्यांना कोणच्यातरी मोहिमेवर अगर सुभेदारीवर तो आपल्यापासून दूर ठेवी.

औरंगजेब बादशहाच्या मुसलमानी राज्यतृष्णेचा परिणाम

औरंगजेब बादशहानें या मुसलमानी राज्यतृष्णेपायीं खुनशीपणानें व क्रूरपणानें छत्रपति संभाजी महाराजांना ठार मारलें! महाराणी येसूबाई व राजपुत्र शाहू यांना अटकेंत ठेवलें. किल्ल्यामागून किल्ले सर करून सर्व महाराष्ट्र काबीज केला! आतांतरी मराठे आपल्या कबजांत राहतील असें बादशहास वाटलें, परंतु त्याच्या अगदीं उलट घडलें! बादशाही सामर्थ्याखालीं मराठे प्रथम दबल्यासारखे भासले परंतु संभाजी महाराजांच्या म्हणजे प्रत्यक्ष त्यांच्या राजाच्याच खुनामुळें ते मनांतून अतिशय चवताळले होते. समोरासमोर लढाई देऊन बादशाही सैन्यसामर्थ्यापुढें टिकाव लागणें शक्य नाहीं असें पाहून राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखालीं गनिमी काव्याच्या लढाईचा अवलंब करून मराठ्यांनीं औरंगजेबी मुसलमानी साम्राज्यसत्तेशीं लढा चालू ठेवला. पुढें ओढवणाऱ्या महान् संकटाची स्पष्ट कल्पना छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या चाणाक्ष व धूर्त राजाच्या निरीक्षणांतून सुटणें शक्य नव्हतें. आज नाहीं उद्यां औरंगजेबाच्या मोंगली सैन्याचा लोंढा महाराष्ट्रावर येणार हें नक्की हेरून अशा प्रसंगीं आपल्या बचावाची पिछेहाट करतां यावी म्हणून दक्षिणकर्नाटकांत, तंजावरकडे कांहीं मजबूत ठाणीं त्यांनीं तेव्हांच आपल्या कबजांत आणून ठेवलीं होतीं. त्याचा फायदा प्रसंग आला तेव्हां राजाराम महाराजांना घेतां आला. त्यांनीं महाराष्ट्राचाहि त्याग करून तंजावरजवळील जिंजीच्या मजबूत किल्ल्याचा आश्रय केला व तेथूनच महाराष्ट्राच्या राज्यांतील राज्यकारभाराचीं सूत्रें हलविलीं. त्यामुळें बादशहास त्याचें एवढें मोठें प्रचंड सैन्य पण तें बऱ्हाणपूरपासून तों थेट तंजावरच्याही खालींपर्यंत पसरावें लागलें! रामचंद्रपंतानें खुद्द महाराष्ट्रांत राहून व धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे या दुकलीनें त्या पांगलेल्या मोंगली सैन्यावर अलग अलग गनिमी काव्याचे छापे व हल्ले करून मोंगली सैन्यास व प्रत्यक्ष औरंगजेब बादशहासही दे माय धरणीं ठाय करून सोडलें! राजाराम महाराजांनीं एक नव्हे दोन नव्हे तर ७ वर्षें जिंजी लढविली! अशा आपत्प्रसंगीं मोंगलांकडून परत मिळविलेला गांव अगर परगणा परत मिळविणाऱ्याच्याच ताब्यांत देण्याची प्रथा सुरू होऊन पुढें कायमचीच चालू राहिलेली प्रसिद्ध " सरंजामी " पद्धत निर्माण झाली. राजाराम महाराज परत सुखरूप महाराष्ट्रांत आले व मोंगलांनीं घेतलेला मराठ्यांचा कांहीं मुलूख राजाराम महाराजांच्या डोळ्यांदेखत परत मराठी अमलाखालीं आला. राजाराम महाराजांनंतर राणी ताराबाईनेंही मोंगलांचा प्रतिकार मोठ्या धैर्यानें केला. इतकेंच नव्हे तर उलट मराठेच मोंगली अमलांतील प्रांतांत घुसून धुमाकूळ घालून त्यांचेच लचके तोडूं लागले! सतत २५ वर्षें साम्राज्यांतील संपूर्ण द्रव्यबळ व सैन्यबळ एकवटून, खुद्द जातीनें हजर राहून मराठ्यांसारखें येवढेंसें नवीन राज्य

आपणांस नामशेष करतां आलें नाहीं, ही गोष्ट औरंगजेब बादशहाच्या मनांत प्रामुख्यानें, तो मरेपर्यंत डांचत होती व ही गोष्ट तो बोलूनही दाखवी. ज्या बादशाही सिंहासनाकरितां प्रत्यक्ष आपल्या बापास अटकेंत ठेवलें, भावांची व त्यांच्या मुलांची विल्हेवाट लावली, त्या प्रख्यात " मयूर सिंहासनावर " फिरून साम्राज्याच्या त्या राजधानींत परत जाऊन बसण्याचा त्यास योगच नव्हता ! व या हतभागी औरंगजेब बादशहाचे मुसलमानी साम्राज्याचे मांडे मनांतल्या मनांतच राहून हायहाय करीतच दक्षिणेंत अहमदनगर येथें त्यास प्राण सोडावा लागला !

औरंगजेब बादशाहा इ. स. १७०७ मध्यें वारल्यावर त्याच्यासंनिध असलेला त्याचा मुलगा आजिमशाहा याच्या कानावर दिल्लीचें तक्त हस्तगत करण्याकरितां त्याचा भाऊ मुअज्जम हा काबूलाहून चाल करून येत असल्याच्या बातम्या आल्या. यामुळें आजिमशाहा व त्याचा मुख्य सेनापती झुलफिकारखान यांनीं सैन्यासह दिल्लीकडे तांतडीनें कूच केलें. त्यांनीं त्यांचे कैदेंत असलेल्या शाहू छत्रपतीस बरोबर घेतलें. बऱ्हाणपूरच्या तळावर शाहूस त्यांनीं बंधमुक्त करून दक्षिणेंत जाण्याची परवानगी दिली. शाहूची मुक्तता करण्यापूर्वी आजिमशाहा व शाहू यांचे दरम्यान खालीं नमूद केलेला करार ठरला:—

बादशहा व शाहू महाराज यांजमधील करार

" तुम्ही जाऊन आपल्या राज्याचा बंदोबस्त करून बखेडे करणार यांचा बंदोबस्त करावा. पादशाई लक्षांत वागवून पादशाई मुलकास उपद्रव होऊं नये. तुम्ही याप्रमाणें निखालस वागतां अशी खातरजमा जाली म्हणजे दिल्लीस जाऊन तेथील बंदोबस्त जाला, आणि आम्ही तखतंनशीन[1] जालों, म्हणजे तुमचे कबिले लावून देऊं; तुम्हांस सरदेशमुखीचें वेतन साहा सुभ्यांत चालतें त्याचे फर्मान[2] व चौथाई सहा सुभ्यांचा अंमल चालत आहे त्याचे फर्मान व वतन घाट व बाला घाट घाटावरील महाल विजापूर, दौलताबादेचे पादशाहींत महाल भीमा, गंगा[3] यांचे हद्दीचे निमेचे तहानीं चालावेत. दरोबस्त फर्मान करून देऊन पादशाई अंमलाचीं ठाणीं, किल्ले, कोटसुद्धां दरोबस्त तुम्हांस बक्षीस फर्मान करून देऊं. तूर्त सुभ्यांस वगैरे पत्रें ' यांचे राज्य, हे बंदोबस्त करतील ' ऐशीं घेऊन जावें. कर्नाटक, गोंडवण, गुजराथ, चंदावर[4]चें राज्य तुम्हांकडे, जे अंमल चालत आहेत ते तुमचे तुम्हांकडे चालावे. तुम्ही जे समयीं पादशाईस प्रसंग पडेल, तेव्हां फौज घेऊन कुमक करावी. हुकूम मानावा. " (थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र पृ. ७, का. ना. साने शके १८१५ ची आवृत्ति).

---

१ सिंहासनाधिरूढ. २ ' फर्मानं राजपत्रकम् ' राजव्यवहार कोश. ३ गोदावरी. ४ तंजावर.

मराठ्यांत फूट पाडून व त्यांना कमजोर करून मग त्यांचा निकाल करण्याच्या इरायानें शाहू महाराजांची सुटका करण्याचा झुलफिकारखानाचा डाव होता व त्याच्या अपेक्षेप्रमाणें, राणी ताराबाईकडून शाहू महाराजांना अडथळा झाला, परंतु परसोजी भोंसला, हैबतराव निंबाळकर, धनाजी जाधव व बाळाजी विश्वनाथ यांसारख्यांनीं शाहूमहाराजांचा पक्ष स्वीकारला व राज्याभिषेक होऊन शाहू-महाराजांनीं आपली गादी सातार्‍यास कायम केली.

मराठे चौथाईचे हक्क मिळवितात

औरंगजेब बादशहानंतर मोंगली साम्राज्याची वाढ एकसूत्रीपणानें होण्याचें बाजूसच राहून बादशाही तक्ताकरितां औरंगजेबाच्या मुलांनातवांतच लाथाळी सुरू झाली, व हे तक्ताकरितां आपापसांत भांडणारे वारसदार, ज्याजवळ सैन्यबळ असेल त्याची मदत मागूं लागले. ५।६ वर्षांच्या आंत ३।४ बादशहा आले व गेले. बहादूरशहानें एकदां शाहूमहाराजांची मदत मागितली व ती त्यांनीं दिली. औरंगजेबानंतरचे बादशहा म्हणजे ख्यालीखुशालींत, जनानखान्यांत, भोगविलसांत काळ कंठणारेच निघाले. त्यामुळें वजिरांचें प्रस्थ माजून बादशहा व वजीर यांच्यांतच भांडणें चालू असत व योगायोग असा कीं, शाहूमहाराजांना सोडल्यावर मराठे आपापसांत भांडून दोन्ही पक्ष निर्बल होऊन मोंगली अंमल महाराष्ट्रांत कायमचा राहील, हा जो दिल्लींतील मुत्सद्द्यांचा डाव होता तो सपशेल फसून तो डाव त्यांच्यावरच उलटला व दक्षिणचा सुभेदार हुसेनअल्ली व अबदुल्लाखान वजीर या सय्यद बंधूंनीं फरुकशीर बादशहाचें व त्यांचें पटेना, तेव्हां मराठ्यांची मदत मागितली व ती शाहू महाराजांनीं दिली, व या प्रसंगाचा फायदा घेऊन बाळाजी विश्वनाथ याच्या मुत्सद्देगिरीमुळें महाराणी येसूबाईसाहेबांची मुक्तता होऊन दक्षिणेंतील ६ सुभ्यांत चौथाई व सरदेशमुखीचे हक्क वरील करारान्वयें नवीन बादशाही रफिउद्दरजातचे हस्तें शाहू महाराजांना मिळाले.

या चौथाईनेंच पुढें जवळजवळ एक शतक सर्व हिंदुस्थानांत या चिमुकल्या मराठी राज्याचें साम्राज्यांत रूपांतर झालें. मराठी राज्याची हद्द उत्तरेस यमुना नदी, दक्षिणेस कर्नाटक, पश्चिमेस गुजराथ व पूर्वेस जगन्नाथपुरीपर्यंत वाढली. ज्या ज्या प्रांतांत मराठे चौथाईकरितां जात तेथें चौथाई वसुलीकरितां जुलूम जबरदस्ती करीत असा सर्वत्र बभ्रा आहे, परंतु तसें पाहिलें तर पैसे वसुली-करितां जुलूमजबरदस्ती करीत नव्हते कोण ? बादशहा नवाबसुभेदारां-कडून; नवाब, सुभेदार, राजे जमीनदारांकडून; व राजे जमीनदार रयत-शेतकर्‍यांकडून; निरनिराळे कर, महसूल खंडणीचा इत्यादींचा वसूल जोर जुलूम जबरदस्ती करूनच वसूल करीत असत. मग मराठ्यांनींही तें

थोडें फार केलें तर त्यांत जगाविरहित काय झालें ? इतर प्रांतांपेक्षां मराठ्यांनीं बंगाल्यांत जास्त जुलूम अत्याचार केले असे आरोप आहेत. हे आरोप बंगाली भाषेंतील गंगाराम भाटानें लिहिलेल्या "महाराष्ट्र" पुराणांत व तत्कालीन इतिहासकारांनीं फार अतिशयोक्तीनें लिहून ठेवल्यामुळें, त्यांचीच री अलीकडील इतिहासकारांनीं ओढली आहे. परंतु बंगालचा नबाब अलीवर्दीखान भोंसल्यांचा चौथाईचा हक्कच मानीना म्हणून नबाब व भोंसले यांजमध्यें प्रत्यक्ष लढाईच सुरू झाली व मराठ्यांकडून जर अत्याचार झाले असले तर ते चौथाई वसुलीकरितां नसून लढाई चालू असतां एका पक्षानें दुसऱ्या पक्षाची लूटफाट व जसे अत्याचार चालतात त्या सदराखालीं ते अत्याचार खरेच केले असल्यास येतील.*

औरंगजेब बादशहानें काय केलें ?

मराठ्यांनीं मिळविलेल्या चौथाई–सनदेंत दक्षिणेंतील ६ सुभ्यांचा नामनिर्देश होता, परंतु जसजशी बादशहा, वजीर अगर सुभेदार हे मराठ्यांची मदत स्वतःच्या कमजोरीमुळें मागत अगर मराठ्यांशीं कांहीं कुरापत काढून लढाई देत व हरत, तसतसे मराठे प्रबळ होऊन त्यांची सत्ता उत्तर हिंदुस्थानांत पसरत चालली, व त्यामुळें, चौथाई वसूल करण्याच्या प्रदेशाची मर्यादा वाढत गेली, असें दिसतें. नानासाहेब पेशवे बिहारपाटण्यापर्यंत चौथाई वसूल करीत असत परंतु रघूजी भोंसल्यानें भास्करपंत कोल्हटकरास बंगालकडे चौथाई वसूल करण्यास पाठविलें, तेव्हां अलीवर्दीखानानें त्यास धुडकावून लावलें. बंगाल व बिहार हे दोन्ही सुभे चौथाई करारांत येत नव्हते व दोन्ही सुभ्यांवरील नबाब अलीवर्दीखान हा एकच मुख्य अधिकारी असतां तो रघूजींच्या सेनापतीस अडथळा करतो व नानासाहेबांस पाटणा, मोंगीर, भागलपूरपर्यंत खुशाल खंडणी व चौथाई वसूल करूं देतो ! याचा अर्थ इतकाच कीं, नानासाहेब पेशवे, नबाब अलीवर्दीखानापेक्षां वरचढ व जबरदस्त होते. ' बळी तो कान पिळी ! औरंगजेब बादशहा जो दक्षिणेंत व महाराष्ट्रांत २५ वर्षें तळ देऊन बसला होता, त्याला कोणीं दक्षिणची सनद अगर परवाना का दिला होता ? अगर आमच्या देशांत ४।५ लाख फौज घेऊन येरे बाबा म्हणून कोणीं पाचारण का केलें होतें ? त्याच्या हातीं सर्व मोंगली साम्राज्याची सत्ता व शक्ति होती. १०।१५ लाख फौज

---

* विद्यमानकाळीं प्रागतिक समजलीं जाणारीं पाश्चात्य राष्ट्रें आक्रमण केलेल्या शत्रुप्रदेशांतील प्रजेवर कोणच्या प्रकारें अत्याचार करतात या हकीगती सध्यां आपल्या कानावर येतात. त्या लक्षांत घेतां २०० वर्षांपूर्वी मराठ्यांनीं केलेल्या अशाच कृत्यांबद्दल त्यांचेविरुद्ध गिल्ला करून टीका करणें न्यायाचें होणार नाहीं.

होती, दुसऱ्यांचीं राज्यें मोंगली साम्राज्यांत, जबरदस्तीनें मिळवून नामशेष करण्याच्या उद्देशानें व त्याबरोबरच मुसलमानी धर्माचा व विशेषतः सुनी पंथाचा फैलाव करण्याच्या उद्देशानें तो आला होता, (औरंगजेब सुनीपंथाचा होता व विजापूर, गोवळकोंड्यांचे सुलतान शिया पंथी होते). जबरदस्तीपेक्षां त्याला दुसरा कसलाहि परवाना नव्हता ! तेव्हां चौथाईसनदेंत बंगालचा नामनिर्देश नसतांना रघूजीनें भास्करपंतास बंगालवर चौथाई वसूल करण्यास कसा व कां पाठविला हा प्रश्नच उरत नाहीं. औरंगजेबाचीं साम्राज्यतृष्णेचीं सुखस्वप्नें त्याच्या डोळ्यांदेखतच, मराठी लढवय्या व मुत्सद्दी तरुणांनीं खोटीं पाडलीं होतीं. शिवाजी महाराजांची राज्यस्थापना व त्याची वाढ म्हणजे, जाधव व विजयनगरचें हिंदू राज्य नष्ट करण्यास कारण झालेल्या मुसलमानी सुलतानशाह्या व त्यांनाहि नष्ट करून नवीन फोंफावत येणाऱ्या मोंगली साम्राज्यसत्तेविरुद्ध ती प्रतिक्रिया होती व मराठ्यांची " चौथाई " म्हणजे मोंगली सत्तेचा ऱ्हास व मराठ्यांचा उत्कर्ष हें स्पष्ट होतें.

सर्व एकाच माळेंतील राजकीय डाव !

चौथाई म्हणजे प्रांताच्या वसुलाच्या चतुर्थांश रकमेंत त्या त्या प्रांतांत बादशहाला, सुभेदाराला प्रसंगीं मदत करतां यावी म्हणून ठराविक फौज जय्यत तयार ठेवण्याचा करार होय. बाळाजी विश्वनाथानें ज्या दिवशीं ही सनद दिल्ली दरबारांत मिळविली त्याच दिवशीं मोंगली साम्राज्यसत्तेस दुसरा जबरदस्त धक्का बसला. त्याबरोबरच मुसलमानी धर्मप्रसारालाहि आळा बसला. " चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः " या म्हणीप्रमाणें चौथाई हक्क मिळाल्याबरोबर मुसलमानी सैन्य मराठी राज्यांत येण्याचें बंद पडून उलट मोंगली अमलांतील प्रांतांतून मराठी फौजांचीं ठाणीं जिकडे तिकडे बसलीं.

ही चौथाईची सनद काय ? किंवा रघूजीनें बंगालवर स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करून सरतेशेवटीं सैन्यखर्चाच्या बाकींत ओढिसांत कायमचेंच ठाणें बसवून सर्व सत्ता हातीं घेणें काय ? अगर ईस्टइंडिया कंपनीनें पुढील काळांत हिंदुस्थानांतील राजांच्या बोकांडीं बसविलेले " तैनाती " फौजांचे करार काय ? सर्व एकाच माळेंतील येणारे राज्यविस्तार करण्याच्या मार्गांतील प्राथमिक राजकीय डाव होत.

जास्त अत्याचारी कोण, मराठे कीं मोंगल ?

वरील विवेचनावरून थेट बादशहापासून खालपर्यंत प्रत्येक जण आपआपल्या परी स्वतःचें वर्चस्व व सत्ता वाढविण्याच्या प्रयत्नांत निरनिराळ्या प्रकारचे राजकीय डाव त्या काळीं खेळत होता असें दिसेल. वरील डाव खेळत असतां मराठे परप्रांतांत फार अत्याचार करीत व त्यांतल्या त्यांत बंगालकडे गेलेल्या मराठ्यांनीं तर भयंकर जुलूम व अत्याचार केल्याचे आरोप आहेत. तेव्हां मराठे जास्त

जुलमी अगर अत्याचारी होते किंवा मोंगल जास्त अत्याचारी होते हें पहावयाचें आहे. औरंगजेब बादशहासतर वरील प्रकारचे ढोंगी डाव खेळण्याचें कारणच नव्हतें. तो दक्षिणेंत शिरला तेव्हां त्याच्याजवळ ४।५ लाख फौज होती. ही फौज एक नव्हे, दोन नव्हे, वर्षोंनवर्षें महाराष्ट्रांत धुमाकूळ घालीत नव्हती काय ? येवढ्या मोठ्या फौजेस, महिने सोडूनच द्या, पण वर्ष वर्ष पगार मिळत नसे. तेव्हां या सैन्यांतील लोकांनीं महाराष्ट्र उद्‌ध्वस्त करून बेचिराख केला नव्हता काय ? हे सर्व स्वतःच्या डोळ्यांसमोर होत असलेले अत्याचार स्वतःचे बातमीदार अगर इतिहासलेखक लिहून पाठवितील अगर लिहून ठेवतील म्हणून बादशहानें बातमी पाठविणें सोडूनच द्या पण नुसतें लिहून ठेवण्यासही बंदी केली नव्हती काय ? या बंदीमुळें ५ लाख सैन्यांतील लोकांनीं महाराष्ट्रांतील तत्कालीन रयतेस कोणत्या प्रकारें छळलें अगर लुबाडलें, त्यांच्यावर काय काय अनन्वित अत्याचार केले ते त्यांच्या हस्तकांनीं अगर इतिहासलेखकांनीं लिहून ठेवले नसले अगर बातमीदारांनीं बातमीद्वारें कळविले नसले म्हणून ते झालेच नव्हते काय ? याच्या अगदीं उलट अलीवर्दीखानानें भास्करपंतास चौथाई देत नाहीं म्हटल्यावर दोघांची लढाई जुंपली. भास्करपंतानें नबाबास वेढ्यांत पकडून त्याची दुर्दशा केली व अलीवर्दीखान बरद्वानपासून कटव्याकडे पिछेहाट करीत जात असतां गंगाराम भाटानें " महाराष्ट्र पुराणांत " या पिछेहाटींत ४० मैलांतील वाटेवरचीं ५० खेडेगांवची नांवनिशी देऊन तीं मराठ्यांनीं लुटून जाळलीं असें वर्णन केलें आहे. तें खरें आहे असें धरलें तरी औरंगजेबाच्या सैन्यानें त्या काळीं महाराष्ट्रांतील ५० नव्हे ५०० नव्हे हजारों गांवें व सर्व देश बेचिराख करून टाकला होता ! त्या वेळचें त्या उद्‌ध्वस्त महाराष्ट्राच्या करुणाजनक स्थितीचें कल्पनाचित्र डोळ्यांसमोर आणलें तर त्यापुढें भास्करपंतानें ५० सच काय, १०० गांवें जाळलीं असतीं तरी निःपक्षपाती मनुष्यानें त्यास नांवें ठेवलीं नसतीं व दोष दिला नसता. बंगाल्यांत मराठ्यांनीं जे अत्याचार केले असा आरोप आहे ते अत्याचार खरेच झाले असले तर त्यांस आणखी एक मोठें कारण आहे. तें म्हणजे नबाब अलीवर्दीखानानें पूर्वीच्या ज्या सरफराज खान नबाबास मारून नबाबी मिळविली त्या सरफराजखानाच्या पक्षाचा मीर हबीब नांवाचा एक हुशार व धूर्त असा सरदार भोंसल्यांना मिळाला होता. त्याची मदत होती म्हणूनच रघूजीनें नागपूरपासून १००० मैल दूर बंगालबिहारकडे सेनापती भास्करपंत कोल्हटकर यास पाठविलें. या मीर हबीबचें सैन्यही मराठ्यांच्या बाजूनें लढत होतें. त्यांत त्याचा नबाब अलीवर्दीखानाविरुद्ध सुडाचा भाग होता. पुढें अलीवर्दीखानानें अत्यंत विश्वासघातानें भास्करपंत लढाईवरून हरत नाहींसें पाहून त्यास तहाचें आमिष दाखवून त्यास व त्याच्या २१ सरदारांना स्वतःच्या तंबूत बोलावून भागलपूर व कटवा यांच्या मध्यंतरीं मनकारा गांवीं अमानुषपणें ठार

मारलें ! हिंदुस्थानच्या इतिहासांत तरी या अत्याचारास तोड नाहीं. या निर्दय व नीच कृत्यामुळें रघूजी भोंसल्यानें चिडून स्वतः बंगालवर आणखी स्वाऱ्या केल्या. त्या वेळीं सुडाच्या भावनेनेंही कांहीं अत्याचार होणें अपरिहार्य झालें असेल, परंतु हे सर्व अत्याचार एकत्र केले तरी ते औरंगजेबाच्या लाखों सैन्यानें महाराष्ट्रांत केलेल्या अत्याचारांच्या पासंगासहि पुरणार नाहींत. तसेंच मराठे बंगालमध्यें शिरण्यापूर्वी तेथील नबाबांनीं व अधिकाऱ्यांनीं अर्ध शतकपर्यंत सतत चालविलेल्या अत्याचारांच्या पर्वतापुढें मराठ्यांनीं केलेले अत्याचार कांहींच नव्हत असें तिकडील इतिहास वाचले म्हणजे निःपक्षपाती वाचकांच्या लक्षांत येईल.

आमचा उद्देश

परंतु सर्वसाधारण महाराष्ट्रीय जनतेचें बंगालकडील या कालांतील इतिहासाकडे विशेष लक्ष जाण्याचा संभव कमी म्हणून आम्ही प्रथम भोंसल्यांच्या बंगालवर स्वाऱ्या होण्यापूर्वीचा बंगाल-बिहार-ओढिसाचा त्रोटक इतिहास व सन १७४२ पासून सन १७५१ पर्यंत भोंसल्यांचा व नबाब अलीवर्दीखानाचा तह होईपर्यंतच्या कालांतील भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्यांची हकीकत " शेरेमुताखरीन " या ग्रंथाच्या आधारानें या पुस्तकांत देणार आहों.

चौथाईकरितां झालेल्या भोंसल्यांच्या या बंगालवरील स्वाऱ्या म्हणजे नबाब अलीवर्दीखान व रघूजी भोंसले यांचें हें दशवार्षिक युद्धच होय. या युद्धाची निदान मराठीमध्यें तरी एकत्र व इतकी विस्तृत हकीगत अद्याप प्रसिद्ध झाली नाहीं, म्हणून ती देण्याचा आमचा उद्देश आहे. दुसरा उद्देश हा कीं, मराठ्यांनीं बंगाल, बिहार, ओढिसांत या १० वर्षांच्या अवधींत भयंकर अत्याचार केल्याचे जे आरोप आहेत ते खोडून टाकण्याकरितां, वाचकांचें लक्ष औरंगजेब बादशहाचा हस्तक जाफरखान नासिरी (पहिला मुरशीद कुलीखान), सुजाउद्दीन, सरफराजखान व अलीवर्दीखान या बंगालच्या चार नबाबांच्या राजवटींतील अत्याचारांकडे वेधून बंगाल, बिहार, ओढिसांत, वरील नबाबी अमलांत सुख, शांति व स्वस्थतेपेक्षां विश्वासघात, अत्याचार व खून यांचीच लयलूट होती हें दाखविण्याचा आमचा उद्देश आहे.

भोंसल्यांच्या स्वाऱ्या होण्यापूर्वीचा बंगाल-बिहार-ओढिसाचा थोडा इतिहास.

बंगालचा नबाब जाफरखान नासिरी

औरंगजेब बादशहाच्या वेळीं बऱ्हाणपुरास जाफरखान नासिरी नांवाचा जमीनमहसूल खात्यांतील एक हुशार सरदार असे. या कामांतील त्याची

हुशारी व योग्यता पाहून बादशहानें त्यास बंगालमध्यें आपल्यातर्फे दिवाण नेमलें. दक्षिणेंतील गोवळकोंडा-विजापूर राज्यें व विशेषतः ते चिकट मराठे यांचा नायनाट करण्याकरितां औरंगजेबानें दक्षिणेंत २५ वर्षें घालविलीं ! बादशहाबरोबर ३-४ लाख सैन्य असे व सर्वत्र लढाया चालू राहात. त्यामुळें सर्व देश बेचिराख झाला होता. या मोठ्या सैन्यास वर्षोन्वर्षे लागणारा क्रोडों रुपयांचा खर्च त्याच्या साम्राज्यांतून त्यास मागवावा लागे व तो केव्हांही पुरा पडत नसे. इतकेंच नव्हे तर बादशाही सैन्यास वर्ष-वर्ष पगार नाहीं अशी दुःस्थिति होई. या आपत्प्रसंगीं पैशाचा पुरवठा मुख्यतः बंगालच्या उत्पन्नांतून होत असे व तो करणारा हाच तो जाफरखान नासिरी दिवाण होय.

गरीब रयतेस व लहानमोठ्या राजे-जमीनदारांना अनन्वित रीतीनें छळून हा वाटेल तसा पैसा वसूल करीत असे व पैसे वसूल न झाले तर ते जबरदस्तीनें वसूल करतां यावे म्हणून त्यानें एक भयंकर तुरुंग बांधला होता. यांत राजे-जमीनदारांवर विविध प्रकारचे जुलूम व अत्याचार केले जात असत. या विलक्षण व प्रसिद्ध तुरुंगास पुढें "वैकुंठ" असें नामाभिधान प्राप्त झालें होतें. कारण यांत एकदां शिरलेला राजा अगर जमीनदार तेथील ते अनन्वित अत्याचार सहन करून जिवंत असा बहुधा बाहेर येतच नसे व तो "वैकुंठा" प्रतच जात असे ! या जाफरखानास त्याच्या इतर गुणांबद्दल कांहीं इतिहासकार डोक्यावर घेतात पण शेरेमुताखरीनचा लेखक सय्यद गुलाम हुसेन खान वरील "वैकुंठां" तील अत्याचारांची हकीकत देतांना लिहितो कीं, तेथील अत्याचारांचें वर्णन करून मी आपला हात, लेखणी, कागद व शाई हीं विटाळूं इच्छीत नाहीं ! वर्षोन्वर्षे पैशाच्या वाढत्या तंगींत असलेल्या बादशहांना या अनन्वित अत्याचारांच्या बातम्या पोंचत नसतील असें नाहीं, परंतु त्यांना या अत्याचारांचें काय होय ? कसेंही करून व कोठूनही पैसे हातीं येण्याशीं त्यांचें काम ! व तें काम हा जाफरखान नासिरी अगदीं बिनबोभाट करीत होता !

औरंगजेब बादशहानंतरही हा पैशाचा पुरवठा बंगालमधून दिल्लीस होत होता. त्या वेळीं दिल्लीस बादशाही तख्ताकरितां लाथाळी व उलथापालथी होत होत्या. फरुकशीर हा याच वेळीं बंगालमध्यें होता. त्यास पकडण्याचे हुकूम दिल्लीहून सुटले असतां जाफरखान नासिरीनें फरुकशीर यास पकडून न ठेवतां पळून जाण्यास सवड दिली. पुढें फरुकशीर बादशहा झाल्यावर खानाच्या मदतीचा मोबदला म्हणून त्यानें सन १७१३ मध्यें जाफरखानास बंगालची सुभेदारी दिली ! दिवाणाचा सुभेदार बनल्यावर तर त्याची कर्तबगारी तख्तावर येईल त्या बादशहास पैशाच्या दृष्टीनें विशेष फायदेशीर होत गेली व त्याच्या या गुणामुळें पुढें त्यास बंगाल व ओढिसाची नबाबी मिळाली !

बऱ्हाणपुरास सुजाखान (सुजाउद्दौला) नांवाचा एक तरुण सरदार राहत असे. यास जाफरखानानें आपली मुलगी (झिन्नतउन्निसा) दिली होती. हा सुजाखान मूळचा तुर्कस्थानकडील अफशार जातीचा असून तो इराणमधील खुरासन भागांतील रहिवासी होता. जाफरखान बंगालओडिसाचा नबाब बनल्यानें सुजाखानासारख्या हुशार व तरुण जांवयास मोठी अधिकाराची जागा देणें कठीण नव्हतें. सुजाखानास त्यानें आपल्या अधिकारांतली ओडिसाची (अटक) नायब सुभ्याची जागा दिली.

सुजाखान

हा तरुण मनुष्य जाफरखानासारखा जुल्म जबरदस्ती करणारा नसून स्वभावानें गरीब असे. पैसेवसुलीचें काम हाही अगदीं पुरेपूर करी, परंतु तें गोड गोड बोलून, सामोपचारानें, युक्तीप्रयुक्तीनें करीत असे. याच त्याच्या गुणांमुळें, किंवा काय न कळे, सासऱ्याजांवयांचें सख्य फार दिवस राहिलें नाहीं व नवऱ्याचें बापाशीं पटेना म्हणून अगर नवऱ्याच्या बाहेरख्यालीपणाच्या अतिरेकामुळें अगर दुसऱ्या कांहीं अंतस्थ अगर खाजगी कारणानें झिन्नतउन्निसाचें व सुजाखानाचें पटेनासें होऊन ही, मुलगा सरफराजखान यास घेऊन जाफरखानानें नवीन वसविलेल्या मूरशिदाबाद राजधानींत [जाफरखानास मूरशिदकुलीखान (पहिला) असा किताब होता. यानेंच मूरशिदाबाद शहर बसविलें.] मोठ्या आढ्यतेनें व ऐषआरामानें राहत असे.

या वेळीं दिल्लीस मिरझा महमद नांवाचा अझमशाहा बादशहाचा हुजऱ्या (कपबेअरर) आपल्या बायकोमुलासह राहत असे. हा आपला संसार कसातरी चालवीत असे. अझमशहा मेल्यावर संसाराचा गाडा कसा चालवावा हा प्रश्न मिरझा महमदास पडला. त्यास हाजी अहमद व मिरझा महमदअल्ली (मिरझाबंडी) असे दोन मुलगे होते. या मुलांची आई सुजाखानाच्या जातीची व दाट परिचयाची होती. धाकटा मुलगा मोठा हुशार व चलाख होता. कटक येथें नायब सुभ्याच्या जाग्यावर असलेल्या सुजाखानाच्या ओळखीचा व दाट परिचयाचा फायदा करून घेण्याचा सल्ला त्यानें आईबापांस दिला व दोघांना सुजाखानाकडे कटक येथें पाठविलें व हा धाकटा मुलगा मिरझा महमदअल्लीही मागून पैशाचा अभाव असतांनाही वाटेंत बराच त्रास सोसून कटक येथें गेला.

या तरुण मिरझा महमदअल्लीस सुजाखानानें लगलीच कामावर घेतलें. हा तरुण फारच चलाख दिसला. हा प्रसंग पाहून वागणारा, हुशार, दूरदर्शी, मुलकी त्याचप्रमाणें लष्करी शिक्षण घेतलेला होता. असा गुणी मनुष्य अनायासानें मिळाल्याबद्दल सुजाखानास आनंद झाला. थोड्याच दिवसांत बढत्या देऊन सुजाखानानें त्यास वाढविला व आपल्या अगदीं विश्वासांत घेतला. स्वतःचा जम

पक्का बसल्यावर मिरझा महमदअलीनें आपला मोठा भाऊ हाजी अहमद यास त्याच्या व स्वतःच्या बायकामुलांसह कटक येथें बोलावलें. हाजी अहमद त्या सर्वांसह दिल्लीहून कटक येथें आला. सुजाखानानें अर्थात् त्यासही कामावर घेतलें. अशा प्रकारें हें सर्व कुटुंबच सुजाखानाचे आश्रयास अगर नोकरीस राहिलें ! हाजी अहमद व मिरझा महमदअली या दोघां भावांनीं राज्यकारभारांत प्रवेश करून जमीनमहसूलबाबतींत पुष्कळ सुधारणा करून उत्पन्न वाढविलें ! धाकटा मिरझा महमदअली यानें तर सर्वांस मागें टाकून सुजाखानाच्या प्रत्येक लहानमोठ्या कामांत त्यास मदत केली. त्याशिवाय यानें लष्करी कामांतही बरीच प्रगति केली. या सर्व कारणांनीं त्याची कामगिरी सर्वांच्या वर दिसून पडे. यामुळें जुने वरिष्ठ अधिकारी त्याचा हेवा करूं लागले. सुजाखानानें त्याचे गुण व काम लक्षांत घेऊन त्यास महमदअलीवर्दीखान असा किताब दिल्यामुळेंतर अधिकारीवर्ग त्याच्यावर जळफळूं लागला ! परंतु सुजाखानानें त्याकडे लक्ष दिलें नाहीं. या अधिकारीवर्गापेक्षां अलीवर्दीखानाचाच उपयोग आपणास जास्त होईल अशी त्यास खात्री होती व त्याप्रमाणें अनुभवही आला.

जाफरखानाचें व सुजाखानाचें सूत नव्हतें, इतकेंच नव्हे तर वितुष्ट होतें हें मागें सांगितलेंच आहे. जाफरखान आतां वृद्ध झाला होता व तो अजारीही होता. तेव्हां आपल्या मागून आपली नबाबी आपला नातू मुलीचा मुलगा सरफराजखान यास मिळावी या इच्छेनें जाफरखानानें दिल्लीस दरबारी प्रधान-मंडळींत पुष्कळ पैसे चारून तें काम करून घेण्याची निश्चित व्यवस्था करून ठेवली होती.

ही बातमी ऐकून सुजाखानास वाईट वाटणें साहजिक होतें. कारण तसें झालें तर मुलगा बंगाल ओढिसाचा " नबाब " व बाप ओढिसाचा " नायब " असा प्रसंग यावयाचा ! यासंबंधीं आपल्या विश्वासांतले हाजी अहमद व अलीवर्दीखान या बंधुद्वयाशीं सुजाखानानें खलबतें सुरू केलीं. दोघांही भावांनीं एकसमयावच्छेदेंकरून एकच सल्ला दिला तो असाः—

" स्वतःच्या विश्वासांतले अनुभवी व बोलके असे कांहीं हुशार लोक एकदम दिल्लीस पाठवून वाटेल तितका पैसा खर्च करून खान दौरान याच्या तर्फे बादशहाकडून स्वतःच्या नांवची सनद करून घ्यावयाची. " या सूचनेप्रमाणें याचे मसुदे तयार झाले. त्यांत सुजाखानाच्याच नांवानें बंगाल-ओढिसाची नबाबी कां देण्यांत यावी याचीं कारणें वगैरे देऊन त्या लोकांची रवानगी दिल्लीस केली.

दुसरी खबरदारीची व्यवस्था अशी केली कीं, कांहीं कारणें दाखवून कांहीं हुशार लष्करी अधिकारी कामावरून काढल्याचें दाखवून, त्यांना मूरशिदाबादेस

पाठवून जाफरखानाच्या प्रकृतीबद्दल बित्तंबातमी कळविण्यास व प्रसंगीं कटकहून जाणाऱ्या हुकमाची अमलबजावणी करण्यास ठेवून दिलें ! जाफरखान कदाचित् मेला, तर ती बातमी आल्याबरोबर सुजाखानास तावडतोब मूर्शिदाबादेस जातां यावें याकरितां दिवस पावसाळी असतांनाही ठिकठिकाणीं बोटींची व्यवस्था करून कांहीं फौजही जय्यत तयार ठेवली. कटक ते दिल्ली व कटक ते मूरशिदाबाद अशा दोन्हीं ठिकाणीं बातम्या पाठविण्याची व तिकडून आणण्याची व्यवस्था करून ठेविली !

जाफरखान ५।६ दिवसांपेक्षां जास्त जगत नाहीं अशी मूरशिदाबादेहून बातमी आल्याबरोबर सुजाखान हा अलीवर्दीखान व आणखी कांहीं विश्वासू लोक व फौज घेऊन मूर्शिदाबादेकडे जाण्यास निघाला. दुसऱ्या एका बायकोपासून सुजाखानास ताकीखान नांवाचा मुलगा होता, त्यास त्यानें कटक येथें नायब सुभेदार नेमलें. ता. ३० जून सन १७२७ रोजीं जाफरखान मेल्याची बातमी त्यास वाटेंत लागली. दुसरीहि एक आनंदाची बातमी त्यास वाटेंत लागली; ती म्हणजे " सुजाखान यास बंगालओढिसाची नबाबी दिली ! " ही बातमी वाटेंत त्यास ज्या ठिकाणीं मिळाली (ही जागा मिदनापूरजवळ आहे) त्या जागेस त्यानें " मुबारक मंझील " असें नांव ठेविलें. तो तावडतोब मूरशिदाबादेस आला व (छेहल सुट्टन) ४० खांबी नगरभवनांत गेला. गांवांतील अधिकारी व नागरिक यांना बोलावून बादशहाकडून त्याच्या नांवाची आलेली नबाबीची सनद त्यानें मोठ्यानें वाचून दाखविली ! सर्वांनीं ती शांतपणें ऐकली. तेथून तो दरबारांत गेला. मसनदीवर बसला ! त्यानें सर्व खजिना ताब्यांत घेतला ! कर्णे, नगारे, वाद्यें वाजूं लागलीं ! ही सर्व कारवाई व व्यवस्था इतक्या शांत व गंभीरपणें पार पडली अगर पार पाडली तरी सरफराजखानास यांपैकीं कशाचाच पत्ता नव्हता ! गांवाबाहेर दोन मैलांवर एका महालांत तो स्वस्थ निजून होता. नौबत झडल्याचा आवाज ऐकून तो जागा झाला ! चवकशीअंतीं सुजाखान नबाबाच्या मसनदीवर बसल्याचें त्यास समजलें !! आज्यानें केलेल्या व्यवस्थेनुसार आपण नबाब बनणार अशा मनोराज्यांत तो गुंग होता, म्हणून वरील बातमी ऐकून त्यास आश्चर्य वाटलें ! त्याचे सल्लागार त्याचे भोंवतीं जमले. त्यानें त्यांचीं मतें घेतलीं. ज्याअर्थी प्रत्यक्ष बापच गादीवर येऊन बसला, इतकेंच नव्हे, तर त्यानें खजिनाही ताब्यांत घेतला, त्याअर्थी इतक्या उशीरां कोणतीही गोष्ट त्याच्याविरुद्ध करून कांहीं फायदा होणार नव्हता हें सर्वांना स्पष्ट दिसत होतें, म्हणून कोणतीही विरुद्ध गोष्ट करावयाची नाहीं असें ठरलें. सरफराजखानानें दरबारी पोशाख चढविला, तो दरबारांत गेला व त्यानें सुजाखानास कुर्निसाद केला ! त्याच्या पुढें नजरनजराणा ठेवला ! अशा तऱ्हेनें मुख्यतः हाजी अहमद व अलीवर्दीखान या दुकलीच्या कारवाईनें सुजाखान बंगाल–ओढिसाचा नबाब बनला ! !

सुजाखानाची मुत्सद्देगिरी

सुजाखानानें राज्यकारभार सुरळीत चालावा म्हणून एक सल्लागार मंडळ नेमलें. हाजी अहमद व अलीवर्दीखान हेतर त्यांत मुख्य होतेच, त्यांच्याच जोडीस राय अलमचंद व इतर प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्यांत जगतशेट फत्तेचंद हा धनाढ्य सावकार व पेढीवालाही होता. क्रोडों रुपयांचा कारभार यांच्या पेढीवर प्रत्यहीं चाले. या सर्व मंडळींचा उपयोग राज्यशकट सुरळीत चालविण्याच्या कामीं तो करून घेई. व्यक्तिशः तो कोणाकडून पैशाची अपेक्षा धरीत नसे. त्यामुळें तो कोणाचा मिंधाही राहत नसे. सर्वांस योग्य न्याय मिळावा अशी आपली इच्छा आहे, असें तो दाखवी.

जाफरखानानें पैसे उकळण्याकरितां जो "वैकुंठ" तुरुंग निर्माण केला होता, त्यांतून हा वेळपर्यंत कित्येक राजेरजवाडेजमीनदार तेथील छळामुळें वैकुंठाप्रत गेले होते व जाफरखान मेला तेव्हां कित्येक "वैकुंठ" वासाच्या वाटेवर होते ! सुजाखान नबाब बनल्यावर त्यानें या डांबून ठेवलेल्या राजेजमीनदारांना मुक्त करून त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांना वस्त्रें प्रावरणें देऊन त्यांच्या गांवीं पोंचविण्याची व्यवस्था केली ! या एकाच गोष्टीनें त्यानें त्या राजेजमीनदारांचीच नव्हे, तर इतरही लोकांची प्रीति संपादन केली. त्यांना झालेल्या छळाबद्दल व त्रासाबद्दल आपले मनास किती कष्ट होत होते याची कल्पना त्यांच्याशीं सहानुभूतीनें गोड गोड बोलून आणून दिली; परंतु त्यांची मुक्तता करतांना जाफरखानास जोरजुलूम करूनही देण्यास नाकबूल असलेल्या रकमांच्या दुप्पटतिप्पट रकमा "खुषीच्या सक्तीनें" सुजाखानानें कबूल करवून घेतल्या ! त्याच चलाखीनें जहागीरदारजमीनदार लोकांकडून नेहमींच्या वसुलपेक्षां जास्त वसूल गोळा केला. कारखानदार व व्यापारीवर्गाकडूनही जास्त रकमा वसूल केल्या व ही एकंदर रक्कम एक कोट पन्नास लक्ष रुपये जमा केली ! ती जगतशेटाच्या पेढीतर्फे दिल्लीस बादशाही खजिन्यांत भरती केली ! जाफरखान मेल्यामुळें त्याच्या अपार संपत्तीपैकीं घोडे व इतर जनावरें, किंमती गालीचे, किनखाबी व मलमली कपडे, पडदे या व अशाच मौल्यवान् वस्तु जाफरखानाची आठवण म्हणून राजेरजवाडे, जमीनदारांची इच्छा नसतांना त्यांच्या गळीं बांधल्या. त्यांचे ४० लाख रुपये आले. ते महमदशाहा बादशाहाकडे पाठविले ! याशिवाय हा वेळपर्यंत वसूल पाठविलेल्या व वसूल न झालेल्या रकमा युक्तिप्रयुक्तीनें वसूल करून दिल्लीस पाठविल्या ! याशिवाय त्या वर्षाचा वार्षिक वसुलाचाही भरणा त्यानें एकदम दिल्लीस केला ! प्रश्न असा उभा राहतो कीं, जाफरखान बरा का सुजाखान बरा ? "उडदांमाजी काळें गोरें । काय निवडावें निवडणारें" अशीच वाचकांची मनःस्थिति झाली असेल, नव्हे का ?

सुजाखानानें ताकीखानास कटकच्या नायब सुभ्याची जागा दिली. त्याप्रमाणें त्यानें त्याचा दुसरा मुलगा सरफराजखान यास बंगालची नायबसुभ्याची जागा दिली. सुजाखानाचा जांवई मूरशिदकुलीखान (दुसरा) या नांवाचा (सुरतेच्या व्यापाऱ्याचा मुलगा) होता त्यास त्यानें डाक्का येथें नायब सुभेदार नेमला होता परंतु कटक येथील ताकीखान मेल्यामुळें मूरशिद-कुलीखानास त्यानें कटकच्या नायब सुभेदारीवर पाठविलें.

सुजाखान हा आतां बंगालओढिसाचा नबाब बनल्यामुळें प्रत्यक्ष अलीवर्दीखान व हाजी अहमद यांना उच्च दर्जाच्या नोकऱ्या मिळाल्या व त्यांच्या नातेवाईकांचीही चांगलीच वर्णी लागली. हाजी अहमद व अलीवर्दीखान हे दोघे भाऊ भाऊ होते, तरीपण त्यांच्यांतील रिवाजाप्रमाणें हाजी अहमदाच्या तिघां मुलांना अलीवर्दीखानाच्या तिन्ही मुली दिल्या होत्या. यांपैकीं सर्वांत मोठा नवाजिस महमदखान यास सैन्याची बक्षीगिरी दिली. दुसरा मुलगा सयद अहमद यास रंगपूरची फौजदारी दिली. धाकटा झैनुद्दीन अहमद यास राजमहालची फौजदारी दिली !

सुजाखानानें चढविलेला अलीवर्दीखान

या सुमारास पाटणा येथें फहरुद्दौला नांवाचा सुभेदार होता. हा मनुष्य अशिक्षित, निरक्षर, हलक्या कानाचा, निष्काळजी, गर्विष्ठ, रागीट, तापट स्वभावाचा, निर्दय असा सर्व अवगुणसंपन्न होता. त्याच्या अत्याचाराच्या गोष्टी 'शेरेमुताखरीन' या ग्रंथांत दिल्या आहेत. दिल्लीचा वजीर खान दौरान याचें व सुजाखानाचें विशेष सूत होतें. दिल्लीस वरील पाटण्याचा सुभेदार फहरुद्दौला याच्या अत्याचारांच्या तक्रारी केल्या, करविल्या अगर गेल्यामुळें खानदौरान याच्या कारवाईनें फहरुद्दौल्यास त्या कामावरून काढून पाटणाबिहारचा सुभा हा बंगाल-ओढिसाच्या नबाबाच्या ताब्यांत देण्यांत आला (सन १७३३). अशा प्रकारें हातीं आलेल्या या बिहारप्रांतावर कोणास सुभेदार नेमावा याचा विचार सुजाखान व त्याचें मंत्रिमंडळ करीत असतां त्याचा मुलगा सरफराजखान यासच तेथें पाठविण्याचें ठरलें. त्या योगें अनायासें नावडता मुलगा सरफराजखान दूर झाला असता, परंतु त्याची आई (झिन्नतउन्निसा) मुलगा आपल्यापासून दूर पाठविण्यास कबूल होईना. सरशेवटीं अलीवर्दीखानाची नेमणूक पाटणाबिहारच्या सुभेदारीवर करण्याचें ठरून ती नेमणूक सल्लागारमंडळास पसंत पडली !

अलीवर्दीखानास "मोहबत जंग बहादूर" इत्यादि पदव्या दिल्या, मानाचा हत्ती दिला, पांच हजार स्वारांची मनसब दिली, अशा प्रकारें सुजाखानाच्या मेहरबानीनें अलीवर्दीखानास बिहारची सुभेदारी मिळाल्यावर व ती पक्की झाल्याची खातरी झाल्यावर अलीवर्दीनें आस्ते आस्ते आपलें खरें स्वरूप

दाखविण्यास सुरवात केली. स्वतःची इभ्रत व दरारा दुसऱ्यावर रहावा म्हणून प्रत्येक जण प्रयत्न करीत असतो. पूर्व अमदानींतले कांहीं सरदार वरील प्रकारचें वर्तन जास्त प्रमाणांत करतात असें अलीवर्दीखानास दिसून आल्यानें हे पुढेंमागें आपल्यापेक्षां वरचढ होतील. तेव्हां कांहींना प्रथमच ठेंचून टाकलें म्हणजे दुसऱ्या सरदारांवर व अधिकाऱ्यांवर वचक बसेल. या धोरणानें त्यानें कांहीं सरदारांना नुसतें पकडूनच न ठेवतां त्यांना मारून टाकण्यासही कमी केलें नाहीं. उदाहरणार्थः—

दरभंग्याच्या बाजूचा १५०० स्वारांचा, पूर्वीच्या राजवटींत काम करून सर्वांच्या विश्वासास पात्र झालेला, अबदुल करीम नांवाचा एक अफगाण सरदार पाटण्यास होता. अलीवर्दीखान पाटण्यास सुभेदार होऊन आल्यावर या अबदुल करीमखानानेंच या नवीन सुभेदाराचा जम बसविण्यास मदत केली. थोड्याच अवधींत अबदुल करीमची योग्यता अलीवर्दीखानाच्या लक्षांत आली. त्यानें अबदुल करीमला " वंजारी " लोकांचा (फिरता व्यापार करीत असतां लूटमारही करणारे असत) बंदोबस्त करण्यास पाठविलें. त्यानें या लोकांचा बंदोबस्त करून त्या लोकांनीं मिळविलेली लूट त्यांच्या जवळून घेऊन अलीवर्दीखानास आणून दिली! अलीवर्दीखानानें याच अबदुल करीमखानाच्या व त्याच्या सैन्याच्या मदतीनें भिटा व भवरा येथील राजांना नरम करून आपला अधिकार मानावयास लावलें (हे राजे सुभेदाराचा अंमल न मानणाऱ्यांपैकीं होते). पूर्वीच्या कोणच्याही सुभेदारानें यांच्यावर इतक्या जोराची चढाई केली नव्हती. या कारणानें या दोघांही राजांच्या जवळ अपार संपत्ति जमली होती. ती लाखों रुपयांची लूट अबदुल करीमनें अलीवर्दीखानास मिळवून दिली! त्याप्रमाणें चकवार जातीचे लोक, भोजपूरचा राजा सुंदरसिंग, ठिकरीचा जमीनदार, नामदारखान, मुईनखान यांसारखे चढेल राजे, यांना अबदुल करीमखानाच्या मदतीनें अधिकार मानावयास लावलें. जमीनमहसूल व नजरनजराण्यांच्या जास्तींत जास्त वार्षिक रकमा प्रत्येकाकडून ठरवून घेतल्या! अशा प्रकारें बिहारमधील सर्व बंडाळी मोडून सर्वत्र स्थिरस्थावर करण्यास ज्यानें इतकी मदत केली, तो अबदुल करीम आपल्याशीं बरोबरीच्या नात्यानें व जास्त सलगीच्या भावानें वागतो, ताठरपणानें सडेतोड बोलतो, नमून अदबीनें रहात नाहीं, व पुढें मागें आपणास हा भारी होऊन जुमानणार नाहीं असें वाटल्यावरून त्याचा प्रत्यक्ष गुन्हा असा कांहींच नसतांना एके दिवशीं तो दरबारांत आल्यावर त्यावर लोक घालून त्यास पकडून ठेवलें व दुसऱ्या दिवशीं त्यास ठार मारिलें!

अलीवर्दीखानाची सर्वच कारकीर्द विश्वासघातावर उभारलेली आहे. अलीवर्दीखान पाटण्याचा सुभेदार बनल्यानंतरच्या त्याच्या वाढत्या वैभवाची व राज्यतृष्णेची कोनशिला वरील अबदुल करीमच्या खुनानें बसविली गेली! परंतु

विश्वासघाताच्या पायावर उभारलेली या पुढील बंगाल–बिहार–ओढिसाची नवाबी त्याच्याच हस्तकांनीं त्याचेंच विश्वासघाताचें हत्यार त्याच्या विरुद्ध चालवून त्याच्या डोळ्यादेखतच कशी खिळखिळी करून टाकली ती " भोसल्यांच्या बंगाल वरील स्वाऱ्या " या लेखमालेवरून वाचकांच्या लक्षांत येईल.

औट घटकेचा नवाब सरफराजखान

सुजाखान ता. १३ मार्च सन १७३९ रोजीं मेल्यावर त्याचा मुलगा सरफराजखान हा बंगाल–बिहार–ओढिसाचा नवाब बनला. धार्मिक वृत्तीच्या या नबाबाचें लक्ष राज्यकारभारांत विशेष नसे. सुजाखानाच्या वेळचे हाजी अहमद, रायरायन, जगतशेट वगैरे मंडळींच्या पूर्वीपासून चालत आलेल्या कारवाया, कारस्थानें नवीन नबाबास माहीत नव्हतीं असें नाहीं, तरी पण वडिलांच्या वेळचे हे जुने मुत्सद्दी लोक आहेत येवढ्याकरितां त्यानें त्यांच्याबद्दल द्वेषभाव न दाखवितां तो त्यांना योग्य तो मान देत असे. परंतु वरील मंडळींचें मत पूर्वीपासूनच सरफराजविषयीं शुद्ध नव्हतें. त्यामुळें या नवीन नबाबाच्या व त्याच्या नवीन अधिकाऱ्यांच्या विरुद्ध ही जुनी मंडळी कांहींना कांहीं उलाढाली करीत असत. याची प्रतिक्रिया होऊन नवीन अधिकाऱ्यांचें मत जुन्या मंडळींच्या विरुद्ध बनविण्यांत झालें. सरफराजचा ओढा अर्थात् नवीन अधिकाऱ्यांकडेच साहजिक होता. या नवीन प्रभावळींत हाजी लुतफुल्ला, मर्दन अलीखान, मीर मूर्तजाखान वगैरे मंडळी होती. जुन्या मंडळींचा सूत्रधार हाजी अहमद याच्या कारवाया व कारस्थानें या मंडळींना विशेष माहीत असत. त्यामुळें ही मंडळी हाजी अहमद व त्याच्या कुटुंबांतील मंडळींना पाण्यांत पहात असत, व ही मंडळी सरफराज खानाचें मत कलुषित करीत. याचा दृश्य परिणाम हाजी अहमदाच्या नातेवाइकांचा भरणा पूर्वी झालेला होता, त्या मंडळींना कामावरून आस्ते आस्ते काढून स्वतःच्या नातेवाइकांची भरती करण्यांत झाला.

हाजी अहमद स्वतः दिवाणाच्या जागेवर होता. ही नवीन मंडळी त्याच्या कामांत व्यत्यय आणीत, त्याचा अपमान करीत, त्यास टोंचून बोलत, दुरुत्तरें देत. पुढें सरफराजखानानें हाजी अहमदाचें दिवाणाचें कामही काढून घेतलें व त्या जागीं मीरमूर्तजास नेमलें. हाजी अहमदाचा जांवई आताउल्लाखान राजमहालचा फौजदार होता. त्यास काढून त्याच्या जागीं सरफराजखानानें आपला जांवई हसन अहमद यास नेमलें. हाजी अहमदाचा दुसरा मुलगा सयद अहमद रंगपूरचा फौजदार होता व धाकटा झैनुद्दीन अहमद पाटण्यास असे. हे दोघे बापास भेटण्यास आले असतां या दोघांस पकडून तुरुंगांत टाकण्याची सूचना मनकरखानानें दिली, परंतु कांहींही गुन्हा नसतां निदान अधिकाऱ्यांना पकडून ठेवण्याची अलीवर्दीखानाची धडाडी सरफराजखानांत मुळींच नव्हती.

उलट अशी सूचना आली असतां मी दोघांसही पकडलें नाहीं ही गोष्ट सरफराजनें हाजी अहमदास सांगून स्वतःच्या न्यायीपणाची त्यास जाणीव करून दिली. हाजी अहमदाच्या मुलीच्या मुलीचें (आताउल्लाच्या मुलीचें) लग्न हाजी अहमदाच्या मुलाच्या मुलाशीं (झैनुद्दीनच्या मुलाशीं) म्हणजे पुढें प्रख्यातीस आलेला शिराजउद्दौला याशीं ठरत होतें, त्यांत खो आणून ती मुलगी आपल्या मुलास देण्याची मागणी नबाबानें केली.

सुजाखानानें अलीवर्दीखानास पाटण्याचा सुभेदार बनवितांना जी पांच हजार स्वारांची मनसब दिली होती ती सरफराजखानानें रद्द करून ती फौज परत मूर्शिदाबादेस पाठविण्यास हुकूम सोडला (अलीवर्दीखानानें हा हुकूम अमलांत आणला नाहीं ही गोष्ट निराळी). या व अशाच गोष्टी हाजी अहमद व अलीवर्दीखानाविरुद्ध सरफराजखानाच्या अमदानींत होऊं लागल्या. तेव्हां सरफराजखानाविरुद्ध कारवाया सुरू झाल्या. त्याची ताकद कोणकोणच्या बाजूनें कमी होईल व शेवटीं त्याचें उच्चाटण कसें करावयाचें याबद्दल हाजी अहमद व अलीवर्दीखान यांचीं गुप्त कारस्थानें सुरू झालीं.

राज्यक्रांतीची तयारी

सध्यांच्या शांततेच्या काळांत व आपणास जवळपास कोणीही शत्रु नसतांना इतकी फौज, तोफखाना, दारुगोळा ठेवण्याची मुळींच गरज नाहीं. तेव्हां जुजबी सैन्य ठेवून बाकीचें सर्व कमी करण्याची सूचना हाजी अहमदानें नबाबास केली व त्या भोळसर नबाबास यायोगें खर्चांत मोठीच बचत होईल असें वाटून त्यानें ही सूचना मान्य करून ताबडतोब अमलांत आणली! हीच तयार फौज दारूगोळा, तोफखाना जशाच्या तसाच अलीवर्दीखानाकडे भरती व्हावा या उद्देशानें अलीवर्दीखानानें नबाबाकडे तक्रारींवर तक्रारी पाठविण्यास सुरवात केली कीं "भोजपूरचा राजा व इतरही पुंड सरदारजमीनदार लोक फारच वरचढ झाले आहेत. स्वतः महसूल देतच नाहींत, उलट दुसऱ्यास लुटतात! माझे हुकूम मानीत नाहींत! वसूल जमा होत नाहीं. येवढ्याकरितां या गुंडांना वठणीवर आणण्यास जास्त सैन्यदारूगोळयाची अत्यंत जरूर आहे" अशा तक्रारी करून सरफराजकडून काढून टाकलेल्या सैन्याची भरती त्यानें स्वतःकरितां केली!

सरफराजखानास उलथून पाडण्यास कशा प्रकारच्या कारवाया वरील बंधूंची दुकल करीत होती त्यांपैकीं एका प्रकारचें उदाहरण वर दिलें आहे. आणखी एका प्रकारचें पाताळयंत्री कारस्थान पुढीलप्रमाणें आहे.

नादीरशहानें याच सुमारास दिल्लीवर स्वारी करून भयंकर अत्याचार व लूट दिल्लीमथुरा भागांत करून कांहीं काळ त्यानें आपला अम्मल तेथें सुरू केला.

बंगालचा सुभा हा दिल्लीच्या अंकित आहे, तेव्हां हाजी अहमदानें सरफराजखान नबाबाकडून नादीरशहाच्या नांवानें नाणें व शिक्के पाडून ते बंगालमध्यें चालू करविले ! थोडक्याच अवधींत नादीरशहा निघून गेला व पूर्वीप्रमाणें बादशाही अमल दिल्लीस चालू झाला. लागलीच हाजी अहमदानें नादीरशाहाच्या नांवानें नबाबानें पाडलेलीं नाणीं दिल्लीस पाठवून नबाबाचें व नादीरशहाचें सूत असून नबाब दिल्लीविरुद्ध नादीरशहास मदत करीत होता असा आरोप सरफराजखान नबाबावर आणविला ! अलीवर्दीखानानें बंगाल–बिहार–ओढिसाची नबाबी आपणास मिळावी याकरितां जारीचे प्रयत्न दिल्लीस चालू ठेविले होते. बादशहाच्या मर्जीतला इशाखअल्ली नांवाचा एक सरदार अलीवर्दींचा मित्र होता. त्याच्यातर्फे दरबारांत व वजिराकडे कसून खटपट चालविली. पाण्यासारखा पैसा खर्च केला. शिवाय " मला नबाबी मिळाली तर सरफराजखानाची सर्व संपत्ति सरकारजमा होईलच. याशिवाय १ कोटी रुपये मी दिल्लीदरबारीं भरीन व त्याच्या जोडीस वसुलाचे १ कोटी रुपये पाठवीन " असें बादशहास कळविलें. " दाम करी काम " या न्यायानें वरील खटपटीस यश येऊन सुजाखान मेल्यापासून १ वर्षाच्या आंत " बंगाल–बिहार–ओढिसाचा नबाब " बनल्याचा हुकूम अलीवर्दीखानाच्या हातीं आला !

जाफरखान जिवंत असतांना सुजाखानानेंही अशाच प्रकारें अलीवर्दींच्याच सल्ल्यानें दरबारी प्रधानमंडळांत पैसे पेरून स्वतःच्या नांवची नबाबीची सनद आणवून जाफरखान मेल्याबरोबर मूर्शिदाबादेस जाऊन तो तक्तावर बसला. सरफराजखानानें बाप होता म्हणूनच प्रतिकार केला नाहीं ही गोष्ट अलीवर्दीखान जाणून होता. नबाबीची सनद पाहून सरफराजखान गादी सोडण्याइतका नेभळट नाहीं, त्याच्याशीं लढाई करावीच लागणार, हें तो जाणून होता व लढाईच्या जय्यत तयारीनेंच तो पाटण्याहून निघाला होता, परंतु आपण मूर्शिदाबादेवर चाललों आहों अगर जाणार आहों ही गोष्ट त्यानें अतिशय गुप्त ठेवली ! भोजपूर व इतर नाठाळ जमीनदारांना वठणीवर आणण्यास सैन्य जमविण्याचा गवगवा बरेच दिवसांपासून चालू ठेवलाच होता व " आपण निमकहरामपणा न करितां इमानें इतबारें लढूं " अशाबद्दल आपल्या हिंदू व मुसलमान सैनिकांकडून व अधिकाऱ्यांकडून गंगाजल व कुराणशरीफवर हात ठेवून त्यानें शपथा घेऊन ठेवल्या ! कांहीं सैन्य भोजपूरच्या बाजूस रवानाही केलें. अगदीं शेवटपर्यंत मूर्शिदाबादेवर चाल करून जात आहों ही गोष्ट गुप्त ठेवली. भोजपूर व इतर जमीनदार बाजूस राहून सैन्य मूर्शिदाबादेजवळ आलें, तेव्हां ती बातमी फुटली. तरीही आपण नबाबाच्या भेटीस जात आहों अशी त्यानें कंडी पिकविली व वरील बातमी मूर्शिदाबादेस जाऊं नये म्हणून त्या बाजूच्या सर्व वाटा रोंखून धरल्या.

वरील गुप्त बातमी सैन्यांत फुटल्यानें अलीवर्दीखानाचा नीच बेत ऐकून बहुतेकांना वाईट वाटलें व आश्चर्यही वाटलें ! आपणाकडून आणाशपथा घेण्याचें कारण आतां त्यांच्या लक्षांत आलें, परंतु आपण घेतलेल्या शपथा मूर्शिदाबादेवर चालून जाण्यासाठीं नव्हत्या ही गोष्ट माहीत असूनही त्या तोडण्याचें धैर्य कोणासही नव्हतें ! मूर्शिदाबादेस जगतशेटासारखे अलीवर्दीचे हस्तक होते, त्यांना ही बातमी होती. सरफराजखानाच्या कानीं ही बातमी जाईपर्यंत अलीवर्दीखान मूर्शिदाबादे-जवळ पोंचला. नबाबाच्या मंत्रिमंडळांत भवति न भवति होऊन शेवटीं लढाई देण्याचें ठरलें.

सरफराजखानानें तावडतोब सन्नत व हुगळीचा फौजदार सुजाकुलीखान यास खरी बातमी काढून आणण्यास पाठविलें व सैन्याची शक्य ती जमवाजमव करून तो मोहरमच्या २३ तारखेस मूर्शिदाबादच्या बाहेर कमरा गांवाजवळ आला. बातमी काढण्यास पाठविलेले दोघे हेर याच ठिकाणीं त्यास भेटले. अलीवर्दीखानानेंही हकीम महमद अल्ली नांवाचा गृहस्थ नबाबास भेटण्यास पाठविला होता तोही या ठिकाणीं नबाबास भेटला. तिघांच्याही सांगण्यावरून " अलीवर्दीखान लढण्यास आला नसून स्वतःचीं गाऱ्हाणीं नबाबाच्या कानावर घालण्यास आला आहे " असें समजलें. हकीम महमद अल्लीनें अलीवर्दीचें म्हणणें पुढीलप्रमाणें नबाबास सादर केलें:—

सुजाखानानें माझ्या सारख्या क्षुद्र मनुष्यास सध्यांच्या पदवीस चढविलें ही गोष्ट मी कृतज्ञतापूर्वक मानतों, परंतु हातीं धरून चढविलेल्या मनुष्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें वागविणें हें मोठ्यांचें कर्तव्य असतें तें आपण करीत नाहीं. माझा भाऊ, मी व आमच्या कुटुंबांतील इतर मंडळी तुमच्या घराण्याची इमानें इतबारें नोकरी करीत आहों परंतु आपणच जर माझ्या भावावर व इतर कुटुंबियांवर आग पाखडून त्यांना त्यांचा कांहीं अपराध नसतांना काढून टाकूं लागलां तर त्याचा प्रतिकार करणें आम्हांस क्रमप्राप्तच आहे. तेव्हां आमची अशी विनंति आहे कीं, सध्यांची परिस्थिति निर्माण करणारे म्हणजे आपलें आमचें वितुष्ट आणणारे व आम्हांस पाण्यांत पहाणारे आपले दरबारी मीरमूर्तजाखान, मर्दनखान, हाजी-लुतफुल्लाखान यांना आपण कामावरून दूर करावें. ते गेल्यावरही आम्हांस सुरक्षितपणा वाटला तरच आम्ही नजरनजराणा घेऊन भेटीस येऊं. दुसरी विनंति अशी कीं, पहिली विनंति मान्य नसेल तर आपण आपल्या राजवाड्यांत बसून वरील अधिकाऱ्यांना सैन्यासह आमच्याशीं लढण्यास हुकूम देऊन पाठवा. ते जिंकले तर आम्ही निघून जाऊं व ते राहतील. ते हरले तर त्यांना काढून टाका म्हणजे कुर्निसाद करण्यास मी आपल्या पायांशीं येतों. मी म्हणतों याची सत्यता पटावी म्हणून ज्या कुराणशरीफवर हात ठेवून मी शपथ घेऊन या गोष्टी

सांगतों त्याची ही एक मौल्यवान् पोथी आपणाकडे पाठवीत आहे! साळसूदपणाची ही कमाल नव्हे काय?

घेरियाची लढाई

हकीम महमदअलीनें कुराणशरीफची ती मौल्यवान् पोथी नबाबास नजर केली, परंतु त्यांतील खरेखोटेपणा न समजण्याइतका – गोष्टी या थरापर्यंत आल्यावरही – सरफराजखान खुळा नव्हता. लढाई देण्यास तो नाखुष होता व या लढाईत आपण हरणार हेंहीपण तो जाणून होता, तरीसुद्धां प्रसंगाला तोंड दिलेंच पाहिजे म्हणून त्यानें सैन्यास कूच करण्याचा हुकूम दिला व तो गंगेकांठीं घेरियाजवळ आला.

आपणास हाणून पाडण्याकरितां हाजी अहमद व अलीवर्दीखानानें काय काय कारवाया व कारस्थानें रचिलीं तीं त्याच्या डोळ्यांसमोर उभीं राहिलीं. आपण प्रथम पासूनच दाखविलेल्या नरमाईचा हा परिणाम झाला ही गोष्ट लक्षांत येऊन त्यास पश्चात्तापही झाला, परंतु आतां त्याचा कांहींही उपयोग होणार नव्हता. तेव्हां जें होणार असेल तें होईल या विचारानें व आवेशानें तो निघाला. महमद घोसखानतर त्याच्याही पुढें अघाडीवर घुसून अलीवर्दीशीं सामना देण्यास सूतीजवळ उभा राहिला. अलीवर्दीनें आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या. एक तुकडी नंदलालच्या हाताखालीं देऊन निशाणाचा हत्तीही त्याच्याच ताब्यांत दिला व त्यास महमद घोसखानाच्या तोंडावर नदीच्या अलीकडे ठेवलें. एक तुकडी सरफराजखानाच्या पिछाडीस पाठविली व एक तुकडी स्वतः घेऊन अलीवर्दीखान सरफराजखानासमोर आला. मागें गेलेली तुकडी लपतछपत जात होती. समोरून तोफा सुरू झाल्या कीं मागून हल्ला चढवावयाचा बेत ठरला. ही लढाई ता. १० एप्रिल सन १७४० रोजीं पहांटे सुरू झाली. अलीवर्दीखानानें व हाजी अहमदानें प्रथम पासूनच नबाबाच्या उरलेल्या सैन्यांत फितुरी पसरविली होती. अशाच एका फितुरी शिपायानें सरफराजखानावर गोळी झाडल्यामुळें तो उजाडण्यापूर्वीच मारला गेला! तो पडल्याबरोबर त्याच्या सैन्यांत पळापळ सुरू झाली. रायरायन अलमचंद जखमी झाला. मिरझा इरेझखानाचा मुलगा मारला गेला म्हणून तो शहरांत पळून गेला. अलीवर्दीच्या बाजूस त्याचा प्रख्यात सरदार नंदलाल लढाईत पडला. त्यामुळें त्याचे लोक पळूं लागले. हें पाहून घोसखानास आनंद होऊन तो आपलें विजयी सैन्य घेऊन सरफराजच्या मदतीस धावला. नबाबाचा हत्ती गांवाकडे चाललेला पाहून क्षणभर त्यास वाटलें कीं, अलीवर्दीचा पराजय करून नबाब गांवांत परतला असावा, परंतु थोडक्याच वेळांत सरफराजखानास एका फितुरी मनुष्यानें गोळी घातली व तो मेला हें समजल्यावर त्या शूर व पराक्रमी घोसखानास अत्यंत वाईट वाटलें व त्वेषही

चढला व जो सोक्षमोक्ष होईल तो या रणांगणावरच करावयाचा अशा निश्चयानें आपले दोघे मुलगे महमद कुतुब व महमद पीर यांसह तो अलीवर्दीच्या तुकडीवर तुटून पडला ! परंतु अलीवर्दीनें सरफराजच्या सैन्यांत इतकी फितुरी पसरविली होती कीं, तोफाबंदुकांच्या दारूंत माती मिसळलेली आढळली ! घोसखानासारख्या एखाद दुसऱ्या लढवय्या इमानी सरदाराच्या शौर्य, धैर्य व शस्त्रकौशल्यापेक्षां अलीवर्दीनें सरफराजखानाच्या सैन्यांत पसरविलेलें फितुरीचें शस्त्रच शेवटीं प्रभावी ठरून घोसखान व इतर सरदार व सैनिक या लढाईंत मारले जाऊन अलीवर्दीखान या प्रसिद्ध घेरियाच्या लढाईंत विजयी झाला ! !

प्याद्याचा फर्जी-अलीवर्दीखान-नबाब बनला !

विजयी झाल्यावर अलीवर्दीखानानें प्रथम हाजी अहमदास मूर्शिदाबादेस पाठवून स्वतःच्या नांवाची ग्वाही फिरविली. सर्वांना अभय देऊन मोठमोठ्या सरदार-सावकारांच्या घरांवर पहारे ठेविले, कोणावर कसल्याही प्रकारचे अत्याचार, लूटमार, दंगेधोपे होणार नाहींत अशी हमी दिली. राजवाड्यावर सक्त पहारा ठेवला. ता. १२ एप्रिल सन १७४० रोजीं अलीवर्दीखान मोठ्या लवाजम्यानिशीं थाटामाटानें राजधानींत शिरला. जाफरखानाच्या व सरफराजखानाच्या घरच्या मंडळींचा आपण किती मान ठेवतों हें जनतेस दिसावें म्हणून प्रथम दरबारांत न जातां अलीवर्दीखान सरफराजखानाच्या आईच्या महालांत गेला ! उंबरठ्यांतच लवून त्यानें बेगमला कुर्निसात केला ! अत्यंत दुःखित अंतःकरणानें त्यानें तिची समजूत करण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला " जें होऊं नये तें झालें. त्याबद्दल मी सर्वस्वी अपराधी आहें. मी आपल्याच अन्नावर वाढलों असल्यानें मी आपला दास आहें व आजन्म दासच राहीन. आपली योग्यता व मानमरातब आजपर्यंत जसा चालत आला त्यांत यत्किंचित् न्यूनता पडूं देणार नाहीं " वगैरे गोष्टी सांगून मग तो दरबारांत गेला व नबाबाच्या तक्तावर बसला ! त्यानें प्रथम सर्वांना अभय दिलें. तक्तारूढ होण्याचा विधि झाल्यावर राजेरजवाडे, सरदारजमीनदार व इतर शहरवासी शेटसावकार यांजकडून नजरनजराणे येऊन त्यांचे ढीग पडले ! ज्यानें यास वाढविलें, योग्यतेस चढविलें, त्याच्याच मुलास मारून हा कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ झाला, असेंच कोणीही म्हणेल असें नव्हे का ?

सरफराजखानानें थोडेच दिवस राज्य केलें असलें तरी तें जुलूम जबरदस्तीचें नव्हतें व अलीवर्दीखानानें हें विश्वासघातकी कृत्य केलें हें न समजण्याइतके लोकही कांहीं दूधखुळे नव्हते. ही गोष्ट कबूल करूनही शेरे मुताखरीनच्या लेखकाचें व इतर इतिहासकारांचें म्हणणें आहे कीं " सरफराजखान मारला जाऊन अलीवर्दीखान नबाब बनला ही गोष्ट एकपरी चांगली झाली ! कारण सरफराजसारख्या दुबळ्या नबाबाच्या कारकीर्दीत " भोंसल्यांच्या बंगालवर

स्वाऱ्या " झाल्या असत्या तर मराठ्यांनीं इतर ठिकाणांप्रमाणें " चौथाई " घेतां घेतां सबंध बंगालच घशांत टाकला असता ! मराठ्यांच्या अत्याचारांखालीं इकडील रयतेची धूळधाण झाली असती ! अलीवर्दीखानासारखा जबरदस्त लढवय्या व मुत्सद्दी नबाब यावेळीं होता म्हणून शेवटीं त्यानेंच मराठ्यांना बंगाल मधून हांकून लावलें ! " मराठ्यांचें अलीवर्दीपुढें कांहीं चाललें नाहीं व त्यानें मराठ्यांना आले तसे हांकून लावले हें वरील इतिहासकारांचें म्हणणें जर खरें तर मराठ्यांनीं बंगाल लुटल्याचे व अत्याचार केल्याचे आरोप हेच इतिहासकार मराठ्यांवर ठेवतात याची संगति कशी लावावयाची ? प्रश्न असे उद्भवतात कीं, बंगालबिहार-ओढिसा बेचिराख केला कुणीं ? मराठ्यांपेक्षां दुसरे कोणींही बंगालकडे लूट अत्याचार केले नाहींत काय ? अलीवर्दीखानानें मराठ्यांना हांकून लावलें किंवा त्याला मराठ्यांशीं तह करणें भाग पडलें ? अलीवर्दीखानाच्या कारकीर्दींत रयतेस सुखशांतीचा लाभ कितपत झाला ? वरील प्रश्नांचीं उत्तरें शेरे मुताखरीनच्याच आधारानें आम्हीं लिहिलेल्या " भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या " या लेखांतून दिलीं आहेत व अलीवर्दीखानाचा व मराठ्यांचा संबंध सन १७४२ मध्यें येण्यापूर्वी बंगाल-बिहारओढिसाच्या राजवटीची थोडी कल्पना वाचकांना यावी या उद्देशानें हा लेख लिहून त्यांत अलीवर्दीखानानें प्रथम पासून काय काय कारवाया करून सुजाखानाच्या मुलास मारून नबाबी मिळविली ती हकीगत दिली ! आतां यापुढें सुजाखानाच्या जांवयाचें उच्चाटन अलीवर्दीखानानें कसें केलें तें पहा.

रुस्तुमजंग ऊर्फ मूरशिदकुलीखान (दुसरा)

रुस्तुमजंग नांवाच्या सुरतच्या एका व्यापाऱ्यास सुजाखानानें आपली मुलगी दुर्दना बेगम ही दिली होती. सुजाखानानें रुस्तुमजंगास प्रथम मूर्शिदाबादेस आणलें व प्रथम त्यास डाक्याची नायब सुभेदारी दिली. ताकीखान कटकचा नायब मेल्यावर रुस्तुमजंगास कटक येथें पाठविलें. रुस्तुमजंगास मूरशिद कुलीखान असा किताब होता. हा दुसरा मूरशिदकुली या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यानें मीरहबीब नांवाच्या एका हुशार मनुष्याच्या साहाय्यानें डाक्याच्या बाजूस बराच मुलूख बादशाही अमलाखालीं आणला. मीर हबीबच्याच मदतीनें महसुलाचें उत्पन्न बऱ्यावाईट उपायानें पुष्कळ वाढविलें. मूरशिदकुली कटकला आल्यावर त्यानें आपला मदतनीस मीर हबीब यासही कटक येथें आणून अधिकारावर ठेवलें. अलीवर्दीनें एकाएकीं मूरशिदाबादेवर चालून सरफराजखानास मारून तो स्वतः नबाब कसा बनला ही बातमी कटकला पोंचल्यावर मेहुणा मूरशिदकुलीखान व बहीण दुर्दना बेगम यांना अतिशय वाईट वाटलें व अलीवर्दीखानाचा संतापही आला. कटकचा सुभा मूरशिदाबादेच्या अधिकारांत होता. परंतु अन्यायानें व जबरदस्तीनें बनलेल्या या अलीवर्दीखानाचा अधिकार मानावयाचा नाहीं असें विशेषतः दुर्दना

बेगमच्या आग्रहानें मूरशिदकुलीनें ठरविलें. इतकेंच नव्हे, तर आपण स्वतंत्र आहों असें जाहीर केलें व बंगाल–बिहार–ओडिसाच्या नबाबीवर आपलाच हक्क जास्त पोंचतो असें सांगून अलीवर्दीशीं टक्कर देण्याकरितां फौज, दारूगोळा, धान्यदाणागोटा इत्यादींची त्यानें जय्यत तयारी केली व पावसाळा संपल्याबरोबर तो कटक सोडून बालासोर येथें आला. मूरशिदकुलीखान आपल्या विरुद्ध जाणार हा अंदाज अलीवर्दीखानास होताच व सरफराजखानापेक्षां मूरशिदकुलीची तयारी जास्त असणार म्हणून अलीवर्दीनेंही बराच मोठा फौजतोफखाना जमवून मिदनापुरावरून तो बालासोरवाटेवर आला. येतांना या प्रचंड सैन्यानें बिहार मूरशिदाबादेपासून वाटेवरील रयतेवर अत्यंत अत्याचार व लूटफाट केल्याची हकीगत "रियास सलातीन" ग्रंथांत दिली आहे ! प्रत्यक्ष अलीवर्दीनें रयत-जमीनदारांकडून धान्यवैरण मोबदला दिल्याशिवाय घेतल्याची हकीगत आहे. मग इतरेजनांनीं रयतेवर जुलूमजबरदस्ती करून धान्य दाणावैरण लुटून नेली असेल यांत नवल काय ? एखाद्या जमीनदारास सपशेल लुबाडलें असलें तर शाब्दिक पदव्या अगर किताबांची खैरात करून त्यास खुष ठेवण्याची व्यवस्था अलीवर्दीनें ठेवली होती.

फुलवारीची जंगी लढाई

बालासोरजवळील जोन नदीच्या दोन्ही कांठांवर मूरशिदकुलीखान व अलीवर्दीखान यांच्या दोन्ही फौजा समोरासमोर खंदक खणून ५।६ महिने पडून होत्या. मधून क्वचित् एखादी चकमक झडे इतकेंच. शेवटीं ता. ३ मार्च सन १७४१ रोजीं फुलवारीजवळ या दोन्ही सैन्यांची जंगी लढाई झाली. शेरे मुताखरीन ग्रंथांत या लढाईचें विस्तृत वर्णन दिलें आहे. त्यांतील निकालाचे मुख्य मुद्दे असेः— मूरशिदकुलीखानाचा या लढाईंत सपशेल पराभव झाला, तो त्याचें सैन्य अपुरें अगर त्याचे सरदार कमी शूर म्हणून नव्हे. त्याचा तोफखाना अलीवर्दीच्या वरचढ होता. हिंदू राजेजमीनदारांची त्यास मदत होती, उलट या तद्देशीय राजेरजवाडे यांनीं अलीवर्दीस मदत केलीच नाहीं, उलट प्रत्येक ठिकाणीं पदोपदीं त्यास अडथळा आणून दाणा, वैरण, धान्यधुन्य अलीवर्दीस मिळूंच दिलें नाहीं. त्यामुळें अलीवर्दीच्या येवढ्या मोठ्या सैन्यास उपास पडण्याची वेळ आली ! मूरशिदकुलीचा जांवई मिरझा बाकर यानें आणखी ७।८ दिवस लढाई पुढें ढकलली असती तर उपासमारीनेंच अलीवर्दीस माघार घेणें प्राप्त झालें असतें ! परंतु दिवसामागून दिवस व महिन्यामागून महिने लढाई न करितां शत्रु समोर दिसत असतां माशा मारीत स्वस्थ बसणें मिरझा बाकरला न पटून येवढ्या मोठ्या तोफखान्याचा उपयोग करून न घेतां खंदकांतून बाहेर निघून अलीवर्दीच्या सैन्यावर त्यानें अविचारानें हल्ला चढविला. मूरशिदकुलीची तयारी पाहून अलीवर्दीसही आपल्यास जय मिळेलच अशी खात्री नव्हती. तेव्हां त्यानें त्याच्या गुप्त शस्त्राचा म्हणजे भेदनीति

ऊर्फ फितुरीचा अवलंब केला होता. मूरशिदकुलीच्या सैन्यांत कडवे अफगाण लोक पुष्कळ होते. अलीवर्दीखानाचा एक हस्तक सरदार मुस्तफाखान त्याच कडव्या अफगाणांपैकीं होता. त्यानें मूरशिदकुलीचा एक अफगाण सरदार अबदुरखान (अबिदखान) यास फितविलें ! मिरझा बाकरनें अविचारानें एकाएकीं लढाई सुरू केल्यामुळें या फितूर अबदुरखानानें लढाईचा मोठाच खोटा आव आणला. मुस्तफाखानावर तो एकदम जोरानें चालून गेला. मुस्तफाखानानें प्रतिहल्ला न करितां त्यास अंगावर घेऊन स्वतःही माघार घेतली. या दोन्ही बाजूंच्या फौजा एक झाल्याबरोबर अबदुरखानानें तोंड फिरवून दोघांनीं मूरशिदकुलीखानावर जोराचे हल्ले सुरू केले ! एखाद्या सरदाराच्या तुकडीच्या फितुरीनें मूरशिदकुलीखानाचा पराभव झाला नसता, परंतु मिरझा बाकरनें तोफखान्याच्या आश्रयानें लढाई न देतां अविचारानें शत्रूवर तुटून पडून हातघाई सुरू केली ! त्याचा परिणाम त्यास मानेस व इतर पांच सहा जखमा झाल्या व त्यास रणांगणावरून मागें ओढून न्यावें लागलें. अशा कारणांनीं मूरशिदकुलीखानाचा पराजय होऊन अलीवर्दीस जय मिळाला !

मूरशिदकुलीखान आपल्या जखमी जांवयास घेऊन बालासोर बंदरांत आला. कर्मधर्मसंयोगानें मूरशिदकुलीच्या सुरतच्या एका मित्राचें व्यापारी जहाज त्या बंदरांत नांगरून पडलें होतें, त्यांत बसून तो मछलीपट्टमकडे पळून गेला व तेथून तो हैदराबादेस गेला ! जांवई मिरझा बाकरखान याच्या जखमा बऱ्या होत आल्या होत्या. त्यास चिकाकोल येथें उतरून कटक येथून बायकामुलांना आणण्यास पाठविलें. तो कटकला पोंचण्यापूर्वीच मूरशिदकुलीच्या एका हिंदू मित्रराजानें (रतिपूरचा राजा) त्याचीं बायकामुलें व अपार संपत्ति बाहेर काढून चिकाकोल गंजमकडे सुरक्षित पोंचविली ! या हिंदू राजानें मुसलमान मित्राच्या बायकामुलांस दगाफटका न करितां व हातीं आलेल्या संपत्तीचा अपहार न करितां स्वतःचे लोक बरोबर देऊन सुरक्षित पोंचविलें ! ही एक आश्चर्यकारक गोष्ट आहे, असा शेरा " शेरे मुताखरीन " च्या लेखकानें दिला आहे. त्याचें म्हणणें असें कीं, सर्वसाधारण हिंदू लोकांत विश्वासूपणा नसतो व मित्र असो अगर कोणी असो " दगाफटका व संपत्तीचा अपहार करणें " या गोष्टी हिंदू लोकांत नित्याच्या व्यवहारांत असतात ! विश्वासघातकीपणाची मालिका याच ग्रंथांतून (अलीवर्दीनें व त्याच्या लोकांनीं केलेली) आम्हीं या लेखमालेंत दिली आहे म्हणून बरें ! चिकाकोल येथें मूरशिदकुलीचा एक अनवरुद्दीन नांवाचा मित्र होता. त्यानें या बायकामुलांना सुरक्षितपणें हैदराबाद येथें पोंचविलें. मूरशिदकुलीचा प्रमुख सरदार मीर हबीब हाही त्याच्याबरोबर हैदराबाद येथें गेला.

कटकचा नायब सुभेदार, सय्यद अहमदचे भीषण अत्याचार

मूरशिदकुलीखान पळून गेल्यावर अलीवर्दीखानानें कटक सर केलें व तेथें आपला पुतण्या व जांवई सय्यद अहमद यास नायब सुभेदार नेमलें

व स्वतः मूरशिदाबादेकडे परतला. हा तरुण नायब सयद अहमद कटक येथें असतां त्याच्या लहानपणचा एक शालेय सोबती पुढें फकीर बनून हिंडत हिंडत कटक येथें आला होता. या फकिराचें नांव शहायाह्या असें होतें. बाळपणच्या मैत्रीचा फायदा घेऊन या फकिरानें सयद अहमदावर चांगलीच मोहिनी घातली ! सयद अहमदचा तो अत्यंत विश्वासांतला जिव्हाळ्याचा मित्र व मार्गदर्शक बनला ! हा मनुष्य फकीर वेशांत राही तरी अत्यंत दुर्गुणी, अनाचारी व अत्याचारी होता. आस्तेकदम या फकिरानें राज्यकारभारांत हात शिरकावला. वसुलीचे निरनिराळे प्रकार तो सयद अहमदास सुचवी. जुन्या अमदानींतील सुखवस्तू लोकांच्या घरावर छापे घालून "पहिल्या सुभेदाराची संपत्ति येथें आहे" ती मागण्याचे निमित्तानें घरमालकाचीच संपत्ति लुबाडणें, बायकापोरींना ओढून सयद अहमदपुढें नेणें, त्यांचा मानभंग करणें, त्यांच्यावर अत्याचार करणें, इत्यादि गोष्टी उघड उघड दिवसाढवळ्या होऊं लागल्या ! एक उच्च दर्जाचा खास अलीवर्दीखान नबाबाचा पुतण्या व जांवई कटकचा नायब सुभेदार सयद अहमद व दुसरा सर्वसंगपरित्याग केल्याचें ढोंग करणारा फकीर शहायाह्या ! वारे गुरुशिष्यांची दुक्कल !

वरील फकिराचें राहण्याचें ठिकाण म्हणजे न्यायकचेरीच बनली व हा फकीर न्यायाधीश बनला ! हा जो निकाल देईल तोच न्याय ! गांवांत सुस्वरूप वा सुंदर स्त्री दिसली कीं तिला जबरदस्तीनें सुभेदाराकडे नेण्यांत येई व तिच्यावर अत्याचार होई ! स्त्रियांच्या पातिव्रत्याची व जीविताची सुरक्षितता नाहींशी झाली, मग संपत्तीची सुरक्षितता कोठून राहावी ? या अत्याचारी अन्यायी राजवटीचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसल्यानें नवे जुने अधिकारी गांव सोडून निघून गेले. गांवांत राहिले त्यांचें जीवित धोक्यांत राहिलें. हे अत्याचार कळसास पोंचले, तेव्हां त्याचा परिणाम साहाजिक सयद अहमदाविरुद्ध जिकडे तिकडे लहान लहान गट व यांतूनच पुढें एक विशाल कट तयार होण्यांत झाला. या कटांत हिंदु-मुसलमान, श्रीमंत-गरीब सर्वच सामील होते. या परिस्थितीचा फायदा पूर्वीच्या नायब सुभेदाराचा जांवई मिरझा बाकर यानें घेतला. कटकच्या आसपास दबा धरून आसपासच्या राजेजमीनदारांशीं पत्रव्यवहार ठेवून त्यांचीही त्यानें मदत मागितली. कटक येथें त्याची जुनी मंडळी होतीच. सयद अहमदच्या सैन्याची सर्व माहिती त्यानें मिळविली. अलीवर्दीनें गुजरखान नांवाचा एक विश्वासू शूर सरदार ठेवला होता. त्याच्या थोड्या लोकांचाच काय तो अडथळा येण्याचा संभव होता. त्याचा प्रतिकार करावयाचें ठरून एके दिवशीं सबंध शहरांत सयद अहमदच्या अत्याचारांविरुद्ध हुल्लड उठून उघड उघड बंडाची उठावणी झाली. ज्या सयद मुराद नांवाच्या विश्वासू मनुष्यानें रतिपूरच्या राजास

मूरशिदकुली व मिरझाबाकरचीं बायकामुलें सुरक्षित काढण्यास मदत केली होती त्यानें या बंडाचें पुढारीपण घेतलें. गुजरखान सयद अहमदच्या भेटीस जात असतां बंडवाल्यांनीं त्यावर अचानक हल्ला करून त्यास ठार मारलें. त्यामुळें बंडवाल्यांचें काम हलकें झालें. मिरझा बाकर स्वतः कटक येथें आला. तेव्हां सयद अहमदच्या वाड्याच्या रखवालदारांनीं दरवाजे बंद केले. " बऱ्या बोलानें दरवाजे उघडले नाहींत तर मिरझा बाकर तुमची चटणी उडवील " अशा धमक्यांमुळें त्या शेंदाड शिपायांनीं दरवाजे उघडले. मिरझाबाकरनें सयद अहमदास कैद केलें. त्याच्या बायकामुलांना बाराबटी किल्ल्यांत बंदींत ठेवलें ! सयद अहमदचा खजिना ताब्यांत घेतला ! कटक ताब्यांत घेतलें ! या बातम्या अलीवर्दीखानास मिळाल्यावर तेथें हाहाःकार उडाला. कारण सयद अहमद हा हाजी अहमदाचा मुलगा व या मुलाची बायको ती अलीवर्दीखानाची मुलगी ! यामुळें काळजीची काळी कळा मूर्शिदाबादेवर पसरली होती ।

नबाबाची काळजी

विशेषतः सयद अहमदचा बाप हाजी अहमद यास व आईस विशेष काळजी लागली ! या सर्वांच्या सुटकेची काय योजना करावी याच्या वाटाघाटी रात्रंदिवस चालू झाल्या. हाजी अहमद व त्याची बायको यांनींही त्यांत भाग घेतला. कसाही असला तरी तो यांचा मुलगाच होता. तेव्हां " सयद अहमद व त्याचीं बायकापोरें यांच्या सुटकेकरितां सबंध कटक प्रांत द्यावा लागला तरी मिरझा बाकरला द्यावा, पण सर्वांची सुटका झाली पाहिजे " परंतु असें झाल्यास त्यांत खुद्द नबाबाच्या मानहानीचा मोठाच प्रश्न होता. अलीवर्दीस ही सूचना मुळींच पसंत पडली नाहीं. त्यानें कटकवर स्वारी करण्याकरितां ५०।६० हजार फौज जमा केली. मुस्तफाखान, मिरजाफरखान वगैरे सरदारांसह तो निघाला. निघण्यापूर्वी हाजी अहमद व भावजय यांची भेट घेऊन त्यांना असा निर्वाळा दिला कीं, " मी परत येतांना सयद अहमदास व त्याच्या बायकामुलांस घेऊन येईन व मी नच आलों तर तुमची माझी हीच शेवटची भेट समजा !

नबाबाचीं पोकळ वचनें

येवढ्या मोठ्या सैन्यासह अलीवर्दीखान कटक जवळ दर कूच दर मजल आल्यावर त्यानें सैन्यांत जाहीर खबर कळविली कीं, जो कोणी सयद अहमदास सोडवून आणील त्यास एक लक्ष रुपये रोख बक्षीस मिळतील. इतकेंच नव्हे, तर सोडविणारा सरदार असेल तर त्याच्या हाताखालील प्रत्येक लढवय्यास प्रत्येकीं दोन महिन्यांचा पगारही बक्षीस मिळेल !

मिरझा बाकरला ही सर्व बातमी मिळत गेली. येवढ्या मोठ्या सैन्यास कसें तोंड द्यावें या विवंचनेंत तो होता. परंतु ज्या अर्थी हें काम एकदां अंगावर घेतलें त्या अर्थी तें तडीस नेलेंच पाहिजे, अशा विचारानें त्यानें जितकें सैन्य उभारतां आलें तितकें उभारलें. तोफखाना जमवून महानदी ओलांडून बराच पुढें जाऊन तेथें त्यानें सैन्याची मांडणी केली. अलीवर्दीखान कटकपासून एक दिवसाच्या वाटेवर आला होता. त्या रात्रीं १२ वाजतां तो एकदम चाल करून येणार ही बातमी लागल्यानें, सय्यद अहमदास एका गाडीवर बसवून त्या गाडींत हाजी अमीन यास सशस्त्र ठेवून बाहेरून ती गाडी पांढऱ्या कनातींनीं गुंडाळून व बांधून त्याभोंवतीं सशस्त्र पाहरा ठेवून ती गाडी आपल्या सैन्याच्या पिछाडीस उभी केली. त्या सर्वांभोंवती ५०० दक्षिणी (तेलगू) स्वारांचा गराडा ठेवून बंदोबस्तांत तो राहिला. गाडीच्या बाहेरील पहारेकऱ्यांना मिरझाबाकरनें हुकूम दिला कीं, शत्रु जवळ आलासें दिसलें कीं, पहारेकऱ्यांनीं पडद्याबाहेरून तरवारीनें भोंसकून सय्यद अहमदास ठार मारावें, जिवंत सुटूं देऊं नये।

सय्यद अहमदची सुटका !

पहांटेच्या वेळीं अलीवर्दीखान मिरझा बाकरसमोर उभा राहिला. सय्यद अहमदास वरीलप्रमाणें गाडींत बांधून ठेविलें आहे, ही बातमी त्यास समजली. मुस्तफाखान व मिरजाफरखान या दोघांकडे सय्यद अहमदास सोडवून आणण्याची कामगिरी सोंपविली होती. सय्यद अहमदच्या गाडीभोंवतीं सशस्त्र पाहारा आहे वगैरे माहिती मिळाल्यावर मिरझा बाकरच्या सैन्यास वळसा घालून मिरजाफरखान पिछाडीस गेला. मिरजाफरचा मेहुणा महमद अमरखान, उमरखानाचे दोन मुलगे असालत व अमरखान यांसह आणखी ८।१० माणसें घेऊन मुस्तफाखानाच्या व मिरजाफरखानाच्या तुकडीच्या अघाडीस गेला. हे अलीवर्दीचे लोक ओळखून एकानें सय्यद अहमदास ज्या गाडींत ठेवलें होतें, ती गाडी दाखविली. अमरखानानें गाडीवर चाल केली. अशा प्रकारचा हल्ला होण्याचा थोड्या वेळापूर्वी संभव नव्हता. वेळ रात्रीची होती तरी उकाड्यामुळें व गाडी कनातीनें बांधल्यामुळें अंगाची तलखी होत होती. तेव्हां थोडा बदल करण्याच्या इरादानें सय्यद अहमदनें हाजी अमीनास स्वतःच्या जागीं बसण्यास विनवून आपण त्याच्या जागीं बसला. कनातीच्या आंतील अदलाबदल माहीत नसल्यानें बाकरखानाच्या हुकमान्वयें अमरखानाचा हल्ला आल्याबरोबर बाहेरील पहारेकऱ्यांनीं गाडी बाहेरून पडद्यांतून भोंसकण्यास सुरवात केली, परंतु त्याचा परिणाम हाजी अमीन बसला होता त्यावरच हे मार लागले। सय्यद अहमदानें प्रसंगावधान ठेवून तो त्या गाडींत सपशेल निजून गेला. एकाएकीं अलीवर्दीचे लोक गाडीवर

आल्यानें गाडीबाहेरचे संरक्षक लोक थोड्याच वेळांत स्वतःच्या जिवाच्या भयानें पळून गेले. महमद अमरखानानें सय्यद अहमदास जीवंत बाहेर काढला. आपला घोडा त्यास बसावयास दिला. मिरझाफरखान व मुस्ताफाखानहि त्यांच्या तुकडीसह तेथें आले. मिरजाफरनें सय्यद अहमदास आपल्या हत्तींवर बसवून आपण त्याचा संरक्षक म्हणून मागें बसला. अशा प्रकारें केवळ अल्लाच्या कृपेनें सय्यद अहमद जीवंत सुटला! ही आनंदाची बातमी अलीवर्दीस ताबडतोब कळविण्यांत आली. अलीवर्दीनें सय्यद अहमदास पोटाशीं धरलें, सुटकेप्रीत्यर्थ निमाज पढले, खैराती वांटल्या. सय्यद अहमदास पोशाखखिलात नजर केली व मानमरातबानें त्यास तक्तावर बसविलें.

मिरझाबाकरचें अलीवर्दीखानाच्या सैन्यापुढें कांहीं न चालून त्याचे लोक मागें पळूं लागले. महानदीजवळ त्यानें थोडी लढाई दिली, परंतु अखेर तोही निघून गेला.

अलीवर्दीखानानें बाराबटी किल्ल्यांत शिरून सय्यद अहमदच्या कुटुंबास म्हणजे स्वतःच्या मुलीस बंधमुक्त करून आणलें. ही सर्व मंडळी परत सुखरुप मुर्शिदाबादेस गेली. अलीवर्दीखान आरामानें येत होता. त्यानें शहामहमद मसून पानिपती नांवाचा एक शूर सरदार कटकचा नायब म्हणून नेमला. तो कटकला गेला व अलीवर्दीखान मिदनापूरच्या भागांत स्वाऱ्या शिकाऱ्या करीत मजेंत काळ काढीत होता. येवढें मोठें बंड त्यानें मोडलें होतें, त्यामुळें त्यास हायसें झालें होतें. आतां येवढ्या मोठ्या सैन्याची कांहीं गरज नाहीं म्हणून त्यानें बरेंच मोठें सैन्य कमी करून टाकलें! वरील बंड मोडण्याच्या कामीं त्याच्या सैन्यानें पुष्कळ कष्ट केले होते. सय्यद अहमदास जीवंत सोडवून आणल्यास १ लक्ष रुपये रोख व प्रत्येक सैनिकास दोन महिन्यांचा पगार जास्त देईन, इत्यादि वचनें नबाब अलीवर्दीखानानें दिलीं होतीं. तीं त्यानें पूर्ण केलीं काय? वाचकहो, मुळींच पुरीं केलीं नाहींत. विश्वासघात व खोटीं वचनें यांवरच अलीवर्दीखानाची प्रगति होत गेली ही गोष्ट आतांपर्यंत आपण पाहिली!

(३)

भोंसल्यांचा बंगालवरील स्वाऱ्यांचा उपक्रम व सेनापति भास्करराम कोल्हटकर याचें अल्पचरित्र

मागील भागांत दर्शविल्याप्रमाणें बंगालवरील राजकीय सत्ता अलीवर्दीखानाच्या हातांत आल्यावर मराठी साम्राज्याचा सर्व भरतखंडभर प्रसार करणाऱ्या शाहू छत्रपतीच्या कर्तृत्ववान् सरदारांचें बंगाल प्रांतासारख्या सुपीक व संपन्न प्रदेशाकडे

लक्ष वेधलें गेलें. शाहू छत्रपतींची मराठी साम्राज्यावर स्थापना झाल्यावर त्यांच्या दरबारांतील कर्तबगार सेनापति बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव, चिमाजी आप्पा, प्रतिनिधि भोंसले इत्यादिकांकडे मराठी राज्याच्या विस्ताराच्या धोरणाच्या सिद्ध्यर्थ शाहू छत्रपतींनीं या सरदारांना निरनिराळ्या प्रांतांवर स्वाऱ्या करण्याच्या कामगिऱ्या सोंपविल्या. मराठी राज्याच्या विस्ताराचें हें धोरण सिद्धीस नेतांना या सरदारांत परस्पर विरोध टाळण्यास्तव आक्रमणाची निश्चित योजना ठरली नसल्यामुळें शाहू छत्रपतींच्या सरदारांत या बाबतींत थोडक्याच काळांत विरोध उत्पन्न होऊं लागला. त्याचीं प्रत्यक्ष उदाहरणें म्हणजे पहिले बाजीराव व दाभाडे यांच्या गुजराथ प्रांतावरील आक्रमणबाबत आलेली तेढ हें आहे. बंगाल प्रांतापुरतें बोलावयाचें झाल्यास नानासाहेब पेशवे व रघूजी भोंसले या उभयतांमध्यें उपस्थित झालेली तक्रार ही होय. या तक्रारीचा शाहू छत्रपतींनीं बंगाल व ओढिसा प्रांतावर अतिक्रमण करण्याची कामगिरी एकट्या नागपूरकर भोंसल्यावर सोंपविली व त्या प्रांतावर अतिक्रमण करण्याची पेशव्यांस मनाई केली. या घटनेचा उल्लेख सविस्तरपणें पुढें करण्यांत आला आहे. शाहू छत्रपतींच्या या हुकुमान्वयें बंगालवर भोंसल्याच्या ज्या स्वाऱ्या झाल्या त्यांत सेनापती भास्करराम कोल्हटकर हा प्रमुख असून त्यानें केलेली कामगिरी श्रेष्ठ प्रतीची आहे व तीच हकीकत या भागांत पुढें देण्यांत आली आहे.

ही हकीकत देण्यापूर्वी शाहू छत्रपतींशीं रघूजीचा संबंध कसा जुडला याचें किंचित् दिग्दर्शन करतों. रघूजीचा जन्म वांई (जिल्हा सातारा) च्या नजीक पांडेवाडी येथें झाला. तो मोठा झाल्यावर त्याचा चुलता राणोजी भोंसला याचे लष्करांत तो सामील झाला. त्यानंतर त्याचे लष्करांतून निघून दुसऱ्या दोन तीन सरदारांचे पदरीं राहून अखेर साताऱ्यास शाहू छत्रपतींपाशीं येऊन तो राहिला. त्यानंतर तो फत्तेसिंग भोंसल्याच्या लष्करांत राहून त्याचेबरोबर मोहिमेस जात असे. फत्तेसिंगचे लष्करांत तो असतांना त्यानें चांगल्या प्रकारची कामगिरी केली. यामुळें शाहूचें लक्ष त्याचेकडे वेधलें गेलें व इ. स. १७२९ सालांत शाहूनें रघूजीस वऱ्हाड सोडविण्याची सनद दिली व त्याचेकडून खालील करार करून घेतला.

(१) रघूजीनें पांच हजार स्वार सरकारच्या चाकरीकरितां बाळगावे.

(२) दरसाल नऊ लक्ष रुपये सरकारांत भरीत जावे.

(३) घासदाण्याची रकम रघूजीनें घ्यावी.

(४) इतर खंडण्या, लढाईवरील लूट वगैरे उत्पन्नांपैकीं निम्मे रघूजीनें घ्यावें व निमे सरकारांत जमा करावें.

(५) सरकारास जरूर लागेल तेव्हां दहा हजार लष्कर उभें करावें.

६. पेशवा ज्या वेळेस मोहिमेवर जाईल त्या वेळेस रघूजीनें आपल्या लष्करासह पेशव्याबरोबर जावें, अगर दुसरीकडे कोठें पाठविल्यास तिकडे जावें.

(Grant Duff Vol. I Page 378)

शाहूनें रघूजीस दिलेल्या या सनदेनंतर इ. स. १७३८ सालांत रघूजीनें शाहूकडून एक नवीन सनद घेतली. तींत पुढील मुलखावर मराठ्यांचा अंमल प्रस्थापित करण्याचा अधिकार रघूजीस शाहूनें दिला. " लखनो, मुर्शिदाबाद, बेदर, बंगाला बितिया, बुंदेलखंड, इलाहीबाद, हाजीपूर, पाटणा शिवाय देवगड, गडा, भवरगड, चांदा या प्रांताची चौथाई व मोकासा हे हक्क वसूल करण्याचा अधिकार रघूजीस देण्यांत आला. "

याप्रमाणें रघूजीस सनद मिळाल्यावर बंगाल प्रांतावर इ. स. १७४२ सालापासून मराठ्यांच्या स्वाऱ्या रघूजीचा सेनापति भास्करराम कोल्हटकर याच्या आधिपत्याखालीं होऊं लागल्या व ज्याची सविस्तर हकीकत यापुढें निवेदन करण्यांत आली आहे, तत्पूर्वी बंगाल प्रांतावर स्वतः रघूजीनें एक स्वारी केली. प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक ग्रंथांत या स्वारीचा वृत्तांत निवेदन केलेला आढळत नाहीं, परंतु या स्वारीच्या हकीकतीचें एक पत्र अथपासून इतीपर्यंत रघूजीनें स्वहस्तें लिहिलेलें उपलब्ध झालें आहे. *

आतां या पत्रावरून उपस्थित होणाऱ्या एक दोन मुद्द्यांचें दिग्दर्शन करतों. या पत्रांत कालाचा व स्थलाचा निर्देश नाहीं. त्याचप्रमाणें रघूजीनें ज्या किल्ल्यास वेढा घातला त्याच्या नांवाचा, त्याचप्रमाणें ज्या पंजाबी जाठानें त्यास अडवलें त्याच्या नांवाचाही उल्लेख नाहीं. या पत्रांत हे दोष जरी आहेत तथापि त्या पत्राचा काळ इतिहासांत नमूद असलेल्या अन्य घटनांवरून ठरवितां येतो. इ. स. १७३५ सालीं नागपूरप्रांत रघूजीचे अमलाखालीं आला. त्यानंतर बंगालप्रांत नागपूर प्रांतास लागून असल्यामुळें तो आक्रमण्यास सोइस्कर असल्याचें रघूजीचे निदर्शनास आलें व त्यानें शाहूशीं झालेल्या भेटींत या प्रांतावर आक्रमण करण्याची आपली इच्छा दर्शवून वर नमूद केल्याप्रमाणें इ. स. १७३८ मध्यें वर नमूद केलेली सनद त्यानें शाहूकडून मिळविली. त्यानंतर वरील पत्रांत ज्या स्वारीचा उल्लेख केला आहे, ती पहिली स्वारी रघूजीनें स्वतः बंगाल प्रांतावर केली असें दिसतें. ही स्वारी रघूजीनें कोणत्या मार्गानें केली तें समजण्यास साधन

* हें अस्सल पत्र राजवाडे संशोधन मंदिराचे संग्रहांत आहे. चित्रमयजगतांत व कै. द. वि. आपटेकृत महाराष्ट्र इतिहास मंजरी (पृ. २८) या पुस्तकांत यापूर्वी तें प्रसिद्ध झालें असून त्याचें छायाचित्रही तेथें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. या पत्रावरून मराठ्यांच्या बंगालवरील स्वाऱ्यांचा उपक्रम इ. स. १७३८ सालांत रघूजीस शाहूकडून सनद मिळाल्यावर झाला असें विधान करण्यास प्रत्यवाय नाहीं.

नाहीं. भास्कररामानें बंगालप्रांतांवर ज्या स्वाऱ्या केल्या त्या गोंडवण, छत्तीसगड, छोटानागपूर या मार्गानें केल्या. या मार्गांत पत्रांत नमूद केल्याप्रमाणें चार महिने लढवितां येण्यासारखा किल्ला नाहीं. ही गोष्ट लक्ष्यांत घेतां, रघूजीनें केलेली ही स्वारी जबलपूर – बुंदेलखंड या मार्गानें केली असावी असें दिसतें. यानंतर प्रांतांतील राजकीय घडामोडींतून बंगालप्रांतावरील भोंसल्यांच्या स्वाऱ्यांचा उद्भव कसा झाला याचें अल्प दिग्दर्शन करतों.

बंगालचा सुभेदार सुजातखां इ. स. १७३९ त मरण पावल्यावरत्याचा मुलगा सरफराजखान यानें आपल्या नांवानें सुभेदारीची सनद मिळविली. त्याच वेळीं अलीवर्दीखानानें चिन्कुलीच खान निजामउल्मुलुखाचे मार्फतीनें बंगालच्या सुभेदारीची सनद मिळविली व राजद्रोहाबद्दल सरफराजखान याचा शिरच्छेद करण्याचा हुकूम मिळविला. त्यानंतर अलीवर्दीखानानें सरफराजखानावर स्वारी करून त्याचा गढीया येथें झालेल्या लढाईत पराभव केला व त्यास ठार मारिलें. सरफराजखानाचा मेहुणा मुर्शिदकुलीखान हा ओढियाचा सुभेदार होता व त्याचे कडून सरफराजखानानें सैन्याची मदत मागितली होती. सबब अलीवर्दीखानाचा त्याचेवर रोष होऊन त्यानें त्याचेवर स्वारी केली व त्याच्या ताब्यांतील ओढिया प्रांत पादाक्रांत केला. या सर्व बनावामुळें मुर्शिदकुलीखानाचा मीर हबीब या नांवाचा एक प्रामाणिक सरदार होता त्यास अलीवर्दीखानाच्या कपटी स्वभावाची चीड येऊन या त्याच्या कृत्याबद्दल त्याचा सूड रघूजी भोंसल्याच्या साहाय्यानें घेण्याचें त्यानें ठरविलें व तो रघूजीच्या भेटीकरितां नागपुरास आला. रघूजीच्या परवानगीनें भास्कररामानें बंगाल प्रांतावर पहिली स्वारी केली. यानंतर बारा वर्षें बंगाल प्रांतावर भोंसल्यांनीं स्वाऱ्या करून अलीवर्दीखानास त्रस्त करून सोडलें. या सर्व स्वाऱ्यांत मीरहबीब यानें मराठ्यांस फार मदत केली.

या बंगालवरील भोंसल्याच्या पहिल्या स्वारीचे सुमारास नानासाहेब पेशवा उत्तर हिंदुस्थानांत बुंदेलखंडांत तळ देऊन होता. माळवा, बुंदेलखंड व गढामंडला हे प्रांत नानासाहेबांनीं हस्तगत केले. उत्तर हिंदुस्थानांतील प्रांतांच्या व माळव्याच्या चौथाईच्या सनदा दिल्लीच्या बादशहाकडून मिळविण्याचें, त्याचप्रमाणें काशी, प्रयाग, गया इत्यादि क्षेत्रें मोंगलांचे ताब्यांतून घेण्याचें कारस्थान राजा सवाई जयसिंग व निजामउल्मुलख यांच्या मध्यस्थीनें नानासाहेबांनीं सुरू केलें होतें. भास्कररामानें बंगालप्रांतावर स्वारी केल्यावर अलीवर्दीखानानें बादशहाकडे भास्कररामापासून स्वतःचा बचाव करण्याकरितां मदत मागितली. दिल्लीच्या बादशहानें अलीवर्दीखानाचें रक्षण करण्यास नानासाहेब पेशव्यास कळविलें व स्वारीसंबंधीं होणाऱ्या खर्चाची रकम नानासाहेब पेशव्यास देण्याविषयीं अलीवर्दीखानास हुकूम केला. नानासाहेबास या कामगिरीचे कामीं दोन्हीकडूनही

मोठाच पेंच पडला. बादशहाचें सांगणें अमान्य केलें तर त्याचेकडे वर दर्शविल्याप्रमाणें चौथाईच्या सनदा मिळविण्याच्या राजकारणाचा बिघाड होत होता. जर त्याच्या मदतीस जावें तर मराठी साम्राज्याच्या एका सरदारावर पेशव्यांनीं स्वारी करणें म्हणजे आपसांतील दुही जगाच्या निदर्शनास आणणें होय. अशा पेंचांत रघूजीनें पहिल्या बाजीरावांशीं केलेलें वर्तन ध्यानांत आणून अलीवर्दीखानास मदत करण्याचें नानासाहेबानें ठरविलें व बंगाल प्रांताकडे आपला मोर्चा वळविला. परंतु अलीवर्दीखानानें सैन्याची जमवाजमव करून भास्कररामाचा इ. स. १७४२ चे दसऱ्याचे सुमारास नानासाहेब पेशव्याची मदत न घेतां मोड केला व तो नागपुराकडे परत फिरला. त्यानंतर बंगाल प्रांतावर रघूजीनें इ. स. १७४३ सांत स्वतः स्वारी केली. रघूजी कटवा व बरद्वान या बाजूनें अलीवर्दीखान व नानासाहेब पेशवा यांच्या लष्करावर चालून गेला. अलीवर्दीखानानें रघूजीवर चाल करतांच तो त्यास झुकांडी देऊन मागें फिरला. नानासाहेब पेशव्यानें दुसऱ्या रस्त्यानें कूच करून रघूजीस गांठलें व त्याच्यावर आपल्या सैन्यासह हल्ला करून त्याचा पराभव केला. यानंतर उभयतांमध्यें समेट झाला व त्यांचे दरम्यान पुढीलप्रमाणें करार ठरला. राजकारणाच्या दृष्टीनें दिल्लीचे बादशहाशीं नानासाहेबांनीं चालविलेलें राजकारण हिताचें असल्यामुळें त्याचेंच धोरण योग्य आहे, असें रघूजीनें कबूल केलें. उलट पेशव्यानें रघूजीबरोबर सलोख्यानें वागण्याचें कबूल केलें व उभयतांच्या कार्यक्षेत्राच्या मर्यादा शाहू छत्रपति ठरवितील त्या मान्य करून त्याप्रमाणें उभयतांनीं वर्तन करावें, असा करार ठरला. याप्रमाणें उभयतांत सलोखा झाल्यावर रघूजी नागपुरास आला. यानंतर बंगाल प्रांतावर भोंसल्यांच्या ज्या स्वाऱ्या झाल्या त्यांत पेशव्यांकडून कोणत्याही प्रकारचा अडथळा रघूजीस झाला नाहीं.

आतां बंगाल प्रांतावर यापुढें ज्या स्वाऱ्या झाल्या त्यांत प्रामुख्यानें भाग घेणारा रघूजीचा सेनापति भास्करराम याचा अल्प परिचय वाचकांस आम्ही करून देतों.

नागपूरकर भोंसल्यांचा सेनापति भास्करराम कोल्हटकर यांचें पूर्वचरित्र

भास्कररामाचे वडील रामाजी नारायण कोल्हटकर नाईक हे कोंकणांत रत्नागिरी जिल्ह्यांतील नेवरें गांवचे रहाणारे व तेथील देशमुख होत. हे संभाजी महाराजांच्या कारकार्दीच्या अखेरीस देशावर आले. त्यांनीं देशावर सातारा जिल्ह्यांतील श्रीक्षेत्र वांईनजीक कृष्णातीरीं असलेलें पांडववाडी हें लहानसें पण रम्य असें गांव राहण्यास पसंत केलें. हे श्रीरामाचे उपासक होते. त्यांनीं नेवरें व

पांडववाडी या ठिकाणीं रामाचें एकेक मंदिर बांधिलें. या दोन्हीं गांवीं हे जाऊन येऊन असत. त्यांचा जाण्यायेण्याचा मार्ग जोरखोरें व कोयनाखोरें यांच्या तोंडावर घांटाच्या तोंडीं असलेल्या भैरवगडावरून असे. या भैरवगडास हिंगणीकर भोंसले घराण्यापैकीं बापूजी, परसोजी व साबाजी असें बंधुत्रय आपापल्या कुटुंबासह राहत असे. रामाजी नाईक कोल्हटकर हे गृहस्थाश्रमी असले तरी श्रीरामाचे उपासक व साधुवृत्तीनें राहणारे होते. जातां येतांना ते या भोंसले बंधुत्रयाकडे मुक्कामास राहत असत व भोंसले बंधूंची यांच्या ठिकाणीं भक्ति असल्यानें तेही मोठ्या भक्तिभावानें त्यांना राहून घेत असत.

एकदां जंजिऱ्याच्या हबशानें भैरवगडाकडे स्वारी करून या भोंसले बंधूंची सर्व मालमत्ता लुटून व घरेंदारें उद्ध्वस्त करून त्या तिघां बंधूंना त्यानें आणखी पैशाकरितां पकडून नेऊन अटकेंत ठेविलें. ही गोष्ट रामाजीपंतांना समजल्यावर त्यांनीं हबशाची गांठ घेतली. हबशानें या तिघां बंधूंच्या मुक्ततेकरितां ३ हजार रुपये मागितले. रामाजीपंतांनीं कोकणांतील आपली कांहीं जमीन वगैरे विकून तीन हजार रुपये हबशास भरून त्या तिघां भोंसले बंधूंची मुक्तता केली! इतकेंच नव्हे तर भोंसल्यांची भैरवगडची मालमत्ता व घरेंदारें उद्ध्वस्त झाल्यानें त्या तिघां बंधूंना सहकुटुंब पांडववाडीस आणून त्यांची राहण्याची व्यवस्था केली!

या भोंसले बंधूंपैकीं बापूजीचा मुलगा बिंबाजी यास पुत्रसंतान नव्हतें. तें होईल असा आशीर्वाद रामाजीपंतांनीं दिला व बिंबाजीस मुलगा झाला. तो रामाजीपंताच्या आशीर्वादानें व श्रीरामचंद्राच्या कृपेनें झाला म्हणून या मुलाचें नांव रघूजी असें ठेविलें व हाच पुढें नागपूरकर भोंसल्यांचा पराक्रमी मूळ पुरुष रघूजी भोंसला म्हणून प्रख्यातीस आला. अशा प्रकारें या रामाजीपंत कोल्हटकरांचा व भोंसलेबंधूंचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता.

रामाजीपंतास कोन्हेर व भास्कर असे पुत्र होते. ते कोन्हेरराम व भास्करराम या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहेत. रघूजी भोंसल्यांचा कोन्हेरराम व भास्करराम या दोघां बंधूंशीं पुढें दिसून आलेल्या घनिष्ठ संबंधाचें कारण आतां वाचकांच्या ध्यानांत आलें असेल.

प्रत्यक्ष शाहूमहाराजांच्या व रामाजीपंताच्या गांठीभेटी होत असत व या दोघांचाही बराच घरोबा होतासें दिसतें. रामाजीपंताचा मोठा मुलगा कोन्हेरराम याचें लग्न शाहूमहाराजांनींच विठ्ठल कान्हो ठोसर याच्या कन्येशीं लावून दिलें. कोन्हेरराम हा प्रथम सेनापति खंडेराव दाभाडे याजकडे असे. शाहूमहाराजांनीं त्यास पुढें धनाजी जाधवाकडे पाठविलें. शाहूमहाराजांची या कोन्हेररामावर फार मर्जी असे, व महाराज त्याला एक विश्वासांतला मनुष्य मानीत असत.

रघूजी भोंसला हा शाहूमहाराजांजवळ होता व तो शूरही होता. शाहूमहाराज एकदां शिकारीस गेले असतां रघूजी त्यांचेबरोबर होता. शाहूमहाराजांचा नेम चुकल्यानें वाघानें महाराजांवर चाल केली पण रघूजीनें प्रसंगावधान ठेवून मोठ्या धिटाईनें पुढें जाऊन पट्टयानें वाघास मारलें व महाराजांचा जीव वांचविला! यामुळें महाराजांची रघूजीवर मर्जी बसली. महाराजांनीं आपली मेहुणी रघूजीस देऊन नातेंही जोडलें व ते त्यास निरनिराळ्या मोहिमेवरही पाठवूं लागले.

परसोजी भोंसला मेल्यावर त्याची "सेनासाहेब सुभा" ही पदवी व वऱ्हाडचा सुभा त्याचा मुलगा कान्होजी यास शाहूमहाराजांनीं दिला. कान्होजी हा आपल्या वऱ्हाडांतील "भाम" ठाण्यावर राहत असे. पण पुढें उत्पन्नाचा हिशेब तो शाहूमहाराजांस देईनासा झाला व ठराविक रकमही पाठविना. तेव्हां महाराजांनीं कान्होजीस साताऱ्यास बोलावून घेतलें. परंतु तो तेथून पळून जाऊन निजामास मिळण्याच्या विचारांत असल्याचें समजल्यावर महाराजांनीं रघूजीस त्याच्यावर पाठविलें. रघूजीनें त्यास पकडून आणून महाराजांच्या ताब्यांत दिलें. तेव्हां शाहूमहाराजांनीं कान्होजीची "सेनासाहेब सुभा" ही पदवी काढून ती रघूजीस दिली व रघूजीसच वऱ्हाडच्या सुभ्यावर नेमलें. परंतु कान्होजीकडील थकलेली बाकी भरण्यास कान्होजीचा सावकार रघुनाथभट झिपरे हा तयार होईना व रघूजीसही जामीन होण्यास तो कबूल होईना. कोन्हेरराम हा शाहूमहाराजांच्या विश्वासांतला होताच. त्याचप्रमाणें बाहेरही कोन्हेररामाची प्रतिष्ठा व वजन चांगलेंच असे. त्यामुळें या कोन्हेररामाच्या मध्यस्थीनें तो सावकार कान्होजीची बाकी भरण्यास तयार होऊन त्यानें शाहूमहाराजांच्या खजिन्यांत एक लाख रुपयांचा भरणा केला व कोन्हेररामाच्या मध्यस्थीनें रघूजीकरितांही तो जामीन राहिला.

रघूजी भोंसला आतां "सेनासाहेब सुभा" झाल्यानें शाहूमहाराजांनीं कोन्हेररामास रघूजीची मुजुमदारी दिली व ती देतांना "कोन्हेरपंत आमचे जावई त्यास आम्ही हा मजमूचा दरख अंदण दिला" असें कळविलें. इतका आपलेपणा व घरोबा शाहूमहाराज रामाजीपंत कोल्हटकरांच्या मुलाबद्दल दाखवीत असत. आपणास या ठिकाणीं फक्त भास्कररामाची हकीकत द्यावयाची आहे.

प्रसिद्धि पावलेल्या कागदपत्रांत भास्कररामाचा प्रथम उल्लेख सन १७२८ सालचा आहे (पे. द. भा. १३-१२). या पत्रांतील मजकुरावरून भास्करराम लष्करी कामगिरींत यापूर्वीच पुढें आलेला होतासें दिसतें. इतकी गोष्टमात्र दिसते कीं कोन्हेररामाप्रमाणेंच भास्कररामाचीही नेमणूक शाहूमहाराजांकडून रघूजी सेनासाहेब सुभा झाल्यावर त्याच्याकडे मुख्य लष्करी अंमलदार म्हणून झाली असावी. रघूजीच्या या पुढील सर्व लष्करी कारभारांत हा प्रामुख्यानें भाग घेत असे.

देवगडचा राजा चांदसुलतान सन १७३५ मध्यें मेला. त्याला ३ मुलगे होते. मीरबहादुर, अकबरशहा व बुऱ्हाणशहा. चांदसुलतानला वल्लीशहा नांवाचा एक दासीपुत्र होता. चांदसुलतान मेल्यावर वल्लीशहानें मीरबहादुरास मारून राज्य बळकावलें. तेव्हां चांदसुलतानची राणी रतन कुवर हिनें रघूजीची मदत मागितली. रघूजीनें वल्लीशहाचा पराभव करून राणी रतनकुवर हिच्या मुलास गादीवर बसविलें. या कामगिरीबद्दल राणी रतन कुवरनें रघूजीस तिसरा मुलगा मानून आपल्या राज्यांतला तिसरा हिस्सा त्यास दिला ! व शिवाय लढाईच्या खर्चाचे १० लक्ष रुपयेही दिले. याच्या योगानें रघूजीच्या वांट्यास त्याच्या मूळच्या वऱ्हाड सुभ्यास लागून असलेला नागपूर, भंडारा, रामटेक हा भाग आला. तेव्हां रघूजीनें आपलें वऱ्हाडांतील मुख्य ठाणें मोडून नागपूर हेंच मुख्य ठाणें केलें. ही हकीगत सन १७३६–१७३७ ची आहे. या सर्व लढायांत व कारस्थानांत भास्करराम होता. याप्रमाणें भास्कररामानें गढा–मंडला घेतल्याचा उल्लेख आहे. यापुढें गोंडवण प्रांतांत भोंसल्यांचीं ठाणीं बसवून भास्कररामानें छत्तीसगड प्रांतांत शिरून तेथेंही भोंसल्यांचीं ठाणीं बसविलीं. या छत्तीसगड प्रांतापैकीं हैहय या पुरातन राजवंशांतील रघुनाथसिंग याचा पराभव भास्कररामानें करून रतनपूरचें मुख्य ठाणें भोंसल्यांच्या अमलाखालीं आणलें.

सन १७३८ सालीं बाजीरावानें कराराप्रमाणें निजामाविरुद्ध रघूजीची मदत मागितली असतां त्याच्या मदतीस न जातां रघूजीनें अलाहाबादेपर्यंत स्वारी करून ३ शहरें लुटलीं. त्या वेळीं भास्करराम त्याबरोबर होता कीं नाहीं हें समजत नाहीं.

भास्कररामाच्या पराक्रमाविषयीं सविस्तर अशी माहिती फारशी उपलब्ध नसली तरी जी कांहीं थोडीच माहिती मिळते तीवरून त्याच्या पराक्रमाची चांगली कल्पना येते. श्रीक्षेत्र वांई येथील वैद्य इनामदार यांच्या घरांतील प्रचंड पत्रसंग्रहांतील प्रसिद्ध झालेल्या* एका पत्रावरून भास्कररामानें कर्नाटकांत केलेल्या पराक्रमाबद्दल नवीन माहिती उपलब्ध झाली आहे ती हकीकत पुढीलप्रमाणें:—

दक्षिण कर्नाटकांत अर्काटचा नबाब दोस्त महमद व त्याचा जांवई चंदासाहेब हे प्रबळ होऊन तिकडील लहानसहान राजांना व हिंदू राजांना त्रास देऊं लागले. तंजावरचा राजा तुकोजी सन १७३५ मध्यें वारला व त्याची राणी सुजनबाई ही राज्यकारभार पाहूं लागली. चंदासाहेबानें तिच्या हद्दींतील प्रजेला त्रास देण्यास सुरवात केली. त्रिचनापल्लीचा राजा याच सुमारास वारल्यामुळें तेथेंही त्याची राणीच राज्यकारभार पहात होती. चंदासाहेबानें मानभावीपणा दाखवून त्रिचनापल्लींत प्रवेश करून घेऊन राणीस अटक करून त्रिचनापल्ली काबीज केली (सन १७३६). तंजावरची राणी सुजनबाई हिनें शाहूमहाराजांकडे मदत मागितली. त्याप्रमाणें

* माडर्न रिव्ह्यू डिसेंबर १९४३.

त्रिचनापल्लीच्या राणीनेंही चंदासाहेबाच्या या आक्रमणाविरुद्ध व स्वतःच्या सुटकेकरितां शाहूमहाराजांकडे मदत मागितली. या वेळीं बाजीराव पेशवे माळव्यांत गुंतले होते व चिमाजीआप्पा कोंकणांत वसईच्या मोहिमेंत होते. तेव्हां शाहू-महाराजांनीं त्या वेळीं हाताशीं असलेल्या अक्कलकोटकर फत्तेसिंग भोंसले यांना वरील राण्यांना मदत करून दोस्त महमद व चंदासाहेब यांचा नक्षा उतरण्यास पाठविलें, परंतु हें काम एकट्या फत्तेसिंगाकडून होणार नाहीं हें जाणूनच कीं काय कोण जाणे, शाहूमहाराजांनीं रघूजी भोंसल्यास वऱ्हाडनागपूरकडून तांतडीनें बोलावून त्यास फत्तेसिंगाच्या मदतीस कर्नाटकांत पाठविलें. रघूजींच्या या प्रसिद्ध कर्नाटकच्या स्वारींत त्याचा उजवा हात भास्करराम कोल्हटकर हजर होता व त्याचा पराक्रमही या स्वारींत प्रामुख्यानें दिसून आला.

रघूजी दक्षिण कर्नाटकांत गेल्यावर त्यानें अर्काटला वेढा दिला व शेवटीं ता. २० मे १७४० रोजीं त्यानें अर्काट सर केलें. या लढाईंत दोस्त महमद व त्याचा मुलगा मारला गेला. इकडे चंदासाहेब त्रिचनापल्लींत असतांना फत्तेसिंगानें त्रिचनापल्लीस वेढा देऊन ठेवला होता. चंदासाहेबानें फत्तेसिंगाशीं गोडीगुलाबीची भाषा चालू ठेवून राणीस त्रास न देण्याचें वचन दिलें व खंडणीही भरण्याची कबुली केली. ही स्वतःच्या सुटकेची खटपट करीत असतां त्यानें गुप्त रूपानें आपल्या भावास मदतीस बोलावलें होतें.

वरील खोट्या कबुल्या देऊन चंदासाहेबाचा सुटून जाण्याचा इरादा होता, परंतु त्रिचनापल्लीचा वेढा उठण्याची बातमी रघूजीस मिळाल्याबरोबर तो स्वतःच्या सैन्यासह त्रिचनापल्लीवर आला व त्यानें त्रिचनापल्लीचा वेढा फिरून पक्का केला. चंदासाहेबाचा भाऊ बडेखान हा मोठी फौज घेऊन चंदासाहेबाच्या मदतीस येत असल्याची बातमी नक्की समजल्यावर त्यानें भास्कररामास बडेखानावर पाठविलें. बडेखानाजवळ जय्यत अशी ५००० फौज होती. भास्कररामानें तांतडीनें कूच करून त्रिचनापल्लीच्या दक्षिणेस १४ मैलांवर त्यास गांठलें व त्याच्याशीं निकरानें लढून त्याचा त्यानें पराभव केला. इतकेंच नव्हे तर बडेखानास मारून त्याचें शव त्रिचनापल्लीस आणून रघूजीस दाखविलें !

अशा प्रकारें चंदासाहेबाचा नुसता सुटून जाण्याचा डावच नव्हे, तर बडेखानाची कुमक आल्याबरोबर मराठ्यांनाच कचाट्यांत पकडण्याचा भारी मोठा डाव, भास्करपंतानें बडेखान त्रिचनापल्लीस पोंचण्यापूर्वीच १४ मैलांवर त्यास गांठून मोठ्या पराक्रमानें बडेखानास मारून त्याच्या ५००० स्वारांचा धुव्वा उडविल्यामुळें सपशेल फसला. सरशेवटीं रघूजीनें ता. १४ मार्च सन १७४१ (रामनवमी) रोजीं त्रिचनापल्ली सर करून तेथील राणीची मुक्तता केली. चंदासाहेब व त्याचा मुलगा यांस पकडून त्यांजकडून ७ लक्ष रु. खंडणी वसूल होईना म्हणून त्या दोघांना भास्कररामाबरोबर बंदोबस्तानें वऱ्हाडांत पाठविलें.

बंगाल-बिहार-ओढिसाचा नबाब सरफराजखान यास मारून अलीवर्दीखानानें मोठ्या कारस्थानानें या तिन्ही प्रांताची नबाबी सन १७३९ सालीं मिळविली होती. परंतु सरफराजखानाचा मेहुणा कटकचा नायब सुभेदार मूरशिदकुलीखान (दुसरा) हा अद्याप अलीवर्दीविरुद्ध होता. अलीवर्दीनें त्याचाही पराभव बालासोरजवळ केला. आतां अलीवर्दीस प्रतिस्पर्धी राहिला नव्हता. पराभव पावल्यावर मूरशिदकुली व त्याचा हस्तक मीर हबीब हे हैदराबादेकडे पळून गेले. तेथून नागपूरच्या रघूजीच्या मदतीनें अलीवर्दीचा सूड उगविण्याच्या उद्देशानें मीर हबीब याच सुमारास नागपुरास आला. त्यानें भास्कररामाची गांठ घेऊन बंगालच्या अपरंपार संपत्तीची कल्पना त्यास दिली व भोंसल्यांनीं बंगालवर स्वारी केल्यास त्यांना बंगालमध्यें सर्वतोपरी मदत करण्याचें आश्वासन दिलें. परंतु रघूजी नागपुरास नसल्यानें त्याच्याशीं या संबंधांत विचारविनिमय व वाटाघाट करून मग बंगालवर स्वारी करण्याचें भास्कररामानें कबूल केलें व मीरहबीब परत हैदराबादकडे गेला.

शाहूमहाराजांनीं रघूजीस सेनासाहेब सुभा ही पदवी देतांना त्यांत वऱ्हाडगोंडवणपासून बंगाल-ओढिसापर्यंत व उत्तरेस अलाहाबादेपर्यंत चौथाईचे हक्क बसविण्याचा उल्लेख होताच व मीरहबीबकडूनही वरीलप्रमाणें बंगालवर चढाई करण्याची मागणी आली होती. भास्कररामानें वरील सर्व हकीगत रघूजीस कळवून त्याबद्दल सर्व प्रकारें विचार झाल्यावर बंगालवर चौथाईनिमित्त स्वारी करण्याचें निश्चित ठरून शेवटीं सन १७४१ दिसंबरअखेर भास्करराम बरीच मोठी फौज घेऊन गोंडवणछत्तीसगडमधून छोटानागपूर प्रांतांतून दामोदर नदीच्या दक्षिण तीरावर पाचाट गांवीं उतरून तेथें त्यानें छावणी केली.

यावेळीं अलीवर्दीखान नबाब ओढिसांतील बंडाळी मोडून बंगाल्यांत येऊन स्वाऱ्याशिकाऱ्या करीत ख्यालीखुशालींत काळ कंठीत होता. भास्करराम मोठी फौज घेऊन आल्याचें समजल्यावर त्यानें आपली छावणी बरद्वानजवळ नेली व दाणागोटा दारूगोळ्याच्या तयारीस लागला. या पुस्तकांत पुढें दिलेली हकीगत " शेरेमुताखरीन " ग्रंथाच्या आधारानें दिली आहे. त्यांत भोंसल्यांच्या बंगालवरील पहिल्या स्वारीचा धागा येथून आहे.

मराठी इतिहासांतून भोंसल्यांच्या या प्रसिद्ध सेनापतीचा उल्लेख सर्वत्र भास्करराम नांवानें केला आहे, परंतु बंगालकडील इतिहासामधून यास भास्करपंडित असेंच लेखिलें आहे. म्हणून या पुस्तकांतही त्यास भास्करपंडित अगर भास्करपंत असें लेखिलें आहे.

अलीवर्दीखानानें पुढें भास्कररामाचा अमानुषपणें खून केल्यावर त्याच्या बायकोस त्याच्या विश्वासू नोकरांनीं गयेस सुरक्षित नेलें. ती गरोदर होती. पुढें

तिला काशीस नेली. तेथें ती प्रसूत होऊन पुत्र झाला. तो पुढें काशीराव अगर काशी भास्कर या नांवानें प्रसिद्धीस आला. रघूजीनें भास्कररामाच्या या मुलाची काळजी वाहून पुष्कळ कोडकौतुक केलें. अल्प वयांत त्याची मुंज व लग्नही लावून दिलें. त्या प्रसंगी फार बहुमोलाचे पोषाख व आहेर केल्याचा उल्लेख आहे. अल्पवयांतच त्यास १० हजार स्वारांची मनसब देऊन त्यास वऱ्हाडची सुभेदारीही दिली. भास्कररामाची बायको ताई ही या मुलास घेऊन वऱ्हाडांत आकोलावाशीम रस्त्यावरील पातुर या गांवीं मुख्य ठाणें करून राहत असे. जानोजी भोंसल्याच्या कारकीर्दीत हा काशीभास्कर नागपूरच्या राज्यकारभारांत असे.

या काशीरावास भास्कर, रामचंद्र व कृष्णराव असे तीन पुत्र होते. पैकीं दुसरा रामचंद्र यास अंतर्वेदींत तीन परगण्यांची सुभेदारी होती. ती सन १८२९ पर्यंत चालली. यापुढें भास्कररामाचा वंश नामशेष झाला.

---

४ मराठ्यांनीं केलेली अलीवर्दीखानाची दुर्दशा
बरद्वान ते कटवा

भास्करपंत बंगालमध्यें शिरतो

अलीवर्दीखानानें सरफराजखानास मारून नबाबी मिळविली असल्यानें सरफराजचे पक्षपाती त्याच्या वाईटावर होते. त्यांपैकीं एक मीर हबीब यानें निजामी सरदारांशीं खलबतें करून, नागपुरास जाऊन, रघोजीकडून भास्करपंतास बंगाल्यांत पाठविण्याची कारवाई केली.

या वेळीं नबाब ओढिसांत उपस्थित झालेलें मोठें बंड मोडून परत बंगाल्यांत मिदनापूर–बरद्वान भागांत, जंगलांतून शिकारी करीत, ख्यालीखुशालींत, निष्काळजीपणानें व आरामानें येत होता. टोळधाडीसारखें फार मोठें मराठी सैन्य येत असल्याची अधिकृत बातमी त्याला मिळाली, परंतु अलीवर्दीखानानें तिजकडे अगदींच दुर्लक्ष केलें व आपल्या ख्यालीखुशालींत यत्किंचित् बदल होऊं दिला नाहीं. " कोठें आहेत ते काफर मराठे ? ते कोठेंहि असोत व कितीहि असोत ढेकणासारखे चिरडून टाकीन ! " असलीं उत्तरें देऊन तो बातमीदारांना हांकलून लावी.

वास्तविक पाहिलें तर अलीवर्दीखानाची स्थिति या क्षणीं अगदीं नाजूक झाली होती. ओढिसांतील एक मोठें बंड मोडून तो नुकताच परत येत होता. येवढ्या मोठ्या सैन्याची आतां मुळींच जरूर नाहीं म्हणून त्यानें आपल्या नवीन भरती केलेल्या बऱ्याच मोठ्या फौजेलाहि कमी केलें व ते लोक आपापल्या गांवोगांवीं निघूनहि गेले होते. तरीसुद्धां त्याच्याजवळ एकंदर ८।१० हजार सैन्य होतें. सध्यां तो मिदनापूर–सांका या भागांत होता आणि वरून जरी बेफिकीर असल्यासारखा दिसे, तरी निदान या जंगली प्रदेशांतून सुपीक प्रदेशांत–जेथें सैन्यास धान्य व जनावरांस दाणावैरण मिळेल अशा जागीं–तरी गेलें पाहिजे

येवढी जाणीव त्यास होती. म्हणून त्यानें जवळच्या बरद्वान शहराकडे छावणी नेण्याचा हुकूम सोडला, व बरद्वान पाठीशीं ठेवून तो मराठ्यांस तोंड देण्यास सज्ज झाला (१५ एप्रिल १७४२).

नबाबाच्या छावणीची लूट

बरद्वान शहराच्या आश्रयास आल्यावर नबाबानें जी मुख्य गोष्ट केली ती ही कीं, ओढिसाच्या मोहिमेवरून परत आल्यावर रिकाम्या होत आलेल्या छावणींत सर्व सामानाची व मुख्यतः धान्य, दाणागोटा इत्यादि आवश्यक वस्तूंची पूर्ण भरती केली व दारूगोळ्याचा बंदोबस्त केला. भास्करपंडितानें सर्व शहराची व नबाबाच्या छावणीची चोहों बाजूंनीं टेहळणी करून व नबाबाचा वरील सर्व बंदोबस्त पाहून लांबचा वळसा घेऊन तो शहराच्या दुसऱ्या बाजूवर घसरला व कांहीं लोक शहरांत शिरून त्यांनीं तेथें जाळपोळ सुरू केली.

लढाईचा प्रसंग न आणतां चवथाईचे रुपये वसूल झाले तर उत्तमच अशा विचारानें भास्करपंतानें प्रयत्न चालू ठेवलाच होता. त्यानें नबाबाकडे कमींत कमी १० लक्ष रुपयांची मागणी केली. या मागणीनें आपला अपमान झालासें नबाबास वाटलें. नबाबाचा सरसेनापति मुस्ताफाखान यासहि ही गोष्ट न पटून त्यानें लढाई देऊन मराठ्यांना नेस्तनाबूद करण्याचा सल्ला नबाबास दिला. त्यावरून " अंगांत रग असेल तर लढाईस समोर उभा रहा. तुला एक छदामहि मजकडून मिळणार नाहीं, " असें उत्तर नबाबानें भास्करपंतास पाठविलें.

अर्थात् या वेळेपासून नबाबाच्या व भास्करपंताच्या सैन्याचे हल्लेप्रतिहल्ले व चकमकी नित्य झडूं लागल्या. नबाबाला असले गनिमी काव्याचे हल्ले मुळींच मानवण्यासारखे नव्हते. त्याच्या मनांत समोरासमोर येऊन लढाई देऊन मराठ्यांचा धुव्वा उडवून टाकण्याचें होतें. असें करण्यास छावणींतील मोठा तोफखाना, अवजड सामान व बाजारबुणगें यांची अडगळ होणारी होती. म्हणून फक्त लढाऊ लोकांनीं आपापलीं हत्यारेंपात्यारें व जुजबी सामान घेऊन निघावें, असा त्यानें हुकूम सोडला. हे लढाऊ लोक छावणी सोडून बाहेर आल्यावर छावणींत राहिलेल्या लोकांची मराठ्यांच्या भीतीनेंच गाळण उडून ते लोकहि छावणी सोडून बाहेर येऊन सैन्यांत शिरले. त्यामुळें नबाबाचा उघड्या मैदानावर मराठ्यांशीं लढाई देण्याचा बेत बाजूस राहून, त्याच्या सैन्यांत नुसता गोंधळ माजून गेला. याचा फायदा भास्करपंतानें पुरेपूर घेतला. त्यानें नबाबाच्या तोंडावर पुरेसें सैन्य ठेवून त्यास लढाईंत गुंतवून, दुसऱ्या बाजूस छावणीवर हल्ला केला. प्रतिकार करण्यास तेथें थोडेच लोक राहिल्यानें त्यांचें कांहीं न चालून, भास्करपंतानें ती छावणी सावकाशपणें मनसोक्त लुटली. त्यांत मुख्यतः खानाचा मोठा तोफखाना व लढाईचें अवजड सामानसुमान, तंबू, राहुट्या, मुबलक धान्य, दाणागोटा, जडजवाहीर, हत्तीघोडे इत्यादि वस्तु सांपडल्या.

नबाबास घेरलें

इकडे मैदानांत लढाईस तोंड लागलेंच होतें. नबाबाच्या सैन्यांत त्याचेंच बाजारबुणगें शिरल्यामुळें गोंधळ माजला होता. अशा स्थितींत मराठ्यांनीं नबाबाच्या सैन्यावर चारी बाजूंनीं हल्ले चढविले व आस्ते आस्ते रेंटीत रेंटीत सबंध मोंगली सैन्यास वेढा दिला. नबाबाचे लोकहि निकरानें लढून हल्ले परतवीत होते व प्रतिहल्ले चढवीत होते. ही लढाई तिसरे प्रहरपर्यंत चालू होती. आपले लोक निकरानें लढत असतां मराठ्यांनीं आपणास घेरलें कसें, हें नबाबाच्या लक्षांत येईना. तेव्हां एकंदर सैन्याची पाहणी करण्यास तो निघाला.

सैन्याची पाहणी करतांना नबाबास दिसून आलें कीं, मुस्ताफाखान व त्याचे सरदार आपापल्या सैन्यासह लढण्याची कुचराई करीत आहेत. मुस्ताफाखानाचा आधार कमी झाल्यास आपण कोणत्या परिस्थितींत सांपडणार अथवा सध्यां सांपडलों आहों, याची चांगलीच कल्पना नबाबास आली. छावणीचा आधार सुटला, मुस्ताफाखानाचाहि आधार वरीलप्रमाणें ढिला झाला, शिवाय सध्यां तो ज्या जागीं उभा होता ती जागाहि त्याच्या दुर्दैवानें दलदलीची व निसरडी ठरली, अंधार पडत चालला, एकदोन तंबू व दोन-चार मेणे यांपेक्षां सामानसुमान कांहीं नव्हतें, बरद्वान शहर ७-८ कोस दूर राहिलेलें, अशा बिकट परिस्थितींत नबाब या वेळीं सांपडल्यानें छावणींतील लोक त्याच्या भोंवतीं जमून आपण आतां कसे वांचतों या काळजीनें ओरड करूं लागले.

अलीवर्दीखानाच्या विरुद्ध सेनापति मुस्ताफाखान, समशेरखानप्रभृति अफगाण सरदारांच्या अनेक तक्रारी होत्या व नबाबास अडचणींत पाहून त्या दूर करून घेण्यास ही बरी संधि आहे हें पाहून, अफगाण सैन्य लढाईची टाळाटाळ करीत होतें. मुख्य तक्रार अशी होती कीं, कोणतीहि मोहीम सुरू करतांना अफगाण लोकांना निरनिराळीं वचनें देऊन नबाब त्यांना सैन्यांत भरती करीत असे, व इमानेंइतबारें काम केल्यावरहि मोहीम संपल्याबरोबर वचनपूर्ति न करतां सैन्य कमी करून टाकी. या विचित्र धोरणानें अफगाण सरदारांचें नुकसान होई. मुस्ताफाखानास १ लाख रुपये व बाकीच्या सर्व सैन्यास दोन महिन्यांचा पगार जास्त मिळेल, असें ठरलें असतां कांहींहि मिळालें नाहीं. त्यामुळें अफगाण लोक नाराज होऊन बिथरले होते.

अफगाण लोक नबाबाविरुद्ध बिथरण्याचें आणखी एक कारण म्हणजे शाहबादेचा प्रसिद्ध अफगाण सरदार रोशनखान याचा त्यानें अन्यायानें केलेला खून होय. सर्व अफगाणांना झोंबण्यासारखें आणखीहि एक कारण होतें. अफगाणांचा मुख्य सरदार मुस्ताफाखान यानें मोरभंजच्या राजाला विश्वासाचा शब्द देऊन अभयवचन दिलें असतांहि त्याचा बोज न ठेवतां तेथील राजास जबरदस्तीनें

आपल्यापुढें आणून मुस्ताफाखानानें दिलेल्या अभिवचनास नबाबानें धाब्यावर बसविलें. त्यांतल्या त्यांत हा हिंदु राजा आहे, याहि भावनेनें मिरजाफरखानाकडून त्यानें त्या राजाचीं खांडोळीं करून टाकलीं ! त्याची सर्व दौलत लुटून फस्त केली. त्याच्या रयतेस सर्वस्वी नागवलें. असा त्या राजाचा विश्वासघातानें सूड उगवला ! नबाबानें आपला शब्द न मानल्यामुळें नुसता मुस्ताफाखान एकटाच नव्हे तर त्याचे सर्व अफगाण सरदार व लोक नबाबावर नाराज झाले होते.

अशा एक ना दोन कित्येक तक्रारी नबाबविरुद्ध होत्या. या अडचणीच्या वेळीं नबाबास वठणीवर आणण्याच्या उद्देशानें आपलें म्हणणें त्यांनीं नबाबास स्पष्टपणें कळविलें. तेव्हांमात्र नबाब चिंतातुर झाला.

मुस्ताफाखान हा पराक्रमी असून निधड्या छातीचा होता. सर्व फौजेवर त्याचें विलक्षण वजन असे. अलीवर्दीखान या वेळीं मोठ्या संकटांत होता; अशा ऐन संकटाच्या वेळीं सेनापति मुस्ताफाखानाची फौज आपणास सोडून गेली तर थोडक्याच वेळांत भास्करपंडित आपल्या राहिलेल्या सैन्याची चटणी करून टाकील, याचें स्पष्ट दृश्य त्याच्या समोर उभें राहिलें.

तहाचे बोलणें

अशाहि बिकट स्थितींत बचावाचा प्रयत्न त्यानें चालू ठेवला होता. नबाबानें प्रथम बरद्वानच्या राजाचा सेनापति शेर उल्लाखान (हा एक दखनी मुसलमान होता) यास राजातर्फे म्हणून भास्करपंताकडे तहाचें बोलणें करण्यास पाठविलें. नबाबाची छावणी लुटून आणल्यामुळें अलीवर्दीखान या वेळीं अगदीं कफल्लक बनला असल्याची पंताची खात्री होती, व पहिल्याच सामन्यांत नबाबास आपण पेंचांत आणलें असल्याच्या जाणिवेनें तहाचें बोलणें एकदम धुडकावून लावलें व उत्तर दिलें, " नबाबाची तमाम छावणी आम्हीं लुटून आणली आहे. नबाबास आम्हीं चारी बाजूंनीं घेरून टाकलें आहे. या कचाट्यांतून तो सुटून जाणें अशक्य आहे. अशा स्थितींत तुम्ही तहाचें बोलणें काय करणार? तरीपण अलीवर्दीखानाची योग्यता मी जाणतों. तो एक प्रसिद्ध योद्धा व मुत्सद्दी आहे. तेव्हां त्याच्या जीवास अपाय न होईल याची हमी मी पाहिजे तर घेतों; परंतु येवढ्याकरितां नबाबानें एक कोट रुपये खंडणी ताबडतोब भरली पाहिजे ! त्याचे सर्व हत्ती त्यानें आमच्या स्वाधीन करावे. मग आम्ही त्याच्या भोंवतालचें मराठी सैन्याचें कडें ढिलें करून नबाबास मुर्शिदाबादेस जाण्यास वाट करून देऊं."

अशा प्रकारच्या अटी मान्य करणें अलीवर्दीखानास लांछनास्पद होतें, परंतु सध्यां नबाबाची परिस्थिति अत्यंत बिकट होती. त्याच्या खास स्वतःच्या ४ हजार सैन्यापैकीं शत्रूचा जोर पाहून कांहीं त्यांना शरण गेले, कांहीं पळून गेले. तहाच्या अटी ऐकून नबाब स्तंभितच झाला ! नबाबाचा दिवाण जानकीराम जवळ

होता. तो म्हणाला " आतांपर्यंत मराठ्यांनीं जो संहार केला आहे त्यावरून बाकीच्या लोकांनीं धीर सोडिला आहे. कारण चारी बाजूंनीं पडलेल्या कढ्यांतून एकहि मनुष्य जिवंत सुटेल असें वाटत नाहीं. एका दिवसापुरतेंहि धान्य आपल्याजवळ नाहीं ! हत्ती देण्याचा प्रश्न फारसा मोठा महत्त्वाचा नाहीं. मुर्शिदाबादेस व प्रत्येक सरदाराजवळ वाटेल तेवढे हत्ती सांपडतील. प्रश्न एक कोट रुपयांचा आहे ! सध्यां सरकारी खजिन्यांत ४० लाख रुपये रोकड आहे, व बाकीच्या ६० लाख रुपयांची भरती करण्याची हमी मी आपल्या डोक्यावर घेतों ! "

ही सूचना ऐकून नबाब आश्चर्यचकित झाला. इतक्या मोठ्या रकमेची तजवीज होण्यासारखी आहे हें पाहून त्यास आनंद झाला, व मग तो म्हणाला " माझ्या जिवांत जीव असेपर्यंत असल्या नामुष्कीच्या अटी कधींहि कबूल करणार नाहीं. माझ्या या शूर लोकांना बरोबर घेऊनच मी या मराठ्यांना चांगला हात दाखवीन व माझ्या अपयशाचा कलंक धुऊन काढीन. या लुटारू लोकांना पैसे द्यावयाचे म्हणजे आपली शक्ति कमी करून त्यांची वाढविणें होय. हे पैसे त्यांना न देतां नाराज झालेल्या मुस्ताफाखानप्रभृति अफगाण सैन्यास दिले तर ते या घटकेस खूष होऊन आपणांस मदत करतील. तुमच्याजवळ येवढी मोठी रक्कम आहे हें ऐकून मला आनंद होत आहे. त्यांपैकीं १० लाख रुपये बाजूस काढून ठेवा, मी ते या माझ्या सरदारांना व शूर लढवय्यांना वांटून टाकीन. "

मुस्ताफाखानाची पायधरणी

हा वेळपर्यंत रात्र पडून अंधारगुडूप झाला होता. ज्यांना वांचण्याची आशा वाटत नव्हती त्यांपैकीं कांहीं लोक अंधाराचा फायदा घेऊन मराठ्यांच्या छावणींत जाऊन स्वतःचा जीव वांचविण्याची याचना करीत होते. तहाच्या वाटाघाटी चालू आहेत ही बातमी पसरल्यामुळें जो तो आपापली सोय काय करावयाची या खटपटींत होता.

या मंडळींत मूर्शिदकुलीखानाचा हस्तक मीरहबीब हा होता अलीवर्दीखानास तो पाण्यांत पहात असे. भास्करपंडिताचें व याचें आंतून सूत होतें. अलीवर्दीखानास अशा अडचणींत सोडून आपल्या पथकासकट मराठ्यांस मिळण्याची संधि तो पाहत होता.

रात्रीच्या अंधकारांत भास्करपंडितानें एका उंचवट्यावर आपला भगवा झेंडा फडकत ठेवून त्याच्या खालीं जो कोणी येईल त्यास जीवदान देऊन आश्रय देण्याचें अभिवचन मोठमोठ्यानें सांगण्याची व्यवस्था केली होती आणि नबाबाकडील भ्याड लोक कांहींतरी सबबी सांगून मराठ्यांकडे जात होते आणि या पेंचाच्या परिस्थितींतून बाहेर कसें पडावें याचीच विवंचना आतां नबाबास होती.

तो मध्यरात्रीच्या अंधारांत उठून लाचारीनें अफगाण सेनापति मुस्ताफाखान याला शरण गेला. त्या वेळीं त्यानें आपल्याबरोबर कोणीहि चोपदार किंवा मशालजी

देखील घेतला नाहीं. फक्त आपला लहानगा नातू सिराजउद्दौला यालाच आपल्या बरोबर घेतलें. ' माझा मान आणि माझी आणि माझ्या नातवाचीहि मान मी तुमच्या हवालीं केली आहे. आतां काय वाटेल तें करा ' असा निर्वाणीचा सवाल त्यानें आपल्या सेनापतीपुढें टाकला. त्याचा परिणाम अर्थात् झाला आणि मुस्ताफाचें अंतःकरण द्रवलें. मुस्ताफाच्या हृदयस्पर्शी विनवणीला इतर सर्व अफगाण सैनिक वश झाले आणि त्यांनीं नबाबाला प्राणांतींदेखील सोडून न जाण्याची प्रतिज्ञा केली.

आपण रात्रीं मुस्ताफाखानास भेटलों म्हणून केवढें काम झालें असे उद्गार नबाबानें काढले व मुस्ताफाखानास धन्यवाद दिले, आणि या सर्वांच्या मदतीनें मराठ्यांची फळी फोडून आपण मूर्शिदाबादेस निघून जाऊं असा निश्चय केला. तेथें गेल्यावर फिरून तयारी करून मराठ्यांना हांकून देण्याचा त्यानें बेत केला असल्यास नवल नाहीं.

नबाबाची पीछेहाट

भास्करपंडितानें मुस्ताफाप्रभृति अफगाण फौजेच्या नबाबावरील इतराजीमुळें ती आपल्यास अनुकूल होईल अशी अपेक्षा केली होती. परंतु दोन प्रहर दिवस येईपर्यंत ते मराठ्यांस न मिळाल्यामुळें खानाच्याच गोटांतून लुटून आणलेल्या तोफांचा मारा व बाणांचा वर्षाव भास्करपंडितानें नबाबाच्या व मुस्ताफाखानाच्या एकंदर मोंगली सैन्यावर सुरू केला. त्यामुळें नबाबाच्या सर्व गोटांत फारच गोंधळ उडून गेला होता. हा मारा सबंध दिवस व रात्रभर थोडाबहुत चालू होता. बरद्वानच्या राजाचा दिवाण माणिकचंद हा संधि साधून बरद्वानकडे पळून जाण्याच्या विचारांत होता. अलीवर्दीच्या गोटांतील महत्त्वाच्या हालचालींच्या बातम्या पंडितास कळत होत्या. कोणींही निसटून जाऊं नये म्हणून मराठ्यांनीं अपरात्रीं फार मोठा जोराचा हल्ला नबाबावर केला. त्यामुळें एकतर मराठ्यांचा वेढा फोडून बाहेर पळालें पाहिजे किंवा मरणतरी पत्करलें पाहिजे, अशा परिस्थितींत नबाब सांपडला. तेव्हां त्यानें पहिलाच बेत कायम केला. खास नबाब मोठ्या प्रयासानें हत्तीवर चढला. सैन्याची व्यवस्थित मांडणी करून उलट निकराचा हल्ला करण्यासहि त्याला फुरसत झाली नाहीं. कारण मराठे एकदम नबाबाच्या सैन्यावर तुटून पडले व सैन्यांत घुसून त्यांनीं लांडगेतोड सुरू केली. मीर हबीब अद्याप नबाबाकडेच होता. मराठ्यांनीं मीरहबीबच्या तुकडीस घेरलें. मीरहबिबास तीन जखमा होऊन तो घायाळ झाला होता. त्यास कैद करून मराठ्यांनीं उचलून नेलें व पुढें तो कायमचाच मराठ्यांस मिळाला !

नबाबाजवळच्या अवशिष्ट तोफखान्यावरील सरदार हैदर अलीखान यानें मराठ्यांवर शक्य तों तोफांचा मारा चालू ठेवला होता. मुस्ताफा, समशेरखान इत्यादि अफगाण सरदारांनीं त्या अंधारांत आपल्याकडून लढण्याची शिकस्त केली व

मराठ्यांचे शेंकडों लोक यमसदनास पाठविले. त्यामुळें नबाबाच्या सैन्याभोंवतालचें कडें थोडें ढिलें पडलें. तेव्हां मराठ्यांनीं नबाबाच्या एकाच बाजूवर नेटानें हल्ला चढविला. ही संधि साधून नबाबानें आपले लोक एकत्र गोळा करून मराठ्यांचा वेढा जेथें ढिला पडला होता त्या एकाच जागीं निकराचा मारा करून तेथून वाट फोडली व कटवा गांवच्या दिशेनें तो मोठ्या धिमेपणानें पीछेहाट करीत चालला.

अभूतपूर्व पाठलाग

अशा अडचणींतून नबाबानें पळ काढल्यामुळें त्याच्या सध्यांच्या छावणींतील अवशिष्ट सामानसुमान त्याला दुसऱ्यांदा टाकून द्यावें लागलें. मराठ्यांचा हल्ला आला तेव्हां ज्याच्या हातीं जें हत्यार व जो घोडा लागला तो घेऊन जो तो निघाला होता. अद्यापहि मुस्ताफाखानाचें व नबाबाचें मिळून ८ हजार सैन्य त्याजवळ होतें. मराठ्यांच्या वेढ्यांतून ते निसटले तेव्हांपासून त्यांच्या हालांस व दुर्दशेस सुरवात झाली.

सामानसुमान, कपडालत्ता, दाणागोटा, भांडीकुंडीं यांपैकीं कोणींच कांहीं घेतलें नव्हतें. घेणें शक्यच झालें नाहीं. मराठ्यांच्या मोठ्या हल्ल्यामुळें प्रत्येकजण कसातरी जीव घेऊन वेढ्यांतून निसटून जात होता. अशा स्थितींत मराठ्यांनीं त्यांना कोठेंहि एके जागीं टिकूं दिलें नाहीं. चारी बाजूंनीं मराठे त्यांच्यावर हल्ले करीत होते व मोंगली सैन्य मराठ्यांना तोंड देत हटतच होतें. कांहीं तुकड्यांनीं मराठ्यांस तोंड द्यावयाचें व कांहींनीं मोठ्या धिमेपणानें व धैर्यानें "पीछेहाट" घ्यावयाची असा क्रम चालत होता.

अशा स्थितींत नबाबाचें सैन्य सांपडलें असतां त्या सैन्याचे जे हाल व दुर्दशा झाली अथवा मराठ्यांनीं केली ती कांहीं विचारूं नका. कर्मधर्मसंयोगानें ज्या मोठ्या रस्त्याच्या आश्रयानें नबाब पळ काढीत चालला होता त्या "जगन्नाथपुरी" मार्गावर ठिकठिकाणीं मोठमोठ्या धनाढ्य हिंदू धार्मिक लोकांनीं हजारों रुपये खर्चून मोठे मोठे तलाव बांधलेले होते. त्यांच्याभोंवतीं वृक्ष-वेलींचीहि व्यवस्था केलीच होती. त्याचा थोडाफार आधार या "पीछेहाट" करीत चाललेल्या सैन्यास झाला.

रात्र पडली कीं अशा तलावांच्या बाजूंस असलेल्या झाडीच्या आश्रयास नबाबाचें सैन्य राही. खाण्यास मूठभर धान्यहि नव्हतें. त्यामुळें सरदार काय, शिपाई काय, सर्वांनीं झाडांचा कोंवळा पाला खावा व वर तलावाचें पाणी प्यावें! खालीं धरित्रीवर श्रमपरिहारार्थ हातपाय पसरावयाचे व वर अभ्राच्छादित आकाशाचें पांघरूण घेऊन मराठ्यांच्या हल्ल्याची धास्ती सारखी उराशीं बाळगून साधल्यास एखाद-दुसरी डुलकी घ्यावयाची. कारण दिवसाच्या हल्ल्याप्रमाणें रात्रींहि अशा तलावाच्या आश्रयास राहिलेल्या मोंगली सैन्यास मराठे वेढा देऊन बसत.

पुढें पुढें मोंगली सैन्यास लुटण्याचें कामच राहिलें नाहीं. कारण तें सर्व सैन्य कफल्लक बनलें होतें. तरीसुद्धां नबाबाच्या या सैन्यास आजूबाजूचे गांवांतून धान्य मिळूं नये म्हणून मराठे मोंगली सैन्याच्या आजूबाजूचा व पुढचा १०।१२ कोस प्रदेश लुटून फस्त करीत; अगर धान्य व इतर न नेण्यासारख्या वस्तु जाळूनहि टाकीत. त्यामुळें मराठ्यांच्यावर विजय मिळविण्याची गोष्ट दूरच राहिली; परंतु या संकटांतून वांचावें कसें याची चिंता जो तो वाहात होता. अन्नावांचून त्यांचे जे हाल झाले ते सांगतां पुरवत नाहींत. त्यांचा तत्काळ दृश्य परिणाम त्यांच्या शरीरप्रकृतीवर झालाच, पण मनावरहि झाला व हे लोक अगदींच नाउमेद होत चालले. सरदार, दरकदार व प्यादे सर्व एकाच जात्यांत भरडले जात होते. कांहीं लोक किडेमाकोडेहि खाऊं लागले. सरदार लोकांजवळ चुकून थोडेंबहुत सोनेंनाणें होतें; परंतु सोन्यानें पोटाची खळगी थोडीच भरणार होती!

अलीवर्दीखानाच्या या इतिहासप्रसिद्ध "पळा" ची अथवा मुसलमानी इतिहासकारांच्या शब्दांत "धैर्याच्या पीछेहाटी" ची सविस्तर हकीकत उपलब्ध नाहीं; युसफअली या नांवाचा एक मोठा सरदार या वेळीं अलीवर्दीखानाबरोबर या पीछेहाटींत होता. त्यानें याबद्दल कांहीं हकीकत लिहून ठेवली आहे. त्यांत तो म्हणतो, "बरद्वानपासून कटव्यास पोहोंचण्याच्या या तीन दिवसांच्या पळांत एके दिवशीं मोठ्या मुष्किलीनें ३ पाव खिचडी, चांदी सोन्याच्या ताटांत पंचपक्वान्नाचें भोजन करणाऱ्या आम्हीं ७ सरदारांनीं खाल्ली! दुसऱ्या दिवशीं गुळपापडीच्या ७ वड्यांवर आम्हीं ७ सरदारांनीं दिवस कंठला, आणि तिसऱ्या दिवशीं अर्धा शेर सडकें मांस शिजवून आम्ही सातजण खाण्यास बसलों तों तेथें कांहीं बुभुक्षितांचा गराडा पडला व त्यांना आम्हांला नाहीं म्हणवेना!"

अफगाणांचा चेव

अशा या भयंकर आपत्तींतून अलीवर्दीखान कटव्याची वाट चालत होता. तोफखाना मराठ्यांनीं हस्तगत केल्यामुळें मराठे वाटेल तेव्हां वाटेल त्या बाजूवर निर्भयपणें हल्ले चढवीत. त्यामुळें ही 'पीछेहाट' सर्वांना लांछनास्पद वाटत होती. मुस्ताफाखानास तर स्वतःचाच अत्यंत राग आला व तो म्हणाला, "या नामुष्कीच्या पराभवानें आमच्या धर्मास आम्ही काळोखी फांसली. आम्हीं अफगाण लोकांचें नांव बुडविलें. यःकश्चित् या काफर मराठ्यांनीं आमची काय ही दुर्दशा उडविली आहे! निधड्या छातीनें त्यांच्यावर चालून जाऊन त्यांचा धुव्वा उडवावयाचा सोडून त्यांनीं आमच्यावर छाप्यांवर छापे घालून आम्हांस 'दे माय धरणी ठाय करून टाकलें आहे!' या बोलण्यानें कांहीं अफगाणांना चेव आला. तेव्हां मुस्तफाखानानें सैन्याच्या कांहीं टोळ्या करून एका तलावावर मराठे लोक स्नान, स्वयंपाक, भजन, भोजन वगैरे आन्हीक बेफिकीरपणें करीत बसले होते, अशा बेसावध स्थितींत त्यांच्यावर

अचानकपणें हल्ला चढवून कांहीं मराठ्यांना मारून टाकलें व त्यांचें धान्य लुटून आणलें. त्या दिवशीं कांहीं लोकांना मूठमूठ धान्य तरी मिळालें. असा हल्ला फिरून मारण्याच्या इरायानें आणखी कांहीं अफगाण टोळया निघाल्या, परंतु मराठे आतां सावध राहून अशा येणाऱ्या मुसलमान तुकड्यांचा ते फन्ना उडवूं लागले.

कटव्याचा आश्रय

अशा तऱ्हेनें भास्कर पंडितानें अलीवर्दीचा पाठलाग ३–४ दिवस त्यास विश्रांति घेऊं न देतां अहोरात्र केला. शेवटच्या दिवशीं अचानकपणें मराठ्यांनीं जोराचा एक छापा घातला आणि अलीवर्दीखानास हत्तीवर बसणें कठीण झालें. मराठे एकदम सैन्यांत शिरून कापाकापी करूं लागले. त्यामुळें जो तो स्वतःच्या बचावांत गुंतला. इकडे मराठ्यांनीं अलीवर्दीखानाच्या हत्तीस चारी बाजूंनीं घेरलें. अलीवर्दीखानाचे शरीररक्षक स्वतःच्याच शरीररक्षणांत गुंतल्यामुळें मराठ्यांनीं नबाबास जवळ जवळ पकडलेंच होतें; परंतु त्याच ठिकाणीं त्या वेळीं एक चमत्कार घडला. नबाबाच्या हत्तीपुढें निशाणाचे दोन हत्ती नेहमींच असत. त्यांच्या दांतांना १०-१२ हात लांब साखळदंड बांधलेले असत. त्यांचा खळ खळ असा आवाज होई व त्या नादांत हत्ती डुलत डुलत चालत असत. परंतु या प्रसंगीं त्या हत्तींभोंवतीं अगदींच अपरिचित गराडा पडला. तेव्हां हत्ती गांगरून सोंड इकडे तिकडे फिरवीत जाऊं लागले. त्यामुळें ते साखळदंड खालींवर फिरूं लागून कांहीं मराठ्यांना त्यांचा चांगलाच मार बसला व कांहीं जखमी झाले. हा काय चमत्कार आहे तो न समजून साखळदंडांचा मार वांचविण्याकरितां ते हत्तीपासून दूर झाले. त्यामुळें हत्तीभोंवतालचा मराठ्यांचा वेढा ढिला पडून नबाबाचे लोक त्याच्या संरक्षणार्थ धांवून आले आणि ' अल्लाच्या कृपेनें ' नबाब अलीवर्दीखानाचा जीव वांचला. याकरितां तेथल्या तेथें सर्व सैन्यानें नमाजहि पढला ! या प्रकारच्या आपत्तीशीं झगडत नबाब कसाबसा कटवा येथें पोंचला व तेथील किल्ल्याच्या आश्रयास गेला.

अशा तऱ्हेनें भास्कर पंडितानें अलीवर्दीखानाचा अभूतपूर्व पाठलाग केला. त्यांत त्याची झालेली दुर्दशा त्याच्याच हस्तकांनीं लिहून ठेवलेली वर दिली आहे. येवढ्या बलाढ्य मुत्सद्दी व पराक्रमी अलीवर्दीखानाची व त्याच्या मुस्ताफाखानप्रभृति बलाढ्य सरदारांची झालेली दुर्दशा लक्षांत घेतली तरच भास्करपंडिताचा पराक्रम, त्याचें युद्धकौशल्य व त्याच्या अंगच्या इतर गुणांची कल्पना करतां येईल.

५ भास्करपंत दक्षिण बंगाल काबीज करतो.*

कटवा ते मूर्शिदाबाद


बरद्वानमधून निसटल्यावर नबाब ससैन्य उपासमारीनें व्याकूळ होऊन पिछेहाट घेत घेत कटवा गांवाजवळ आला तसा त्याला धीर आला. कारण या गांवाजवळ भागीरथी व अजय नदी यांचा संगम असल्यानें व्यापारदृष्ट्या या गांवास महत्त्व होतें. धान्य, दाणागोटा यांनीं हा गांव भरलेला असे. शिवाय येथें किल्लाही होता. तेव्हां स्वसंरक्षणाच्या व बचावाच्या दृष्टीनेंही याचा उपयोग नबाबास होणार होता. नबाब गांवांत शिरल्याबरोबर, मिळेल त्या धान्यावर हात मारण्यास त्याचें सैन्य आतुर झालें होतें, परंतु नबाब कटव्यास पोंचण्यापूर्वीच मराठ्यांनीं त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें हा गांव जाळूनपोळून, लुटून फस्त केला होता! हें क्षुधाक्रांत सैन्य कटव्यास पोहोंचतें, तों सैनिकांनीं धान्याचीं कोठारें जळत असलेलीं पाहिलीं, त्यामुळें त्यांची अत्यंत निराशा झाली. धान्य भरून घेण्यास सरसावलेले हात ढिले पडले व त्या हातांतील पोतीं गळून पडलीं! परंतु त्यांच्या पोटांत इतकी आग पडली होती कीं, त्या जळक्या धान्यावरच त्या क्षुधाक्रांतांनीं हात मारला. त्यांच्या त्या स्थितींत त्या जळक्या धान्याचीही किंमत त्यांना पक्वान्नांपेक्षां जास्त वाटली!

आपण असेच पुढें राजधानीपर्यंत गेलों तर राजधानी मुर्शिदाबादेचीही हीच अवस्था होईल असें वाटून नबाबानें तेथेंच मुक्काम करून मुख्य गोष्ट ही केली कीं, त्याचा भाऊ हाजी अहमद व पुतण्या व जांवई नवाजिश महंमदखान (हा मुर्शिदाबादचा नायब होता) यांस निकडीचीं पत्रें पाठवून प्रथम मुर्शिदाबादच्या संरक्षणाची पक्की तजवीज करण्यास लिहिलें व दुसरें महत्त्वाचें काम दुसरा पुतण्या व जांवई सय्यद अहमदखान यास तंबू, राहुट्या, दाणागोटा, तोफखाना, दारूगोळा घेऊन ताबडतोब कटव्याच्या बाजूस कुमकेस येण्यास लिहिलें. नबाबाचीं हीं पत्रें मुर्शिदाबादेस पोंचल्यावर नबाबाच्या कुटुंबियांचा जीव खालीं पडला. कारण बरद्वानजवळ मराठ्यांनीं नबाबास ससैन्य घेरल्यापासून खास अलीवर्दीकडून कोणाचीच बातमी मुर्शिदाबादेस पोंचली नव्हती. इतकेंच नव्हे, तर नबाबाची कोणतीच हालचाल अधिकाररीत्या त्यांना आली नव्हती, त्यामुळें नबाबाच्या जिवास कांहीं धोका झाला किंवा काय अशीही शंका त्यांच्या जिव्हाळ्याच्या लोकांस आली होती, परंतु वरील महत्त्वाचीं व तांतडीचीं पत्रें नबाबाच्या हातचींच गेल्यामुळें त्या पत्रांतील नमूद केलेल्या कामगिऱ्या

---

* संशोधक वर्ष ९ अंक ४

बजावण्यापूर्वी त्याच्या कुटुंबांत व राजधानींत आनंदोत्सव सुरू झाले, नमाज पढले गेले, खैराती वांटल्या गेल्या.



भोंसल्यांच्या बंगाल स्वारीच्या स्थानांचे स्केच.

सय्यद अहमदखान तोफखाना, दाणागोटा, तंबू वगैरे सामान घेऊन मदतीस आला, तेव्हां नबाबाच्या त्या क्षुधाक्रांत सैन्यानें शत्रूच्या गोटांतून धान्य लुटावें त्याप्रमाणें या नवीन आलेल्या धान्याच्या कोठारावर हल्ला केला व तें तसें कच्चेंच्या कच्चेंच धान्य आधाशासारखें कांहींनीं खाल्लें! नबाब स्वतः किल्ल्यांत आल्यानें व सैन्याचीही ताजी कुमक आल्यानें कटव्याचाही बंदोबस्त झाला व त्यामुळें व्यापारीही आपापला माल आणूं लागले व रहिवासीही येऊं लागले.

नबाब सुरक्षित पोचल्यानें त्याच्या चाहत्यांना आनंद झाला परंतु याच कारणानें व विशेषतः नबाबास मदत आल्यानें, भास्करपंत अडचणींत पडला. नबाब ताज्या दमानें आपणावर उलटणार हें निश्चित व त्या मार्‍यापुढें आपणावर पिछेहाटीचा प्रसंग येणार, शिवाय पावसाळाही नजिक आलेला, तेव्हां मागून सैन्याचा, रसदीचा, पुरवठा सुरू राहिल्याशिवाय या परमुलखांत राहणें सुरक्षित नाहींच, उलट धोक्याचें आहे, असा विचार करून पंतानें वीरभूम प्रांतांतून परत नागपुराकडे जाण्याचें ठरविलें. परंतु नबाबाच्या शत्रुपक्षांतील धूर्त व पाताळयंत्री जो मीरहबीब मराठ्यांना मिळाला होता त्यानें पंतास परत नागपुरास न जातां बंगालमध्येंच छावणी करून राहण्याची सल्ला दिली. मीर हबीबनें पूर्वींही दिलेल्या

सल्ल्याचा उपयोग भास्करपंतास झाला होता, त्यामुळें मीर हबीबचें वजन भास्करपंतावर पडलें. " बंगल्यांत छावणी करून राहण्यांत पैशाचाच प्रश्न असेल तर वाटेल तितके पैसे तुम्हास आणून देतों " असें मीर हबीबनें पंतास सांगितलें. पंतास त्याचें बोलणें मोडवेना म्हणून त्यानें तेथेंच छावणी करून राहण्याचें ठरविलें.

दोघांच्या विचारें मुर्शिदाबादेवर हल्ला करण्याचें ठरलें. मीर हबीबच्या तुकडीच्या मदतीस कांहीं फौज देऊन हबीबला मुर्शिदाबादेवर पाठविलें. अशा प्रकारचे हल्ले होणार हें जाणूनच नबाबानें आपल्या भावास व पुतण्यास बंदोबस्तानें राहण्यास आगाऊच कळविलें होतें. थोडक्या वेळांत लांब लांबचे पल्ले मारून अचानक हल्ले करण्याचा मराठ्यांच्या परिपाठाचा अनुभव नबाबास ताजा होता. शिवाय मुर्शिदाबाद हें शहर तटबंदीचें नसून खुलें होतें, त्यामुळें भाऊ व पुतण्या या दोघांच्यानेंही शहरसंरक्षणाचें काम होणार नाहीं असें वाटून नबाब स्वतःच राजधानीकडे निघाला, तो पोंचण्यापूर्वींच कटवा ते मुर्शिदाबाद हें ४०।५० मैल अंतर अवघ्या एक दिवसांत आवरून मीर हबीब सकाळच्या प्रहरीं मुर्शिदाबाद शहरांत शिरला व पहिल्या सपाट्यांत जगत्‌शेट अलमचंद या कोट्यधीशाच्या पेढीवर अचानक हल्ला करून अंदाजें २॥ कोट रुपये व जडजवाहीर त्यानें लुटलें! तेथून तो स्वतःच्या घरीं गेला, त्याचा भाऊ मीर शरीफ यास त्यानें घेतलें, नबाबाच्या वाड्यावर कडेकोट बंदोबस्त असल्यानें तेथें हल्ला चढवितां आला नाहीं. इतक्यांत नबाब स्वतः मुर्शिदाबादेजवळ आल्याची बातमी आल्यानें हातीं आलेली लूट घेऊन मीर हबीब शहराच्या बाहेर तिसऱ्या प्रहरीं पडला, व मग सायंकाळच्या सुमाराम नबाबाची स्वारी शहरसंरक्षणार्थ येऊन पोहोंचली! नबाब सुरक्षित परत आला या आनंदाच्या भरांत येवढ्या मोठ्या धनाढ्य सावकाराची पेढी मीर हबीबनें लुटून नेली इकडे कोणाचें विशेष लक्ष गेलें नाहीं. सबंध राजधानींत व राजवाड्यांत दीपोत्सव, आनंदोत्सव सुरू झाले. दानधर्म, खैराती सुरू झाल्या. मेजवान्या, पानसुपाऱ्या, नाचरंग यांना ऊत आला. नबाबाकडे नजरनजराण्यांचे ढीग पडले!

येवढी मोठी लूट घेऊन मीर हबीब कटव्यास येऊन पहातो तों भास्करपंत स्वदेशीं जाण्याच्या इरायानें मानभूमपर्यंत आधींच गेलेला दिसला. लांब लांब मजला मारून मीर हबीबनें त्यास गांठलें व आणलेल्या लुटीचा ढीग त्याच्यापुढें ओतला व तो पंतास म्हणाला " पैशाकरितां तुम्ही आलांना, हे घ्या पैसे. आणखीही वाटेल तेवढे आणीन परंतु तुम्ही बंगाल सोडून जाऊं नका." भास्करपंत ऐकेना तेव्हां मीर हबीबनें मराठ्यांना केलेल्या मदतीची आठवण करून दिली व यापुढेंही वाटेल तितका पैसा व शिवाय मुलूखही काबीज करून देण्यास तो तयार झालेला पाहून भास्करपंतानें बंगालमध्येंच छावणी करून राहण्याचें नक्की करून पुढील हालचालींचा आडाखा मीरहबीबच्या सल्ल्यानें ठरविला.

हुगळी ते हिजली

बंगालच्या उत्पन्नाची मुख्य मदार जमीनदार लोकांवर व हुगळी बंदरांतील उत्पन्नावर असे. तेव्हां भास्करपंतानें आपला डोळा प्रथम हुगळी बंदरावर ठेवला. या कामीं कारवाई करण्याचें काम मीर हबीबनें आपल्या अंगावर घेतलें. त्यानें प्रथम जामीनदारांशीं व हुगळी बंदरांतील व्यापाऱ्यांशीं संधान बांधलें.

मूळचा शिराजचा राहणारा हा मीर हबीब हिंदुस्थानांत आला तो प्रथम हुगळी बंदरांत येणाऱ्या जाणाऱ्या मालाची मोजदाद व नोंद करून कसातरी पोटाचा गुजारा करी. पुढें सुजाउद्दीनचा जांवई मुर्शिद कुलीखान याचा आश्रय त्यास मिळाल्यानें प्रथम ढाक्यास व नंतर कटक येथें राजकारणांत तो पुढें आला. त्यामुळें हुगळी बंदराची त्याला खडानखडा माहिती होती. या बंदरांतील कांहीं व्यापारी त्यानें फितविले, त्यांत मीर अबदुल हुसेन व मीर अबदुल कासीम हे प्रमुख होते. हुगळीचा किल्लेदार महमद यारखान हा यांना ओळखीत असे. हे दोघे व्यापारी रात्रीच्या वेळीं किल्ल्याच्या दरवाजाशीं गेले व किल्लेदारास कांहीं महत्त्वाची गुप्त बातमी देण्याची आहे असा बाहणा त्यांनीं केला. रखवालदारांनीं किल्लेदाराची परवानगी आणून दरवाजा उघडला, त्या वेळीं पंधरा लोक आंत शिरले त्यांत मीर हबीबही होता. दारूच्या धुंदींत लोळत असलेल्या त्या किल्लेदारास या लोकांनीं कैद केलें. किल्ल्यांतील इतर लोकांना वरील संकटाची यत्किंचित्‌ही कल्पना नसल्यानें ते नेहमींप्रमाणें बेफिकीर होते. भास्करपंताच्या फौजेची एक तुकडी शेषारावाच्या हाताखालीं किल्ल्याबाहेर दबा धरून बसली होती. या लोकांनीं किल्ल्यांत एकाएकीं शिरून किल्ल्याचा ताबा घेतला. शेषाराव हा तेथील किल्लेदार बनला व तेथें मराठी अंमल सुरू झाला. मोंगली झेंड्याऐवजीं दुसऱ्या दिवशीं मराठी भगवा झेंडा फडकत असलेला लोकांनीं पाहिला ! शेषारावानें हुगळी बंदराची व आसपासच्या भागाची नाकेबंदी केली व जमाबंदीही सुरू केली. बंदरांतील व्यापाऱ्यांनीं व आसपासच्या जमीनदारांनीं किल्ल्यांत येऊन शेषारावास नजरनजराणे दिले. हुगळीसारखें नबाबाचें मुख्य बंदरच ताब्यांत आल्यानें भास्करपंतावर करवसुली पैशांचा पाऊस सुरू झाला ! भास्करपंतानें आपली छावणी कटव्यासच ठेवली. मीर हबीब हा भास्करपंताचा मुख्य सल्लागार अथवा नायब बनला. तो कधीं कटव्यास तर कधीं हुगळीस राहूं लागला व नबाबाच्या नांवाची, त्याच्या राज्यकारभाराची शक्य तितकी नालस्ती व नुकसानी करीत राहिला. पावसाळा सुरू झाल्यानें नबाबास अगर भास्करपंतासही सैन्याच्या हालचाली मोठ्या प्रमाणांत करणें शक्य नव्हतें, तरीपण अशाहि स्थितींत मराठ्यांचा काय नेम ? त्यांच्या गनिमी काव्याच्या जलद हालचालींची चांगली कल्पना आतां आल्यानें तटबंदी नसलेल्या मुर्शिदाबादेवर त्यांचा अचानक हल्ला केव्हां होईल याचा नेम नसल्यानें

राजधानींत राहणें धोक्याचें समजून नबाबानें आपली छावणी अमानिगंज-तारकपूर येथें ठेवून तो स्वतःही तेथें मोठ्या बंदोबस्तानें अत्यंत सावध रीतीनें राहिला. खास नबाबाची ही मनःस्थिति, तर बाकीच्या सरदार व इतर लोकांची स्थिति काय झाली असेल ? मुर्शिदाबादच्या मोठमोठ्या सरदारांनीं व व्यापाऱ्यांनीं आपआपलीं बायकापोरें, चीजवस्त, जडजवाहीर भागीरथीच्या उत्तरतीरीं निरनिराळ्या गांवीं सुरक्षिततेसाठीं नेलें. मुर्शिदाबादचा नायब नवाजिश महमद यानें आपलीं बायकामाणसें, सामानसुमान भागीरथीच्या पलीकडे घोडा-गाडी येथें नवा राजवाडा बांधून तेथें नेलें. कोणी ढाका, कोणी मालदा, कोणी रामपूर येथें गेले.

पावसाळा संपेपर्यंत भास्करपंतास नबाबाकडून कसलीच भीति नव्हती. कारण प्रचंड भागारथी नदी या ठिकाणीं दक्षिणवाहिनी असून दोघांच्या मध्यें होती. त्यामुळें कटव्यापासून भागीरथीच्या पश्चिम बाजूस बरद्वान, विष्णुपूर, मिदनापूर, हुगळी व पुढें हिजलीवरून बालासोर बंदरापर्यंत सर्व प्रदेश मोकळा सांपडला होता व कटव्याच्यावरील भाग म्हणजे राजशाही व राजमहालचा कांहीं कांहीं भाग पंतास मोकळा सांपडला. मुख्यतः भागीरथी व इतरही नद्या या दिवसांत ओलांडून वरील प्रदेशांतील लोकांना अथवा अधिकाऱ्यांना नबाब मदत करणें शक्य नव्हतें. शिवाय प्रत्यक्ष नबाबाचीच मराठ्यांनीं नुकतीच केलेली दुर्दशा डोळ्यांसमोर असल्यानें, "आपल्या सारख्या सरदारफौजदारांचें मराठ्यांपुढें काय चालणार" या विचारानें वरील प्रदेशांतील मुसलमान अधिकारी मराठ्यांची फौज दिसल्याबरोबर पळ काढीत अगर दडून बसत ! मिदनापूरचा सुभा मिरकालंदर व ओढिसाचा नायब सुभेदार मीर मास्सम हे त्यांतल्या त्यांत मोठे सरदार पण तेसुद्धां भास्करपंताच्या भीतीनें जंगलांत दडून राहिले ! अशा प्रकारें बिहारचा भाग, पश्चिम व दक्षिण बंगालचा भाग व ओढिसाचा टापू पंताच्या अमलांत विशेष अडथळे न येतां आला !

प्रतिकाराची तयारी

भास्करपंताचें हें आक्रमण नबाबास दिसत नव्हतें असें नाहीं, परंतु पावसाळा संपेपर्यंत त्याचा प्रतिकार करणें शक्य नव्हतें. पावसाळा संपल्याबरोबर भास्करपंतास हांकलून लावलाच पाहिजे हें निश्चित होतें, परंतु भास्करपंताच्या शक्तीचा व युद्धकौशल्याचा अनुभव ताजा असल्यानें स्वतःच्या जवळच्या सैन्यानें हें काम होणार नाहीं हें पक्कें जाणून आणखी मोठें सैन्य जमविण्यांत नबाब सध्यां चूर झाला होता. नबाबाचा तिसरा पुतण्या व जांवई झैनुद्दीन अहमद हा पाटण्यास सुभेदार होता. त्यास पुष्कळ मोठें सैन्य जय्यत तयार करून मदतीस येण्यास नबाबानें लिहिलें व इतरही सरदारांना सैन्यासह बोलावलें. हिदायतअली खानाच्या मदतीनें पैशाची जमवाजमव करून ७८ हजार सैन्य व तोफखाना जय्यत तयार

करून, सुभ्याची जबाबदारी हिदायतअलीवर टाकून झैनुद्दीन अहमद पावसाळ्यांत मुर्शिदाबादेस पोहोंचला. येवढें मोठें सैन्य पाटण्याहून आलें तरीही मराठ्यांशीं लढण्यास तें पुरें पडणार नाहीं अशी शंका येऊन नबाबानें स्वतःचें सैन्यही आणखी वाढविलें व पावसाळा संपण्याची तो वाट पहात बसला.

मोंगल साम्राज्यांत इतर प्रांतांपेक्षां बंगालच्या उत्पन्नाचा भाग विशेष असे, परंतु मराठ्यांच्या या वरील आक्रमणामुळें व विशेषतः हुगळी बंदर मराठ्यांच्या ताब्यांत गेल्यानें नबाब अलीवर्दीकडून दिल्ली दरबारीं वसुलीचा भरणा होऊं शकला नाहीं, म्हणून चवकशी करण्यास बादशहाकडून याच सुमारास मुरीदखान नांवाचा एक अधिकारी मुर्शिदाबादेस येत असल्याची बातमी आली. तेव्हां नबाबानें या सरदारास पाटण्यासच राहण्यास सांगितलें व महमदशहा बादशहास काकुळतेनें कळविलें कीं, " मराठ्यांच्या हल्ल्यामुळें हा देश बेचिराख झाला असून, मराठ्यांना घालवून देण्याकरितांच मी इकडे जय्यत तयारी करीत आहें, व याच कारणानें वसुलाची रकम रवाना करणें शक्य नाहीं. इतकेंच नव्हे तर हें काम माझ्या एकट्यानें होईल किंवा नाहीं याची शंका आहे व बादशहांनीं या संकटसमयीं जर मदत दिली नाहीं तर बंगालच्या वसुलाचे पैसे पाठविण्याची गोष्ट राहूंच द्या, परंतु बंगालच हातचा जाऊन बादशाहीवरही संकट येण्याचा संभव आहे ! मराठ्यांची धामधूम ही मुर्शिदाबादेकडेच असल्यानें बादशहांनीं पाठविलेल्या सरदारास पाटण्यास थोपवून धरलें आहे. बादशहांनीं मेहरबान होऊन ताबडतोब एखाद्या मातबर सरदाराची ससैन्य रवानगी माझ्या मदतीसाठीं करावी."

बादशहानें ताबडतोब प्रधानांचीं मतें घेतलीं. सर्वांत प्रमुख अलाहाबादचा सुभेदार अमीरखान याचें मत घेतलें. सर्वांच्या मतें अलीवर्दीखानानें लिहिल्याप्रमाणें भोंसल्यांनीं बंगालकडे चालविलेल्या आक्रमणामुळें साम्राज्यास धोका आहे व नबाबास मदत करणें या वेळीं अत्यंत जरूर आहे असें ठरलें. त्याप्रमाणें बादशहानें सादतखानाचा जांवई औधचा सुभेदार * अबदुर मनसूरखान (याची व बिहारची हद्द लागली असल्यानें) यास निकडीचें पत्र पाठवून सैन्यासह अलीवर्दीस मदत करण्यास हुकूम सोडला. त्याचप्रमाणें पुण्यास बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांसही बादशहानें खलिता लिहून कळविलें कीं " बादशाही मुलखांतून चौथाईचे पैसे तुम्हास मिळतात परंतु तुमचेच भाईबंद नागपूरकर भोंसले बंगालमध्यें जाऊन धुमाकूळ करतील तर तुमचा चौथाईचा हक्क उरणार नाहीं, तेव्हां ताबडतोब तुम्ही बंगालकडे जाऊन भोंसल्यांचा सरदार भास्करपंडत याच्या लोकांनीं चालविलेले अत्याचार ताबडतोब थांबविण्याची व त्यास बंगालमधून काढून लावण्याची व्यवस्था करा व या कामीं अलीवर्दीखानास मदत करण्यास ताबडतोब जा."

* याचेंच नांव सफदरजंग होतें.

बादशहा एका बाजूस नबाबास मदत करण्याची व्यवस्था करीत असतां नबाबानें स्वतःही फार मोठें सैन्य इकडे जमा केलें होतें. तो स्वतः, त्याचे दोघे पुतणे, अबदुल अल्लीखान, मुस्ताफाखान व इतर मोठमोठे सरदार यांसह त्यानें मुर्शिदाबाद सोडलें. सर्वांत मोठा पुतण्या नवाझिस महमदखान यास राजधानीचे संरक्षणार्थ पुरेसें सैन्य देऊन ठेवलें. पावसाळा संपत आला होता परंतु नद्यानाले अद्याप ओसरले नव्हते. प्रदेश दलदलीचा होता तरीसुद्धां भास्करपंतास बंगालमधून हांकून लावण्यास नबाब आतुर झाला होता. थोड्याच दिवसांत तो कटव्यास पोहोंचला. नबाबाचें सैन्य व भास्करपंताचें सैन्य यांच्यामध्यें प्रचंड व सध्यां तुफान अशी भागीरथी नदी होती. भास्करपंताची छावणी, भागीरथी नदी व अजय नदी यांच्या संगमाच्याखालीं एक मैल होती. आठ दिवसपर्यंत दोन्ही सैन्यांतून एकमेकांवर गोळागोळी चालू होती. भास्करपंताचा हस्तक व नबाबाचा शत्रु मीरहबीब हा भास्करपंतास मदत करीत होता. त्यानें भागीरथी नदीच्या मध्यभागी नावेवर तोफा चढवून त्याचा मारा नबाबाच्या सैन्यावर चालू ठेवला होता. त्यामुळें नबाबास दिवसा गंगानदी उतरून जाणें शक्य नव्हतें व रात्रींच्या अंधारांत नदी उतरण्याची शंकाही येण्याचें कारण नसल्यानें रात्रीं तोफा चालवण्याची जरूर नव्हती व तितकी काळजीही करण्याचें कारण नव्हतें व म्हणून दिवसापेक्षां रात्रीच मराठी सैन्य बेफिकीर व निर्धास्त असे.

नबाबाची अचाट योजना

भास्करपंडित समोरासमोर लढाई करून हार जाणार नाहीं हें पक्कें माहीत असल्यानें कांहींतरी अजब व अचाट योजना करून त्यावर अचानक हल्ला करून व तोही रात्रीं मराठे बेसावध असतांना करून त्यांस नामोहरम केलें पाहिजे. परंतु एका रात्रींत असा हल्ला करावयाचा म्हणजे बरेंच मोठें सैन्य अथांग भरलेल्या भागीरथी व अजय या दोन्ही नद्या उतरून दुसऱ्या बाजूस व तेंही अंधारांत उतरविलें पाहिजे त्याशिवाय गत्यंतर नव्हतें व ही एकच एक अचाट योजना करण्याचें नबाबानें निश्चित केलें.

अजय नदी व भागीरथी नदी यांच्या संगमाच्या खालीं दोन मैलांपासून दहीहाट गांवाच्याही पुढेंपर्यंत भास्करपंताची छावणी पसरली होती व त्याच्या समोर पूर्वतीरावर नबाबाची छावणी होती. नबाबानें संगमाच्या वर दोन मैलांवर भागीरथीच्या पूर्वतीरावर नदीच्या पात्रांत बसतील इतक्या नावा जमा केल्या व एका अंधेऱ्या रात्रीं त्या एकापुढें एक पक्क्या बांधून नावांचा पूल तयार केला व त्यावरून बरेंच मोठें सैन्य संगमाच्या वर दोन्ही नद्यांच्या बेचक्यांत उद्धरणपूर येथें उतरविलें. आतां त्यास अजय नदी ही ओलांडावयाची होती. याच नावा अजय नदीवर नेऊन तेथेंही असाच पूल बांधणें जरूर होतें, म्हणून त्याच नावा संगमापर्यंत

आणून अजय नदीच्या पात्रांतून वर ज्या ठिकाणीं सैन्य उतरविलें होतें त्याच्या समोर वर वल्हवीत नेऊन तेथें एकास एक बांधून अजय नदीवरही तसाच पूल तयार केला.

मोंगली सैन्यास अजय नदीवर भीषण अपघात

वर उतरविलेल्या सैन्यास या दुसऱ्या पुलावरून पलीकडे जाण्यास नबाबानें हुकूम दिला. प्रथम मुस्ताफाखा, समशेरखा, उमरखान, रहीमखान, जाफरखान वगैरे सरदारांचें कसलेलें अफगाण सैन्य जात होतें. बरेंच सैन्य अजय नदीच्या या पुलावरून पार गेलें. मराठे डाराडूर झोंपा घेत असावेत, त्यांची छावणी हें सैन्य उतरलें तेथून चार मैलांवर होती. येवढें मोठें सैन्य भागीरथी ओलांडून आलें व अजय नदीही ओलांडीत होतें परंतु मराठ्यांना त्यांची कसलीच हालचाल समजूं नये, केवढी आश्चर्याची गोष्ट आहे? अजय नदी उतरून येत असतां नबाबाच्या सैन्यास एक मोठाच अपघात झाला. अजय नदी गंगेसारखी संथ व गंभीर नसून तिला खळखळाट व ओढ फार त्यामुळें मध्यंतरीं नावांचा पूल तुटून दोन नावा वाहून गेल्या! मागून येत असलेल्या सैन्याचा ओघ थांबला नाहीं. कसलीही गडबड न करितां चुपचाप नावांवरून जाण्याचे हुकूम त्यांस मिळाले असावेत म्हणून जो तो गर्दी करून मुकाट्यानें पलीकडे जाण्याच्या घाईत होता. त्यांत भरीस भर रात्रीचा काळोख होता. दोन नावा तुटून वाहून गेल्याचें कोणाच्या लवकर ध्यानांत आलें नाहीं. म्हणून मागून येणाऱ्या गर्दीनें जवळ जवळ १५०० मोगली सैन्य त्या रात्रीं अजय नदींत बुडून गेलें! नावा वाहून गेल्याचें लक्षांत येतांच, नबाबानें ताबडतोब फिरून त्या बांधून सैन्य नेण्यास सुरवात केली व एकंदर तीन हजार सैन्य अजय नदीही उतरून पहांटेच्या सुमारास पार गेलें.

दिवस निघेपर्यंत थांबल्यास आपलें सैन्य ३ हजारच आहे असें भास्करपंतास समजल्यास तो आपला फन्ना उडवील, तसें न व्हावें म्हणून त्या पहांटेच्या काळोखांत व मराठे उठले नाहींत तोंच हल्ला चढविला पाहिजे असें ठरवून त्यानें ताबडतोब तसा हुकूम सोडला. झुंजूक पहांटेची ही वेळ होती. मराठे बेसावध असले तरी त्यांची राहणी मोंगली सैनिकांप्रमाणें ऐषआरामी नसून अव्यवस्थित असली तरी सुटसुटीत असे. नबाबाचें उतरलेलें बहुतेक सर्व सैन्य पायदळ होतें व मराठ्यांचें बहुतेक सैन्य घोडदळ होतें. नबाबाचा हल्ला अगदीं अचानक होता. नबाबाचें सैन्य किती आहे याचा अंदाज अंधारामुळें न लागल्यानें पंतानें अवजड सामान सोडून बरद्वान-मिदनापूरच्या बाजूस जाण्याचा हुकूम दिला. परंतु अंधारामुळें मराठे वाटेल तिकडे पळत सुटले. दिवस निघाल्यावर ते एकत्र होऊन व्यवस्थित पीछेहाट घेत चालले. या वेळीं त्यांना नबाबाचें सैन्य थोडेंच असल्याचें दिसून आल्यावरून त्यांनीं उलट हल्ले चढविले. असे हल्ले प्रतिहल्ले चालू होते, तोंच नबाबाकडे आणखी सैन्य व तोफखानाही कुमकेस आला. त्यांनीं प्रथम

मराठ्यांची छावणी हस्तगत केली, व जोरानें मराठ्यांचा पाठलाग सुरू केला (साबान हिजरी ११५५).

भास्करपंतांची व्यवस्थित पीछेहाट

आपल्या (मराठ्यांच्या) दहीहाटच्या छावणीचा अडथळा दूर झाल्यानें नबाब आपलें सर्व सैन्य अलीकडे आणणार व आपण घेतलेलीं बरद्वान, हुगळी, मिदनापूर, हिजली इत्यादि ठाणीं नबाब घेणार तेव्हां आपण येथून सरळ नागपूरकडे वळल्यास आपण जरी निर्भय जाऊं तरी वरील ठाण्यांतील आपलें सैन्य हकनाक पकडलें जाईल म्हणून भास्करपंतानें वरील सर्व ठाणेदारांना तांतडीचीं पत्रें पाठवून आपल्या मुख्य सैन्यास मिदनापूर वाटेवर ताबडतोब येऊन मिळण्यास हुकूम सोडले. त्याप्रमाणें ते सर्व ठाणेदार आपापल्या सैन्यानिशीं पंतास मिळत गेले. सर्व एकत्र झाल्यावर ते सर्व कटकच्या दिशेनें चालले होते. एका जंगलांतून जातांना त्यांना सापांचीं अतोनात वारुळें लागलीं (सध्यांच्या संस्थान मोरभंजवालासोर भागांत असा भाग आहे. तेथें केवड्यांचीं बनें आहेत). पुढें जात असतां हरिहरपूर येथें शहा मसून या सरदारानें भास्करपंतास अडविलें. या दोघांच्या सैन्यांची मोठी लढाई होऊन त्यांत शहा मसूनचा पराजय होऊन तो मारला गेला. नबाब स्वतः मोठें सैन्य व तोफखाना घेऊन भास्करपंतास पकडण्याकरितां पाठोपाठ येतच होता परंतु भास्करपंत त्याच्या हातीं न लागतां व्यवस्थितपणें नागपूरकडे सैन्यासह निघून आला !

बरद्वान ते कटव्या पर्यंतचें ४० मैल अंतर पीछेहाट घेत घेत नबाब मागें जेव्हां कटव्यास सुखरूप पोहोंचला त्या त्याच्या शौर्याच्या पीछेहाटीची व त्या युद्धकौशल्याची मुसलमान इतिहासकार बरीच तारीफ करतात, परंतु कटव्यापासून कटकपर्यंत चारशें मैल अंतर पीछेहाट करीत शक्य ती मनुष्यहानि वांचवून व वाटेंतील मुसलमान सरदारांशीं लढाया देत देत भास्करपंत परत आला. यास तेच मुसलमानी इतिहासकार " पळ " म्हणतात. " आपला तो बाब्या व दुसऱ्याचें तें कार्टें " दुसरें काय ?

नबाबानें विलक्षण धाडसानें व अचाट योजनेनें दोन तुफान नद्या एकाच अंधाऱ्या रात्रीं ससैन्य ओलांडून मराठी छावणीवर पहाटेच्या काळोखांत अचानक हल्ला चढवून चारशें मैल पाठलाग करूनही अपेक्षेप्रमाणें भास्कर पंडित मारला गेला नाहींच, पण सांपडलाही नाहीं ! उलट पैशाचा अपरंपार खर्च होऊन १५०० मुसलमान लढवय्ये हकनाक गंगास्तृप्यंतु झाले ! अलीवर्दीखान भास्करपंताचा पाठलाग करीत कटकपर्यंत गेला होता. पुढें पाठलाग होणें शक्य नाहीं असें पाहून भास्करपंताच्या नांवानें मनगटें चावीत तो परत मुर्शिदाबादेकडे जाण्यास फिरला. कटक येथें त्यानें नबीखानास कटकची

सुभेदारी दिली व जानकीराम (नवाबाचा प्रधान) याचा मुलगा दुर्लभराम यास नबीखानाचा कारभारी नेमलें.

नबाबानें येवढी प्रचंड घडामोड स्वतःच्या हिंमतीवर घडवून आणली – अर्थात् त्यास फलप्राप्ति झाली नाहीं ही गोष्ट निराळी – परंतु बादशहाकडून येणाऱ्या मदतीची कांहींच बातमी नव्हती. कटक येथून निघाल्यावर बादशहाच्या हुकमाप्रमाणें औधचा सुभेदार अबदुल मनसूर खान हा सैन्यासह नबाबास मदत करण्यास पाटण्यापर्यंत आल्याची बातमी आली. या बातमीच्या लागोपाठ दुसऱ्याही बातम्या आल्या. त्या म्हणजे मदतीला आलेला अबदुल मनसूरखान हा पाटण्यास नबाबाच्याच वाड्यांत जबरदस्तीनें तळ देऊन आहे व तेथील मालाची अफरातफर करीत आहे, लोकांवर जोर अत्याचारजबरदस्ती करून पैसे उकळीत आहे इत्यादि. या व अशाच बातम्यांमुळें अबदुल मनसूरखानाचा समाचार घेण्यास तांतडीनें नबाब परत निघाला. नबाब बरद्वान येथें आला तेव्हां अबदुल मनसूरखान लखनौकडे निघून गेल्याचीही बातमी त्याला मिळाली.

६ बाळाजी बाजीराव व अलीवर्दीखान यांची अभूतपूर्व भेट

याच सुमारास आणखी एक विलक्षण घटना घडून येत होती ! भास्करपंत कटव्याहून पीछेहाट घेऊन परत फिरण्याची बातमी पोंचल्याबरोबर रघूजी भोंसला आणखी फौज घेऊन भास्करपंत नागपुरास पोंचण्या आधींच त्याला येऊन मिळाला. ताज्या दमाची ही फौज घेऊन ८०० मैल वाट चालून दामोदर नदी उतरून रघूजी बरद्वान–कटव्याच्या बाजूस फिरून आला. दुसऱ्या बाजूनें बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवा बादशहाच्या निकडीच्या खलित्याप्रमाणें नबाबास मदत करणें भाग आहे असें समजून ५० हजार फौज घेऊन गयेवरून पाटणा भागलपूर-वरून मुर्शिदाबादच्या रोंखें तांतडीनें येत होता. वाटेंत ठिकठिकाणीं तो जबरदस्तीनें खंडणी वसूल करीत येत असल्याच्या तक्रारी मुसलमान इतिहासकारांनीं केल्या आहेत. रघूजी भोंसला बंगालच्या नबाबापासून चौथाई वसूल करण्यास आला होता ! व नानासाहेब पेशवा रघूजीस बंगालमधून घालवून देण्यास म्हणजे रघूजी-विरुद्ध नबाबास मदत करण्यास आला होता ! कर्मधर्मसंयोगानें हे शाहू महाराजांचे दोन हस्तक व जबरदस्त वीर एक झाले असते तर ! ! परंतु ज्या घटना पूर्वीच घडून गेल्या त्याबद्दल आज २०० वर्षांनीं " असें झालें असतें तर " बद्दल विचार करण्यांत हांशील काय ? त्या वेळीं प्रत्यक्ष काय घडलें येवढें आपण विस्तारानें पाहूं.

पन्नास हजार सैन्याच्या जोरावर नानासाहेब जबरदस्तीनें खंडण्या वसूल करी अशीं प्रत्यक्ष उदाहरणें " शेरे मुताखरीन " ग्रंथांत दिलीं आहेत. दाऊदनगर

व घाऊसगडचा किल्लेदार अहमदखान खंडणी देईना. तेव्हां नानासाहेबानें दाऊदनगर लुटून फस्त केलें. गांवच्या मातीविटांनीं किल्ल्याचा खंदक भरून काढला. नानासाहेब किल्ल्यांत शिरतो तों, किल्लेदार दुसऱ्या वाटेनें पळून गेला. व्यापाऱ्यांच्या मध्यस्थीनें नानासाहेबानें पन्नास हजार रुपये वसूल केले, तेव्हांच गांव सोडला. ठिकरी, गया, मणपूर, बहार या ठिकाणांतून खंडणी वसूल करीत तो मोंगीर-भागलपूरकडे आला. झैनुद्दीन अहमदच्या गैरहजेरींत नायब सुभेदारीचें काम करीत असलेल्या हिदायतअली खानाच्या वजनामुळें बनारसचा प्रसिद्ध गोविंदजी नाईक पेढीवाला सावकार याच्या मध्यस्थीनें नानासाहेब येवढें मोठें पाटणा शहर पण तेथेंमात्र कसलाही त्रास न देतां व खंडणी वसूल न करितां तें वगळून पुढें गेला! भागलपुरास एका घोसखान नांवाच्या सरदाराच्या विधवेनें नानासाहेबास दाद दिली नाहीं. आपल्या वाड्यांतून ती आपल्या विश्वासू लोकांनिशीं लढत राहिली! या बाईच्या शौर्याची बातमी नानासाहेबास समजल्यावर त्यानें तिची वाहवा करून तिला पोषाख व कांहीं नजराणा दिला व तिच्या वाटेस कोणीं जाऊं नये म्हणून हुकूम सोडला व सर्व सैन्य निघून जाईपर्यंत आपले लोक तिच्या वाड्यावर संरक्षणार्थ ठेवले, व तिचा गौरव केला.

नानासाहेब आपल्या मदतीस येत आहे हें ऐकून अलीवर्दीखानही भागलपूरच्या बाजूस आला. भागलपूरच्या दक्षिणेस गंगा किनारीं दोघांच्या गांठी *पलटीमनोर येथें ता. ८ एप्रील १७४३ रोजीं पडल्या. नबाब अलीवर्दीखान नानासाहेबाकडे प्रथम गेला. नबाब येत आहे असें समजल्यावर नानासाहेबानें त्यास आलिंगन देऊन हातीं धरून आपल्या बैठकीवर शेजारीं बसविलें. पोशाख, पानसुपारी, अत्तरगुलाब होऊन, थोड्या औपचारिक गोष्टी झाल्यावर नबाब निघून गेला. दुसऱ्या दिवशीं नानासाहेब परत भेटीस नबाबाकडे गेला. नानासाहेबाचें स्वागत करण्यास नबाब बराच सामोरा गेला. मोठ्या मानमरातबानें त्यास आपल्या तंबूंत आणून आपल्या शेजारीं गादीवर बसविलें. नबाबानें त्यास पुष्कळ चमत्कृतिपूर्ण व दुर्मिळ अशा वस्तु नजर केल्या. निरनिराळ्या प्रकारची प्रसिद्ध बंगाली मिठाई, खाद्य पेयें, मेवा, फळफळावळ यांसहित दोघांचे फराळ झाले. पानसुपारी, अत्तरगुलाब होऊन जरतारी वस्त्रें, पोशाख, जवाहीर यांचे नजराणे झाले. एक अत्यंत मौल्यवान हिऱ्यामोत्यांचा कंठा नजर केला! व एक उत्तम जातीचा हत्तीही नजर केला! देशांत शांतता प्रस्थापित करण्याबाबत

* टीपः— ३० मार्च मुस्ताफाची नानासाहेबाची गांठ, ३१ मार्च मुर्शिदाबादेस मुक्काम अल्लाबक्षाची गांठ, ता. ८ एप्रील पलटीमनोर येथें नानासाहेब व अलीवर्दीखानाची गांठ.

व रघूजीच्या कृत्यांबद्दलही प्राथमिक व औपचारिकरीत्या थोडें संभाषण झाल्यावर नानासाहेब आपल्या छावणींत परत आला.

तिसरे दिवशीं अलीवर्दीखानानें रघूजीस बंगालमधून घालवून देण्याबाबत बोलणें लावलें. तेव्हां नानासाहेबानें बिहार-पाटणा प्रांताचा कांहीं वर्षांचा "चौथाईचा" हिशेब दाखवून "येणें बाकी" पुढें मांडली. नाइलाजानें ती येवढी मोठी रकम (६० लाख) देण्याचें वचन नबाबानें मुकाट्यानें दिलें व दोघांच्या सैन्यानीं मिळून रघूजीस बंगालमधून घालवून लावण्याचें सुचविलें. त्याप्रमाणें थोड्याच दिवसांत नबाब रघूजीवर चालून जाण्यास निघालाही, परंतु नानासाहेबानें त्यास अडथळा आणला. नुसत्या वचनावर विश्वास ठेवणारा नानासाहेब नव्हता. त्यानें चौथाईची एकंदर बाकी नगद भरती केल्याशिवाय रघूजीवर चाल न करण्यास बजावलें. रकम दिल्याशिवाय नानासाहेब मुळींच सोडणार नाहीं. नानासाहेबामागें त्याची ५० हजार मराठी फौज त्यास प्रत्यक्ष दिसतच होती. त्यामुळें कसलीही प्रतारणा अगर अजब योजना, चलाखी, भुलथाप चालणार नाहीं हें नबाब जाणून होता, परंतु नानासाहेब बिहारमध्यें शिरल्यापासून नबाबाच्या मनांत याहीपेक्षां अत्यंत महत्त्वाची, काळजीची व धोक्याची एक गोष्ट दहशत उत्पन्न करून होती. ती म्हणजे, बाह्यतः एकमेकांविरुद्ध परंतु वस्तुतः एकाच शाहू महाराजांचे हे दोघेही पराक्रमी व मुत्सद्दी मराठे वीर-महावीर हस्तक आपण कबूल केलेली रकम भरती करण्यास आढेवेढे अगर आगेंमागें केलें व कर्मधर्म-संयोगानें हे दोघे जण एक झाले तर आपली चटणी उडेल ही ती गोष्ट होय; व असें घडल्यास पुढचें दृश्य डोळ्यांपुढें असल्यानें नबाबानें येवढीही ती मोठी रकम नानासाहेबाकडे कसलेही आढेवेढे न घेतां ताबडतोब भरली व तो रघूजीवर चाल करण्यास निघाला.

भदोले-जावळ

इकडच्या हालचालींची बित्तंबातमी रघूजीस मिळत होती. नानासाहेब व नबाब यांच्या सैन्यापुढें आपलें चालणार नाहीं; तेव्हां तात्पुरती माघार घेऊन परत फिरणेंच श्रेयस्कर असें ठरवून तो पश्चिम बंगाल व बिहारच्या बाजूनें निघाला. नबाब रघूजीवर एकटाच निघून १।२ दिवस वाट चाललाही, परंतु नानासाहेबास हें समजलें तेव्हां नानासाहेबानें नबाबास कळविलें कीं "तुमच्यानें रघूजीस पकडणें साधणार नाहीं. तुम्ही एकटे जाऊं नका. दुसऱ्या वाटेनेंच त्याला चकवून गांठलें पाहिजे" असें कळवून नानासाहेबानें लांबचा वळसा घेऊन, खटावद परगण्यांत, भदोळे तालुक्यांत जावल गांवीं त्यांस गांठलें (हा गांव गाझीपूर जिल्ह्यांत दिलदारनगरजवळ आहे). ही लढाई

ता. १५ एप्रील सन १७४३ च्या सुमारास झाली. नानासाहेबाची व रघूजीची जंगी लढाई होऊन रघूजीचा पराजय होऊन तो नागपुरास परत गेला. भास्करपंत यावेळीं कांहीं फौजेनिशीं मिदनापूर येथें होता. वरील हकीगत त्यास समजल्यावर तोही नागपुरास परत गेला.

पेशव्यांच्या वकिलाचा उपमर्द

नानासाहेब सैन्यासह निघून गेल्यावर चौथाईचा व आणखीही कांहीं बाबींचा निकाल करून घेण्याकरितां नानासाहेबानें रघुनाथ जयराम नांवाचा एक वकील अगर अधिकारी मागें ठेविला होता. या एकंदर स्वारींत अथवा प्रकरणांत नाना साहेबानें नबाबावर विलक्षण दाब व दरारा बसविला होता, त्या जोरावर हा मागें ठेवलेला रघुनाथ जयराम नबाबाच्या अधिकाऱ्यांशीं उद्धटपणें बोलत व वागत असावा. कारण मुस्ताफाखानाशीं बोलतांना तो कांहींतरी कमीजास्त बोलल्यामुळें, चिडून जाऊन मुस्ताफाखानानें त्याचे कपडे फाडून त्यास मारहाण केल्याचाही उल्लेख शेरमुताखरीनमध्यें केला आहे ! मुस्ताफाखान म्हणजे नबाबाचा सरसेनापति असून तो आडदांड कडव्या अफगाण जातीचा होता व तो अलीकडे अधिकारमदानेंही उन्मत्त झाला होता. वरील गोष्ट झाल्यावर रघुनाथ जयराम हा झालेल्या अपमानाचा मोबदला घेण्याचा विचार करून परत छावणींत आला व त्यानें आतांपर्यंत झालेले कारारमदार मोडल्याचें कळविलें व वरील त्याच्या "अपमानाची झालेली हकीगत नानासाहेबास प्रत्यक्ष कळवून त्याचा सूड उगवून घेण्यास नानासाहेबास परत घेऊन येण्यास जातों" असें नबाबास स्पष्ट कळविलें. ही बातमी नबाबास मिळाल्याबरोबर त्यानें रघुनाथ जयरामास ताबडतोब बोलावून घेतलें व मुस्ताफाखा म्हणजे नुसता आडदांड शिपाई गडी आहे, तो बेअकली आहे, त्याच्या कृत्याकडे दुर्लक्ष कर, नानासाहेबापर्यंत ही बाब जाऊं देऊं नको इत्यादि प्रकारें त्याचें सांत्वन करून

---

१ ही लढाई राजवाडे खं. २ पेशव्यांची शकावलि पान ९४ मध्यें ता. १९ आक्टोबर १७४२ रोजीं झाल्याचें लिहिलें आहे. ही तारीख बरोबर नाहीं. कारण यावेळीं नानासाहेब बुंदेलखंडाच्या बाजूस (ओरछा) होता व रघूजी भोंसला शिराळ्याच्या बाजूस दक्षिणेंत होता असें पेशवेदप्तर भाग २० पान १९ व २० लेखांक २७ ता. ३० सप्टेंबर १७४२ व लेखांक २८ ता. ८ नोव्हेंबर १७४२ यावरून स्पष्ट होत आहे. शकावलींतील चूक दुसऱ्या इतिहासलेखकांनीं लिहिली आहे. ती लढाई नानासाहेबाची व अलीवर्दीची अपूर्व भेट ता. ८ एप्रील १७४३ रोजीं झाल्यावर एक आठवड्यानंतर झाली म्हणजे भदोळची लढाई ता. १५ एप्रील सन १७४३ च्या सुमारास झाली, हें उघड आहे.

त्यास बहुमोल पोशाख दिले, बक्षिसें दिलीं व त्यास खुष केलें व त्यास परत पाठविलें. त्यास एक उमदा घोडाही नबाबानें नजर केला! तो निघून गेल्यावर नबाबानें मुस्ताफाखानास आपल्यासमोर उभें केलें व त्याची चांगलीच हजेरी घेतली. या मनुष्यानें ही तक्रार नानासाहेबाकडे केली तर " वकिलाचा अपमान तो आपला अपमान " असें समजून नानासाहेब या अपघाताचा सूड उगविण्यास परत फिरला तर काय नतीजा होईल याची स्पष्ट कल्पना त्या आडदांड सेनापतीस नबाबानें आणून दिली. परंतु मुस्ताफाखा अधिकारमदानें उन्मत्त बनल्यामुळें त्यानें नबाबासही उलट उत्तरें दिलीं.

७ भास्करपंताची बंगालवर फिरून स्वारी व त्याचा खून

नानासाहेबाच्या वरील चढाईबद्दल रघूजीनें शाहू महाराजांकडे तक्रार केली. कारण रघूजी व नानासाहेब दोघेही सातार्‍यास गेले होते व तेथें या प्रकरणीं कांहींतरी तडजोड होऊन शाहू महाराजांनीं फिरून असा आपआपसांत लढण्याचा प्रसंग न यावा याबद्दल कांहीं हुकूम दिले. त्या प्रमाणें रघूजीनें भास्करपंतास फिरून बंगालवर पाठविण्याचें ठरविलें. भास्करपंत अलिकरवाल इत्यादि २१ सरदारांसह बरोबर २० हजार फौज घेऊन एकतर नबाबाचा पराजय करावयाचा अगर चवथाईतरी घेऊन यावयाची अशा निश्चयानें बंगालवर चालून आला व त्यानें नबाबाशीं चौथाईचें बोलणें चालविलें.

अलीवर्दीखानाची या वेळची शारीरिक व मानसिक स्थिति अत्यंत वाईट होती. तो नबाब झाल्यापासून (सन १७३९) सारख्या बंडाळ्या मोडणें व गेल्या दोन वर्षे मराठ्यांशीं लढाया देणें यामुळें तो अगदीं हैराण झाला होता. वृद्धापकाळामुळें त्यास ही युद्धाची दगदग नकोशी झाली होती. राजकारणांची व इतर अंतस्थ घडामोडींची दगदग आतां त्यास सहन होत नव्हती. अशा शारीरिक व मानसिक दौर्बल्यावस्थेच्या वेळीं त्यास शारीरस्वास्थ व मनःस्वास्थ्य पाहिजे होतें. परंतु याच वेळीं वर सांगितल्या प्रमाणें भास्करपंतांची " चौथाई " ची घोंड त्याच्यापुढें दत्त म्हणून उभी राहिली. त्यामुळें वैतागून त्यानें हें चौथाई-प्रकरण कायमचें निकालांत काढण्याकरितां एक विलक्षण घटना–दुर्घटना–घडवून आणण्याचा घाट घातला.

भास्करपंताच्या खुनाची निर्दय–राक्षसी–योजना!

सर सेनापतीच्या जागीं चढविलेल्या मुस्ताफाखानास नबाबानें एकांतांत बोलावून आपलें हृद्गत त्यास उघडें करून असें सांगितलें कीं, " कसेंही करून

या मरगळ्या भास्कर पंडतास व त्याच्या सर्व सरदारांस व त्याच्या फौजेस कांहींतरी अजब कारवाई करून जगांतून नाहींसें केल्याशिवाय मला व माझ्या रयतेस शांतता अशी मिळणें शक्य दिसत नाहीं व हें काम आमच्या बंगालच्या नेभळट सैनिकांकडून अथवा सरदारांकडून मुळींच होणार नाहीं. हें काम तुमच्यासारखे कडवे अफगाण लोकच अंगावर घेऊन पार पाडतील म्हणून तूंच हें काम स्वतः अंगावर घ्यावेंस अशी माझी इच्छा आहे. ”

ही असली भयंकर, नीच, विश्वासघाताची, निर्दय अशी कारवाई करण्याची नबाबाची अचाट कल्पना व बेत ऐकून जात्या कडवा व आडदांड असा तो अफगाण सेनापती मुस्ताफाखानही थक्कच होऊन गेला व त्यानें नबाबास या असल्या राक्षसी योजनेबद्दल एकदम तीव्र नापसंती दाखविली व हें असें नीच विश्वासघातांचें अमानुष कृत्य आपल्या हातून साफ होणार नाहीं असें स्पष्ट शब्दांत सांगितलें. परंतु मुस्ताफाखा अनुकूल असल्याशिवाय हें अचाट काम निर्विघ्न पार पडणार नाहीं हें नक्की माहीत असल्यानें नबाबानें त्यास निरनिराळ्या तऱ्हेनें आळवून बक्षिसें, पदव्या वगैरेंचीं आमिषें दाखवून विनवूनही पाहिलें, परंतु तो मुस्ताफाखान कबूल होईना, तेव्हां सरशेवटीं आपल्या स्वतःच्या अधिकारांतली स्वतःच्या खालोखाल उच्च दर्जाची पाटणाची जी सुभेदारीची जागा तीही देण्याची तयारी नबाबानें दाखविली ! तेव्हांमात्र मुस्ताफाच्या तोंडास पाणी सुटलें व थोडेफार आढेवेढे घेत व हो, ना, करीत पाटण्याची सुभेदारी देण्याचें वचन नबाबाकडून नक्की करून घेऊन नंतर हा बार कसा उडवावयाचा याबाबत वाटाघाटी व दोघांचीं गुप्त खलबतें होऊन भास्कर पंडितास व त्याच्या सर्व सरदारांना या नाहीं त्या युक्तिप्रयुक्तीनें आपल्या छावणींत बोलावून सर्वांचा एकदम फन्ना उडवावयाचा बेत कायम झाला !

जाळें पसरलें !

मुस्ताफाखानानें चौथाईचें बोलणें करण्याचें काम स्वतःकडे घेतलें व बोलाचालींत अशीच चर्चा चालू ठेवली कीं, नबाब या लढायांना अत्यंत कंटाळला आहे, मराठ्यांपुढें तो अगदीं जिकिरीस आला आहे, इतकेंच नव्हे तर भास्करपंतासमोर लढाईस उभें राहण्यास तो भीत आहे, वृद्धापकाळामुळें त्यास आतां शांतता पाहिजे आहे, तेवढ्याकरितां तो तह करण्यास आतूर झाला आहे, या व अशा बोलाचालींवर पंताचा विश्वास बसत चालला. भास्करपंतासही लढाई न करितां पैसे वसूल होण्याची आशा वरील बोलाचालींवरून दिसल्यानें आपणही तह करण्यास तयार असल्याचें त्यानें कळविलें, व नबाबानें तहाचीं कलमें ठरविण्याचा सर्वाधिकार मुस्ताफाखान व दिवाण जानकीराम या दोघांना दिला. जानकीराम हा नबाबाच्या अत्यंत विश्वासांतला मनुष्य होता. भास्करपंत व त्याचे सरदार यांना यमसदनास पाठविण्याची गुप्त

योजना मुस्ताफाखाशिवाय या फक्त जानकीरामासच त्यानें सांगितली होती. भास्करपंताशीं कोणीं कसें बोलावयाचें, वाटाघाटी कोणच्या धर्तीवर करावयाच्या, पंतास काय निमित्तानें केव्हां, कोठें भेटीस बोलवावयाचें वगैरे सर्व धडे नबाबानें या दोघां हस्तकांना गुप्तपणें दिले, व हे दोघेही मुर्शिदाबादेहून कटव्यास भास्करपंताकडे आले. हें नीच व अधम कृत्य बिनबोभाट व सफाईनें व्हावें म्हणून नबाबही राजधानी सोडून कटव्याच्या वाटेवर अमानीगंज येथें छावणी करून राहिला. वरील दोघांही बिलंदर मुत्सद्दयांनीं आपल्या अंतरंगाचा यत्किंचित् सुगावा आपल्या भाषणांत व वागण्यांत लागूं दिला नाहीं. पंताशीं मिठास बाता झोकून मूर्शिदाबादच्या व बरद्वानच्या बंगाली मिठाया व फळें त्यास खिलवून निरनिराळीं बक्षिसें देऊन व आमिषें दाखवून व आपण बोलतों तें अंतःकरणापासून बोलतों हें सिद्ध करण्यास मुस्ताफानें कुराण शरीफवर व जानकीरामानें पवित्र गंगाजलावर हात ठेवण्यास कमी केलें नाहीं! व आणाभाकाही वाहण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं! या शपथा व वचनें सपशेल खोटीं असून त्यांवर विश्वास ठेवल्यास आपल्या सर्वांचा निःपात होणार आहे याची शंकाही भास्करपंतास आली नाहीं. या दोघां सावांनीं भास्करपंतावर अशी भुरळ घातली कीं पंत नबाबाच्या भेटीसही जाण्यास कबूल झाला!

वाटाघाटींत ज्या अटी, करार वगैरे तयार केले ते, नबाबाची व पंताची गांठ पडेल त्या वेळीं, नक्की व्हावयाचे असें ठरलें. वरील वाटाघाटी होत होत्या तेव्हां पंतही अगदींच स्वस्थ नव्हता. त्याच्या व त्याच्या सल्लागारांच्या मनांत कांहीं किंतु असावा. कारण भेटीस जाण्यापूर्वी अत्यंत विश्वासू अशा आपल्या अली करवाल नांवाच्या मुख्य सरदारास वरकरणी नबाबास मान देण्यास परंतु वास्तविक अंतस्थ बातमी काढण्यास त्यानें दरबारीं पाठविलें. नबाबानें आपल्या भाषणाचा व मिठास बोलीचा व मेवामिठाईचा अलीकरवालवर इतका मारा केला कीं तो अगदीं दबून गेला. या बोलण्यांत व त्या मेवामिठाईंत गुप्त सुरुंग भरून ठेवला आहे याची शंकाही त्याचे मनास शिवली नाहीं.

भेटीची जागा मुक्रर झाली ती नबाबाची छावणी अमानिगंज पासून दक्षिणेस १२।१४ मैल व भास्करपंताच्या कटव्याच्या छावणीपासून उत्तरेस १२।१४ मैल गंगेकांठीं मनकारा * येथें एका मैदानांत ठरली. तेथें एक भव्य उघडा तंबू (शामियाना) व त्याभोंवतीं बरीच जागा सोडून उंच भिंती वजा कनात चोहोंबाजूंस उभी केली. भेटीचें महत्त्व मोठें असल्यानें सर्वसाधारण लोकांना व अधिकारी लोकांना पहाण्यास व उभे राहण्यास मुबलक जागा सोडली होती. या ठिकाणीं होऊं घातलेल्या भयंकर गोष्टीची कल्पनाही कोणास येणें शक्य नव्हतें. इतकी ही गोष्ट अत्यंत गुप्त ठेवण्यांत आली होती.

---

* बऱ्हामपूर क्यांटोनमेंटच्या दक्षिणेस ४ मैलांवर.

सावज अडकलें

ठरल्या वेळेच्या थोडें अगोदर नवाब त्या ठिकाणीं आला. त्या वेळीं त्याचा पुतण्या व जांवई सय्यद अहमद, आताउल्ला, मिरकाशीमखान वगैरे अधिकारी तेथें होते परंतु एकासही या गुप्त कटाचा सुगावा नव्हता! नबाबानें ही गोष्ट मुस्ताफाखा, जानकीराम यांशिवाय आणखी एका अधिकाऱ्यास कळवून ठेविली. तो म्हणजे मिरझा हकीमबेग हा होय. इतर अधिकाऱ्यांनीं आयत्या वेळीं सावध असावें म्हणून मिरझा हकीमबेगनें सय्यद अहमद व आताउल्लाखान यांना तंबूंतील व्यवस्था व शोभा दाखविण्याच्या मिषानें बाजूस नेऊन आयत्या वेळीं त्यांनीं सावध रहावें म्हणून इशारा देऊन ठेवला.

नबाब व कटांतील मुख्य अधिकारी व ज्यांच्या हस्तें हें गुप्त कृत्य उरकावयाचें होतें असे ५० सशस्त्र लढवय्ये तंबूंत आपापल्या नेमलेल्या जागीं उभे राहिले. त्यांत २२ मोठमोठे लष्करी अधिकारी होते. कांहींजण तंबूच्या खांबाशीं उभे होते. कांहीं नबाबाच्या सिंहासनामागें उभे होते.

शूर वीर भास्करपंडत कोनसा ?

मुस्ताफाखान व जानकीराम भास्करपंतास आणण्यास सामोरे गेले. पंडित मेण्यांतून आला. तो खालीं उतरल्याबरोबर मुस्ताफाखानानें त्याचा उजवा हात हातांत घेतला व जानकीरामनें डावा हात हातांत धरला व त्याचें स्वागत करून त्यास अदबीनें धरून ते तंबूच्या दरवाजाकडे त्यास घेऊन बोलत बोलत चालले. दरवाज्याच्या आंत आल्याबरोबर दोघांनीं आपले हात सोडून कांहीं निमित्त करून दोघे बाजूस गेले. भास्कर पंडित आंत शिरल्याबरोबर नबाबानें सिंहासनावर उभे राहून पृच्छा केली कीं " इसमे शूर वीर भास्कर पंडत कोनसा है ? " मिरझा हकीम बेगनें व इतर कांहींनीं भास्करपंताकडे बोट करून हाच तो भास्करपंडत असें बोटानें दाखविलें. नबाबानें खात्री करून घेण्याकरितां तोच प्रश्न तीन वेळां केला व तीन वेळां तेथील लोकांनीं हाच तो भास्करपंडत म्हणून बोटानें दाखविलें.

सबको एकदम काट डालो

भास्कर पंडित कोणचा हें निश्चित झाल्यावर नबाबानें त्याच्यावर व त्याच्या सरदारांवर एकदम तुटून पडण्यास व सर्वांना ठार मारण्यास हुकूम दिला! असला हुकूम येथें दिला जाईल याची कल्पनाही २१४ मंडळीशिवाय तेथें जमलेल्या लोकांना मुळींच नसल्यानें वरील हुकूम ऐकून बहुतेक सर्व आश्चर्यचकित झाले. मीर कासीमखान समोर होता. त्यानें फिरून एकदां हुकूम काय तो स्पष्ट शब्दांत नबाबाकडून मागितला. नबाबानें जोरजोरानें फिरून हुकमी आवाजांत तोच हुकूम दिला कीं " या सर्व लुटारू मरगठ्यांना ठार करा! " ताबडतोब नबाबाचे लष्करी

अधिकारी बरखोरदारबेगप्रभृति मराठ्यांवर तुटून पडले. मीर कासिमनें तरवारीच्या एका फटकाऱ्यासरशीं भास्करपंडितास खालीं पाडलें! हा सर्व प्रकार इतक्या अल्पावधींत झाला कीं, मराठी सरदारांना भास्करपंडित खालीं पडेपर्यंत हा प्रकार कांहींच लक्षांत आला नाहीं. पंडित पडल्यावर मराठी सरदारांचे डोळे उघडले व आपण कोणच्या परिस्थितींत आहों याची कल्पना आली. वैतागानें चिडून जाऊन त्यांनीं मुसलमानांची लांडगेतोंड चालविली. तेथें भास्करपंतास धरून फक्त २२ च सरदार होते. परंतु या मूठभर लोकांनीं तेथें येवढी धुमश्चक्री केली कीं, त्या तंबूच्या दरवाजाच्या आंत मुंडकीं व हात वर उडत असलेले दिसत होते व तेथें रक्ताचा चिखल झाला होता असें शेरेमुताखरीनच्या लेखकानें लिहिलें आहे! सरशेवटीं तेथें उभारलेल्या कनातीच्या दोऱ्या तोडल्यामुळें शत्रुमित्र समजेना. सरशेवटीं कित्येक मुसलमानांना यमसदनास पाठवून त्या सर्व विश्वासू मर्द मराठे वीरांनीं भास्करपंताबरोबर स्वतःचाही आत्मयज्ञ केला! व मराठी इतिहासांत आपलीं नांवें अजरामर करून ठेविलीं. तीं नांवें पुढीलप्रमाणें:— सेनापति भास्करपंडित कोल्हटकर, अलीकरवाल, यशवंतराव गुजर, निळकंठराव मोहिते, दादाजी भोंसले, बापूजी महाडिक, शहा महमदखा, मानाजी भोंसले, नारायण भोंसले, संभाजी भोंसले, कृष्णराव निंबाळकर, बापूजी कदम, श्रीपतराव मेहकर, व्यंकटराव भाऊ, दाजीबा पाटणकर, यशवंतराव शिर्के, गोविंदराव शेलकर, सटवाजी जाधव, शिवाजी जामदार, सुभानजीराव, नानाबक्षी, जोतिबा कारभारी!! शूर, मर्द मराठ्यांनो, शाबास तुमची, मराठ्यांचें नांव तुम्हीं राखलें!

मुस्ताफाखाच्या व जानकीरामाच्या गोड भाषणास व नजरनजराण्यास भास्करपंत भुलला असेल असें कांहीं म्हणतील परंतु भास्करपंतानें भेटींत "धोका नाहीं" याची खात्री करून घेतल्याशिवाय भेटीचा बेत नक्की केला नाहीं खास. नबाबाकडे पाठविलेल्या अत्यंत विश्वासाच्या अलीकरवालनेंही संशय घेण्याचें कारण नाहीं अशी खात्री दिल्यावरच बेत कायम केला. पाठविलेला सरदार मुसलमान होता व नबाबही मुसलमान, तेव्हां नबाबानें त्याला फितविला असेल अशी शंकाही घेण्याचें कारण नाहीं. अलीकरवाल हा सात हजारी सरदार भास्करपंताचा अत्यंत विश्वासू मनुष्य होता, व त्याचा पुरावा एकच कीं, तोही भास्करपंताबरोबर होता व तोही पंताबरोबर रणकंदनांत धारातीर्थी पडला! शिवाय शेरेमुताखरीनमधील हकीगतीवरून हें स्पष्टच आहे कीं, येवढा मोठा गुप्त कट फक्त तीन माणसांपेक्षां शेवटच्या क्षणापर्यंत कोणासही माहीत नव्हता. नबाबाच्या बाजूसही हा कट कोणास माहीत नव्हता. तर तो भास्करपंताकडील मराठा काय किंवा मुसलमान काय कोणासही कसा माहीत असणार?

---

१ भास्करपंत व त्याचे २१ सरदार यांचे खून वैशाख शुद्ध २ शके १६६६ रोजीं झाले.

नबाबाच्या शौर्याचें प्रदर्शन

त्या तंबूंत एका क्षणांत जो भीषण प्रकार घडला तो पाहून हजारों प्रेक्षक व निमंत्रित लोक तेथून पळून गेले ! नबाब तंबूच्या आंतील सिंहासनावरून २५।३० हातांवर घडत असलेला भीषण प्रकार निरखून पहात उभा होता. पंत व बरोबरचे सर्व मराठे सरदार वगैरे ठार झाल्यावर मुस्ताफाखानानें आपली फौज आणून मराठ्यांच्या कटव्याच्या छावणीकडे कूच केलें व त्यानें नबाबासही त्याच्या मदतीस जाण्याची विनंति केली. नबाबही लष्करी पोशाखांत सज्ज होता. नबाबाचा हत्ती त्याच्याजवळच होता व त्यास त्यावर बसावयाचें होतें, परंतु तो एकंदर भीषण प्रकार पहाण्यामुळें नबाबाचें मन व शरीर अस्थिर व चंचल राहिल्यामुळें त्याच्या एका पायांतील जोडा कोठें पडला व तो सांपडेना म्हणून तो आगेंमागें पहात तेथेंच घुटमळत होता. तेव्हां कोणीं एकानें हलक्या आवाजांत प्रश्न विचारला कीं, असल्या आणीबाणीच्या वेळीं जोडा शोधण्यांत वेळ कसला घालवावयाचा ? नबाबानें उत्तर दिलें " जोडा न सांपडणें व तो न घेतां निघणें म्हणजे तो अपशकून आहे व जोडा सोडून गेलों तर लोक मला भित्रा व पळपुटा म्हणतील, म्हणून जोडा शोधतों आहें." सुदैवानें जोडा सांपडला तरीही तो मुस्ताफाखानाच्या मदतीस निघेना व तेथेंच घुटमळत राहिला. कारण इतकी गडबड होऊन सर्व मराठे मारले गेले तरी भास्करपंत खुद्द मारला गेला किंवा नाहीं व त्याचा प्राण गेला किंवा नाहीं याची खात्री पटेना. तेव्हां त्यानें पंताचें शीर आणून दाखविण्यास सांगितलें. तेंही त्याच्यापुढें आणून ठेवलें तरीसुद्धां त्याचा विश्वास बसेना. कारण हें शीर भास्करपंताचेंच कशावरून ही शंका घेऊन तो तेथून हलेना. जेव्हां बऱ्याच जणांनीं हें शिर भास्करपंताचेंच आहे अशी बालंबाल खात्री दिली तेव्हां मग त्या शूर नबाबाची स्वारी हत्तीवर आरूढ झाली व मराठ्यांच्या तळाकडे निघाली !

राघोबा गायकवाडची कामगिरी

भास्करपंत व त्याचे सरदार मारले गेले, परंतु राघोबा गायकवाड नांवाचा एक मराठा सरदार पंताबरोबर न जातां मागें राहिला होता. कांहींचें म्हणणें असें आहे कीं, पंतानें नबाबाच्या भेटीस जाऊं नये असें याचें म्हणणें होतें व म्हणून तो पंताबरोबर गेला नाहीं. कदाचित् पंतानें स्वतःच यास मागें ठेवला नसेल कशावरून ? कांहींही असो, तंबूंत गडबड झाल्याची व पंत व इतर सरदार मारले गेल्याची बातमी अर्थात् या राघोबास प्रथम मिळाली. तो ताबडतोब छावणींत आला व त्यानेंच ही भयंकर बातमी तेथें सर्वांना दिली व म्हणून छावणींतील बरेंच किंमती सामान व मनुष्यहानि वांचली ! मुस्ताफा व नबाब येऊन पहातात तों छावणींतील किंमती सामान व बहुतेक लोक निघून गेलेले, व जें सामानसुमान राहिलें

तें सर्व मोडतोड झालेलें दिसलें. उरलेल्या फौजेस घेऊन राघोबा गायकवाड परत जात असतां वाटेंत त्यास नबाबाच्या लोकांनीं पुष्कळ त्रास दिला परंतु त्यांतूनही मार्ग काढून सैन्यासह तो नागपुरास पोंचला ! शेरे मुताखरीनच्या लेखकानेंही या राघोबा गायकवाडाच्या प्रसंगावधानाची तारीफ केली आहे. भास्करपंताची बायकोही या प्रसंगीं छावणींत असून त्यांत ती गरोदर होती. तिच्या विश्वासू लोकांनीं (यांत मुसलमानही होते) तिला ताबडतोब आडवाटेनें गयेवरून काशीस सुखरूप नेली. ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. तो काशीस जन्मला म्हणून त्याचें नांव काशीराव ठेवलें.

नबाबास फलप्राप्ति ?

अशा तऱ्हेनें दोन वर्षें निरनिराळ्या कल्पना व अचाट योजना योजून, त्या पुऱ्या करूनही जी गोष्ट नबाबास साध्य झाली नाहीं ती विश्वासघातानें त्यानें एका दिवसांत पार पाडली. भास्करपंताचा व त्याच्या २१ सरदारांचा निःपात केला ! हिंदुस्थानच्या इतिहासांत तरी या दुष्कृत्यास जोड नाहीं ! परंतु मराठ्यांचा मित्र व नबाबाचा कट्टा शत्रु तो मीर हबीब या वेळीं कोठें होता कोण जाणे ?

नबाबास आतां तरी मनःशांति व शारीरस्वास्थ्य लाभलें काय ? मुळींच नाहीं. आधींच शेफारलेला मुस्ताफाखा वरील शतकृत्य पार पाडल्यामुळें अधिकच उन्मत्त झाला. नबाबाचा मोठा भाऊ व नबाबाचे पुतणे व जांवई जे सुभेदाऱ्यांच्या जागांवर होते त्यांचाही तो पाणउतारा व अपमान करी. बारा हजार सैन्य त्याच्या हातीं होतें. मर्जीस येईल तर तो दरबारीं जाई अगर न जाई. नबाबासही जुमानीना. पाटण्याची सुभेदारी देण्याचें वचन पुरें करण्याची मागणी अखेर त्यानें नबाबाकडे केली. हें वचन म्हणजे काम करून घेण्यापुरतें मायावी होतें, असें याही वेळीं, मागील कित्येक वेळांप्रमाणें, अनुभवास आलें व त्यानें नबाबाविरुद्ध उघड उघड बंड पुकारलें ! त्याच्या सैन्याची थकलेली बाकी १७ लक्ष रुपये त्यानें रोख मागणी करून जबरदस्तीनें वसूलही केली. तेथील छावणी जाळून तोफखाना व दारूगोळा घेऊन तो पाटण्यावर चाल करून गेला, परंतु तो लढाईंत मारला गेला. तेव्हां त्याचे सरदार पाटण्याचा सुभेदार झेनुद्दीन अहमद याच्या सैन्यांत शिरले व सुभेदारास नजराणा देण्यास गेले. तेव्हां या अफगाण कडव्या सरदारांनीं विश्वासघातानें सुभेदारास ठार मारून त्याचीं बायकामुलें पकडून रयतेवर अत्यंत अत्याचार केले.

नबाबाचा मोठा भाऊ हाजी अहमद यास पकडून पाटणा शहरांत भरचौरस्त्यांत एका तिकाटण्याला खालीं डोकें वर पाय असा उलटा टांगून त्यास खाली जाळला ! अशी एक का दोन संकटपरंपरा नबाबानें आपल्या कृत्यानेंच आपणावर ओढून घेतली होती. बरें भास्करपंतास मारून व त्याच्या २१ सरदारांना

मारूनतरी मराठ्यांच्या चौथाईचा मागें लागलेला ससेमिरा सुटला का ? मुळींच नाहीं. उलट रघूजी भोसल्यानें आतां नुसत्या चौथाईकरतांच नव्हे, तर वरील नबाबाच्या नीच कृत्याचा सूड घेण्याच्या इराद्यानें पूर्वींपेक्षांही जास्त सैन्य घेऊन बंगालवर स्वाऱ्या केल्या व नबाबास त्यानें " दे माय धरणी ठाय " करून सोडलें. व शेवटीं सन १७५१ मध्यें नबाबाकडून नुसती चौथाईच घेऊन तो थांबला नाहीं तर " मुंडकटाई " नांवाचा आणखी एक कर वसूल करीत सबंध ओढिसा प्रांतच मराठी अमलाखालीं देण्यास त्यानें नबाबास भाग पाडलें !

८ रघूजी ओढिसा व दक्षिण बंगाल घेतो+

रघूजी चवताळला

नबाब अलीवर्दीखानानें सेनापति मुस्ताफाखान व दिवाण जानकीराम यांच्या मदतीनें रघूजी भोंसल्याचा सेनापती भास्करपंत याचा व त्याच्या २१ सरदारांचा विश्वासघातानें अमानुषपणें खून केला खरा (ता. ३१ मार्च सन १७४४) पण त्याच्या हें लक्षांत आलें नाहीं कीं, हे खून करून आपण एका मोठ्या मराठा भुजंगास डिवचलें आहे व आज नाहीं उद्यां, एक वर्षानें, दोन वर्षांनीं, दहा वर्षांनीं, हा आपला सडकून चावा घेतल्याशिवाय सोडणार नाहीं !

मुसलमानी इतिहासकारांनीं अलीवर्दीखानाच्या शौर्याचे व चांगुलपणाचे कितीही गोडवे गायिले असले तरी सरफराजखानास मारून नबाबी पटकविण्यापासून तों अखेरीपर्यंत त्याची सर्व कारकीर्द खून, विश्वासघात, वचनभंग यांनीं भरलेली आहे व ते सर्व पचूनही गेले होते, असें तत्कालीन बंगाल व ओढिसाचा इतिहास वाचल्यास समजून येईल. परंतु भास्करपंताचा व त्याच्या २१ सरदारांचे खून हे पचणारे नव्हते. लढाई चालू असतां, लढतां लढतां भास्करपंत अगर सरदार धारातीर्थी पडले असते, तर रघूजीस तितकेंसें वाईट वाटलें नसतें, परंतु राघोबा गायकवाड उरलेल्या सैन्यासह नागपुरास आल्यावर, अलीवर्दीनें विश्वासघातानें सर्वांना कसें मारलें, ही सर्व हकीगत रघूजीस कळल्यावर तो अगदीं चवताळून गेला, व अलीवर्दीखानाचा सूड घेण्याचा त्यानें निश्चय केला. अशा तऱ्हेनें नबाबानें रघूजीसारखा जबरदस्त शत्रु निर्माण केला. मीर हबीब हा त्याचा एक कट्टा शत्रु बंगालमध्यें होताच व तोही रघूजीस मिळाला होता. या दोन शत्रूंच्या जोडीस आणखी एक तिसरा शत्रु नबाबानें स्वतः, केलेल्या विश्वासघातानें, निर्माण केला ! ज्या

+ टीप- संशोधक वर्ष १० अंक १

मुस्ताफाखानाच्या मदतीनें भास्करपंतास ठार मारण्याचें शतकृत्य नबाबानें पार पाडलें, त्या मुस्ताफाखानास हें काम बिनबोभाट निर्विघ्नपणें पार पडलें म्हणजे पाटण्याची सुभेदारी देण्याचें वचन नबाबानें दिलें होतें! परंतु विश्वासघात व वचनभंग करूनच आपलीं महत्त्वाचीं कामें पार पाडण्याच्या सरावामुळें "कामापुरता मामा" अगर "गरज सरो व वैद्य मरो" या म्हणींतील तत्त्वांप्रमाणें काम संपल्यावर नबाबानें आपलें वचन पाळलें नाहीं व पाटण्याची देऊं केलेली सुभेदारी सेनापती मुस्ताफाखानास मिळाली नाहीं! अशा तऱ्हेचे एक नव्हे, दोन नव्हे, कित्येक विश्वासघात व वचनभंग मुस्ताफाखानाच्या ध्यानांत असल्यानें वैतागून त्यानें शेवटीं उघड उघड बंड उभारलें! व म्हणून नबाबाचा हा "कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ" होऊन त्यास तिसरा शत्रु निर्माण झाला व त्यानेंही पण रघूजीचीच मदत मागितली!

मुस्ताफाखान हा अलीवर्दीचा सर सेनापति होता व तो अलीवर्दीच्या मर्जीतला होता. मुस्ताफाखान हा अफगाण जातीचा असल्यानें त्यानें त्याच्या चालत्या काळांत आपले पुष्कळ नातेवाईक, सगेसोयरे व अफगाण लोक अलीवर्दीच्या सैन्यांत भरती केले होते. हे लोक जात्या धाडसी व शूर असत. मुस्ताफाखानानें बंड उभारल्याबरोबर यांपैकीं पुष्कळ लोक त्यास मिळाले. त्यांत मुस्ताफाखानाचा पुतण्या अबदुल रसूलखान हा कटक येथील सुभा होता, तोही आपल्या सैन्यासह बंडांत मिळाला. दिवाण जानकीराम याचा मुलगा दुर्लभराम हा कटक येथें वरील अबदुल रसूलचा दिवाण होता. त्यासच अलीवर्दीनें कटकचा राज्यकारभार चालविण्यास हुकूम दिला. सुभेदाराचें शिक्कामोर्तबही त्याजवळ दिलें, परंतु राज्यकारभारांत या दुर्लभरामाचें मुळींच लक्ष नसे. तो आपला सर्व काळ गोसावी, बैरागी, संन्याशांच्या सहवासांत घालवी. शेरे मुताखरीनचा लेखक म्हणतो कीं, हे गोसावीबैरागी नागपूरच्या रघूजीचे हेर होते! त्यांनीं या दुर्लभरामावर चांगलेंच वर्चस्व बसविलें होतें. दुर्लभरामाच्या राज्यांतील व्यवस्थेची (का अव्यवस्थेची?) बित्तंबातमी या लोकांतर्फे रघूजीस लागे. याच सुमारास वर लिहिल्याप्रमाणें बंड उभारल्याबरोबर मुस्ताफाखानानें रघूजीस मदतीस येण्याचीं निकडीचीं पत्रें पाठविलीं. रघूजी भास्करपंताच्या खुनाचा सूड उगविण्याच्या तयारींत होता. युद्धनीतींतील "शत्रूच्या शत्रूंना आपले मित्र" बनविण्याच्या तत्त्वाप्रमाणें अलीवर्दीचा हा जबरदस्त शत्रु रघूजीचा मित्र झाला. रघूजीचा एक हस्तक व मित्र मीर हबीब हा बंगालमध्यें होताच व वरील पत्रामुळें रघूजीस बंगालमध्यें दोन मित्र झाले! (सन १७४५ फेब्रुआरी).

रघूजी कटकचा बाराबटी किल्ला सर करतो

बरोबर १४ हजार फौज घेऊन रघूजी स्वतः कटकबाजूस आला (मार्च

सन १७४५). दुर्लभरामास त्याची दादही नव्हती ! अबदुल अजीज नांवाचा एक फौजदार तेथें होता. रघूजी आल्याची बातमी त्यास आल्याबरोबर तो कांहीं लोक घेऊन दुर्लभरामाच्या वाड्याशीं जाऊन त्यास उठविण्याचा त्यानें प्रयत्न केला. मराठ्यांच्या हल्ल्यामुळें शहरांत सर्वत्र पळापळ सुरू होती. दुर्लभराम अर्ध नग्नावस्थेंत बाहेर येऊन, तोही पळून जाण्याच्या विचारांत होता ! परंतु अबदुल अजीजनें त्यास धीर देऊन किल्ल्यांत नेलें. तेथें अधिकारी वर्गापैकीं जे २१४ लोक होते त्यांचीं मतें घेतलीं. अबदुल अजीजसारखे किल्ला लढविण्याच्या विचाराचे कोणी नव्हते. तेव्हां तहाचें बोलणें करण्यास दुर्लभरामानें कोणाएकास रघूजीकडे पाठविलें. रघूजीनें दुर्लभरामासच बोलाविलें. दुर्लभरामाचा योग्य तो बंदोबस्त ठेवून बोलणीं चालू झालीं. रघूजीनें त्यास मेजवानी दिली व तेथेंच ठेवून घेऊन त्याची निजण्याचीही व्यवस्था केली. दुर्लभराम उठून पहातो तों, तो व त्याचे लोक रघूजीचे कैदी असल्याचें त्यास आढळून आलें ! परंतु मीर अबदुल अजीज शरण न जातां त्यानें किल्ला लढविण्यास सुरवात केली. प्राणहानि व किल्ल्याची नासधूस वांचविण्याच्या इरायानें रघूजीनें अबदुल अजीजचा भाऊ दुर्लभरामाबरोबर अटकेंत होता त्यासच त्याच्या भावाची समजूत करून किल्ला खालीं करून देण्यास निरोप देऊन पाठविलें. अजीजनें जबाब पाठविला कीं " माझा मालक नबाब अलीवर्दीखान आहे व त्याचाच हुकूम मी मानतों. दुसऱ्या कोणासच मी जाणीत नाहीं." या बोलाचालींत व वाटाघाटींत व किल्ला लढविण्याच्या कामांत जवळ जवळ एक महिना गेला. अबदुल अजीजला सुरक्षित किल्ल्याबाहेर येऊं देऊन मुर्शिदाबादेस जाण्यास त्यास मुभा असावी, असें ठरून अबदुल अजीजनें कटकचा प्रसिद्ध बाराबटी किल्ला खालीं करून तो रघूजीच्या छावणींत आला. कांहीं दिवस रघूजीच्या छावणींत पाहुणचार घेत राहून तो मुर्शिदाबादेस गेला. तेथें नबाबानें त्याचा गौरव केला.

दुर्लभरामासच कैद कां ?

शंका अशी येईल कीं, जो अबदुल अजीज हटवादीपणानें थोड्या लोकांनिशीं येवढ्या मोठ्या मराठी सैन्याबरोबर टक्कर देऊन किल्ला लढविण्यास तयार होता, त्यास मुर्शिदाबादेस जाऊं देऊन जो दुर्लभराम पहिल्या दिवशींच किल्ला खालीं करून शरण येण्यास कबूल होता, त्यासच रघूजीनें अटकेंत ठेवण्याचें कारण काय ? शेरे मुताखरीनच्या लेखकानें दुर्लभरामास विश्वासघात करून पकडून ठेवलें असें लिहिलें आहे. किल्ल्यांत शिबंदी अगदींच थोडी असल्यानें रघूजी तो किल्ला एका दिवसांतही घेऊं शकला असता. भास्करपंत जबरदस्त होता म्हणून अलीवर्दीनें जसा विश्वासघात करून पंतास मारलें, तशा प्रकारचा दुर्लभराम जबरदस्त नव्हता, इतकेंच नव्हे, तर तो अगदींच भेदरट

होता. तेव्हां रघूजीनें विश्वासघात करून त्यास पकडण्याचें कारण नव्हतें. वास्तविक रघूजीनें त्यास धाक दाखवूनच बोलावून आणिला असावा. कारण त्यास पकडण्यांत भास्करपंताच्या सुडाचा भाग होता. ज्या जानकीरामानें भास्करपंतासमोर पवित्र गंगोदक हातांत घेऊन, आणाशपथा घेऊन, त्यास अलीवर्दीच्या तंबूंत नेऊन, सर्व सरदारांसह विश्वासघात करून ठार केलें त्या जानकीरामाचे हे राजश्री दुर्लभराम चिरंजीव होते, व याच सुडाच्या बुद्धीनें किल्ला खालीं करून देणाऱ्या दुर्लभरामास पकडून रघूजीनें त्या शूर अबदुल अजीजला आपल्या छावणींत ठेवून घेऊन, त्याचा गौरव करून, त्यास सुखरूप मुर्शिदाबादेस जाऊं दिलें असलें पाहिजे.

सुडाची चुणूक – दुर्लभरामाबद्दल ३ लक्ष रुपये !

अलीवर्दीनें विश्वासघातानें जसें भास्करपंतास ठार मारलें, तसें रघूजीही विश्वासघात न करतांही स्वतःच्या जोरावर व सूडबुद्धीनें दुर्लभरामास ठार मारूं शकला असता, परंतु त्यानें तसें केलें नाहीं, हा रघूजीचा मोठेपणाच समजला पाहिजे. सूड उगवण्याचा दुसराही मार्ग म्हणजे अटकेंत ठेवून त्याचा छळ करणें, तोही त्यास करतां आला असता, परंतु तसें कांहीं न करितां त्यानें जानकीरामास स्वतः केलेल्या विश्वासघाताची व दुष्कृत्याची आठवण राहावी या उद्देशानें कमींत कमी तीन लाख रुपये दिल्याशिवाय दुर्लभरामास न सोडण्याची अट घातली. दुर्लभरामास सोडण्याकरितां मोठमोठ्यांकडून विनवण्या, रदबदल्या, मध्यस्थ्या झाल्या, परंतु तीन लाख रुपये वसूल होईपर्यंत–दोन वर्षेपर्यंत–त्यास रघूजीनें सोडलें नाहीं. सरशेवटीं ही येवढी मोठी रकम नबाब अलीवर्दीखानानें जानकीरामास दिली व ती प्रत्यक्ष रघूजीकडे आल्यावरच दुर्लभरामाचें पुत्रमुखदर्शन जानकीरामास झालें (जानेवारी सन १७४७) !

भास्करपंताबद्दल नबाबाकडे ३ कोटींची मागणी । !

कटक हस्तगत झाल्यावर रघूजी हिजलीमिदनापूरवरून, वीरभूम मार्गे, बरद्वान वाटेवर जाऊन, छावणी करून राहिला (जून १७४५). अलीवर्दीखान नुकताच पाटण्याकडून राजधानीकडे आला होता. त्यानें मुनाम अल्ली नांवाचा एक हुशार मनुष्य दिल्लीकडून आला होता, त्यास रघूजीकडे बोलणें करण्यास पाठविलें. मुस्ताफाखानाच्या बंडामुळें नबाब कमजोर झाला आहे व म्हणून अलीवर्दीकडून हा मनुष्य प्रथम बोलणें करण्यास आला, असें समजून रघूजीनें नबाबाकडून ३ कोटि रुपयांची मागणी केली असें वाटण्याचा संभव आहे, परंतु या कमजोरीपेक्षां मुख्यतः भास्करपंताच्या व इतर सरदारांच्या वधाचा मोबदला म्हणून ही खंडणीची मागणी होती !

खरोखरीच नबाब या वेळीं मोठ्या अडचणींत होता व त्यास रघूजीशीं लढाई देण्यास तयारी करण्यास वेळ पाहिजे होता. बोलाचालींतच त्यानें कांहीं


दिवस काढले, इतक्यांत झैनुद्दीन अहमद व मुस्ताफाखान यांच्या जगदीशपूरच्या लढाईत मुस्ताफाखान मारला गेल्याचें वर्तमान समजल्याबरोबर नबाबास जोर येऊन त्यानें नरमाईचें बोलणें आतां सोडून चढाईचें बोलणें चालू केलें. त्यानें रघूजीस कळविलें कीं " पैसे भरून जो मनुष्य तह करतो तो अडचणींततरी असतो " किंवा " आंवळा देऊन कोहळा काढण्याचा " तरी त्यांत कावा असतो. " माझे सैनिक तुझाही बळी घेण्यास उत्सुक आहेत. तुझ्या सारख्या क्षुद्र मनुष्याशीं तह करण्याची जरूर काय ? माझे बंगाली सिंह भुकेनें चवताळले आहेत व वऱ्हाडच्या मगरास बाहेर ओढून त्याचें रक्त प्याल्याशिवाय ते राहणार नाहींत व मगच तहाच्या अटी ठरतील. " रघूजीनें उत्तर पाठविलें कीं, " मी माझ्या देशांतून १००० कोस लांब येऊन सिंहराजाच्या राज्यांतच छावणी करून रहात आहें परंतु सिंहराज आपल्या गुहेच्या बाहेर ५।२५ कोसही कां हलले नाहींत ? " नबाबानें फिरून उत्तर पाठविलें कीं, तूं आतांच १००० कोस वाट चालून दमून भागून आला आहेस, तुला या पावसाळ्यांत चार महिने विश्रांति दिली म्हणजे मी पावसाळा संपल्याबरोबर तुला हकलून लावीन तेव्हां फिरून १००० कोस पळून जाण्यास तुला ताकत राहावी म्हणून सध्यां मी स्वस्थ आहें. " असल्या प्रकारच्या बोलाचाली चालू असतां रघूजीनें आपला अम्मल बरद्वान, मिदनापूर येथें सुरू केला (जुलई १७४५).

रघूजीची अफगाणांस मदत

मुस्ताफाखान लढाईत मेल्यामुळें त्याच्या अफगाण लोकांची वाताहात झाली, कांहीं दर्भंग्याकडे गेले, कांहीं बिहारच्या जंगलांत दडून बसले, कांहीं मीर हबीबला मिळाले, अशाचपैकीं मूर्तजाखान व बुलंदखान हे दोघे सरदार आपल्या लोकांसह बिहारच्या जंगलांत व डोंगरांत होते. या सरदारांना रघुजीस मिळण्याचें होतें परंतु पाटणासुभेदारानें त्यांना बाहेर न येऊं देतां तेथेंच त्यांचा निकाल करण्याचा बेत केला होता. या लोकांनीं रघूजीस वरचेवर लिहिलें कीं, " आम्ही तुम्हांस मिळण्यास उत्सुक आहोंत परंतु आम्ही तेथपर्यंत येऊं शकत नाहीं. तेव्हां आमच्या मदतीस येऊन आम्हांस सोडवा म्हणजे मरेपर्यंत आम्ही आपणास सोडणार नाहीं. " या कडव्या अफगाणांची मदत मिळाली तर आपलें काम हलकें होईल, म्हणून रघूजी वीरभूम मधून बिहारमध्यें शिरला व खडकपूरच्या दरींतून (हें बंगालमधील खडकपूर नव्हे, हें बिहारमध्यें आहे) वाट काढीत शोण नद उतरून ससाराम (सरसाराम) च्या जंगली व डोंगराळ मुलखांत शिरून त्यानें अफगाणांना सोडवून आणिलें. यावेळीं त्याचें व अफगाणांचें मिळून २० हजार सैन्य जमलें. दुसऱ्या बाजूकडून अलीवर्दीखानही मुर्शिदाबाद वरून पाटण्यास १२ हजार फौज घेऊन आला. पाटण्याचा सुभेदार झैनुद्दीन अहमद हा (नबाबाचा पुतण्या व जांवई होता) नबाबास आणण्यास बराच

सामोरा गेला. नबाबानें कांहीं दिवस मुलगी, जांवई, नातू व नातेवाईक यांच्या सहवासांत काढले.

नबाब आपले पुतणे आताउल्लाखान व शिराजउद्दौला यांस घेऊन बांकीपुराहून (पाटण्याहून) नौबतपुरास आला. वाटेंत एकही मराठा दिसला नाहीं. तो तसाच निर्वेधपणें पुढें गेला. मराठ्यांनीं एकाएकीं त्याच्या सामानांच्या गाड्यांवर हल्ला करून ते लूट घेऊन पळूनही गेल्याचें समजलें ! दुसऱ्या दिवशीं जास्त बंदोबस्तानें व लढाईच्या तयारीनें सैन्याची मांडणी केली. तोफखानाही सज्ज ठेवला. या वेळीं त्याच्या जवळ उत्तम उत्तम नांवाजलेले सरदार होते. अघाडीस मिरझाफरखान व समशेरखान होते. उजव्या बाजूस आताउल्लाखान व सरदारखान होते. डाव्या बाजूस झैनुद्दीन अहमद होता. त्याच्याजवळ शहाजहानयार, ओमरखान होते. नबाबाच्या निशाणाच्या हत्तीवर रहीमखान होता. नबाब मध्यभागीं असून त्याच्या संरक्षणास फकीर उल्ला बेग व नूरउल्ला बेग खान व दुसरेही सरदार आपापल्या सैन्यासह होते. मराठ्यांचा हल्ला रात्रीं अपरात्रींही येईल या भीतीनें लढाईच्या तयारीनेंच नबाब सबंध रात्र वाट चालत होता, परंतु रात्रीं मराठे दिसले नाहींत. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मराठे कांहीं गांवांतून लूट करीत असल्याचें दिसलें. नबाबानें मुहिलीपूर (मुहिब अलीपूर) जवळ मुक्काम केला. रघूजीचा मुक्कामही जवळपासच होता (आक्टोबर सन १७४५).



मुहिलीपूरची लढाई (मुहिब अलीपूर)

नबाब येवढ्या फौजेनिशीं इतक्या जवळ आला असेल अशी रघूजीस कल्पनाही नव्हती. मिरजाफरखान व समशेरखान हे दोघे मोंगली सैन्याच्या अघाडीवर होते. त्या दोघांनीं एकाएकीं रघूजीवर हल्ला चढविला. एकाएकीं हल्ला आला पण रघूजी घाबरला नाहीं. ताबडतोब तो घोड्यावर स्वार झाला व त्याचे संरक्षक त्याच्याभोंवतीं जमा झाले व एकंदर सैन्यही ताबडतोब स्वार होऊन त्यांनीं अनपेक्षित आलेला हल्ला परतवून उलट हल्ला चढविला. त्या वेळीं तुंबळ युद्ध झालें. मोंगली सैन्यांत कंडी पिकली कीं, " रघूजी पकडला गेला ! " दुसरी बातमी पसरली " समशेरखानानें विश्वासघात करून रघूजीस सोडून दिलें ! " मिरजाफरखान व समशेरखान अघाडीवर लढत होते व लढाई जुंपली हें पाहिल्याबरोबर त्यांच्या मदतीस स्वतः अलीवर्दीखानही धांवून आला. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं रघूजीसारखा मोहरा समशेरखान काय किंवा मिरजाफरखान काय, रघूजीस संरक्षकांचा संहार झाला असता तरच कोणाच्या हातीं तो सांपडणें शक्य होतें. कदाचित् तो सांपडला असें धरून चाललें व तो रघूजीच होता असें ठरतें, तर ज्याच्या हातीं तो लागता त्यानें नबाबाकडून मिळणाऱ्या शाबासक्या, पदव्या व बक्षिसें यापुढें त्यास सोडलेंच नसतें. जिंजी-तंजावरपासून पाटणा-बंगालापर्यंत कित्येक लहान मोठ्या लढाया प्रत्यक्ष खेळलेला तो मर्द मराठा महावीर रघूजी भोंसला सहजासहजीं शत्रूच्या सैनिकांच्या हातीं सांपडण्यासारखा लेचापेचा अगर गाफील होता अशी कदाचित्-रघूजीची प्रत्यक्ष माहिती नसल्यामुळें-शेरे मुताखरीनच्या लेखकाची कल्पना झाली असावी !

आघाडीवर वरीलप्रमाणें लढाईची रंगत चालू असतां मराठ्यांच्या मुख्य सैन्यानें अलीवर्दीखानाच्या दुसऱ्या बाजूवर जोराचा हल्ला केला. या बाजूस अबदुल अलीखान, सयद गुलाम हुसेन खान (हाच मनुष्य शेरे मुताखरीनचा लेखक होय) हे मराठ्यांशीं लढत होते. यांची बाजू लंगडी पडली, तेव्हां मेंदी निसारखान हा सयद अहंमदचा निशाणाचा हत्ती घेऊन या लोकांना मदत व धीर देण्यास सरसावून आला. या ठिकाणीं रात्र पडेपर्यंत पुष्कळ लांडगेतोड झाली असें लेखकानें लिहिलें आहे परंतु रात्र पडून दिसेनासें झाल्यामुळें आपोआपच लढाई बंद पडली.

नबाबाचा हलगर्जीपणा – सैन्यास ती रात्र कशी गेली ?

रघूजीनें स्वरक्षणाच्या व माऱ्याच्या दृष्टीनें रात्रीच्या मुक्कामाची जागा आधींच हेरून ठेवल्यानें संध्याकाळ झाल्याबरोबर ताबडतोब त्या जागेच्या आश्रयास जाऊन मुक्काम करण्याचा हुकूम मराठी सैन्यास दिला, परंतु नबाबानें रात्रीच्या मुक्कामाची जागा हेरून न ठेवल्यामुळें ज्या ठिकाणीं रात्र झाली, त्याच ठिकाणीं

मुक्काम करण्याचा हुकूम दिला ! फक्त नबाबापुरता एक तंबू सांपडला. सैन्यामागून आलेले व येत असलेले, धान्य व इतर सामानांचे गाडे व बैल हे होते कोठें व गेले कोठें याचा पत्ताच लागेना ! गेली सबंध रात्र हें सैन्य सारखें वाट चालत होतें व या सबंध दिवसभर निकराची लढाई चालू होती, त्यामुळें सर्व सैनिक दमून थकून गेलेले होते. अशा स्थितींत वरील कारणानें खाण्यासही कांहीं नाहीं व मुख्यतः पिण्यास पाणी नाहीं अशा भयंकर आपत्तींत नबाबाचें सर्व सैन्य हवालदील होऊन गेलें. मोठमोठे सरदारही अन्नपाण्याविणें उघड्या जागीं तडफडत राहिले. नबाबाचे दोघे पुतणे व जांवई यांनासुद्धां ती सबंध रात्र झाडाखालीं खाण्यापिण्यावांचून मोठ्या कष्टांत काढावी लागली !

खाण्यापिण्याच्या सामानाचा कांहींच पत्ता लागेना. रात्रीच्या काळोखांतही मराठे आसपास टेहळत असल्यानें, स्वतःची जागा सोडून सामान कोठें आहे तें धुंडाळण्यास जाण्याची एकाचीही छाती होईना. सर्व सैन्य नुसत्या चणेफुटाण्याच्या कोरड्या गप्पा कोरड पडलेल्या तोंडानें मारीत होतें. हें सर्व सामान मराठ्यांच्या हातीं लागल्यास उद्यांतरी मूठभर चणे तोंडांत टाकण्यास मिळतील किंवा नाहीं याची फिकीर करीत रात्र कंठत असतां झोंप न आल्यानें उलट सुलट बातम्या व कंड्यांचा नुसता सुकाळ झाला होता, त्यामुळें सैन्यांत सर्वत्र गोंधळ माजला होता. अबदुल अली खान, सय्यद गुलाम हुसेन खान, अल्लायार खान व इतर सरदार अशा त्या अंधाऱ्या रात्रीं कदाचित् मराठ्यांचा हल्ला येईल या भीतीनें श्रमातिरेकानें व भुकेनें व्याकूळ होऊन त्यांचे प्राण डोळ्यांत आले होते तरी नबाबाच्या तंबूच्या संरक्षणास डोळ्यांत तेल घालून ते सज्ज उभे होते ! दुसऱ्या दिवशीं सकाळच्या वेळीं धान्य व इतर सामान लढतां लढतां एका जागीं राहून गेलेलें आढळलें, पण पाणी सांपडलेंच नाहीं, तेव्हां नुसतें थोडथोडें न्याहरी वजा खाऊन सर्व सैन्य पुढें निघालें !

मराठ्यांचा गनिमी कावा – नबाब रंजीस आला

अशा प्रकारें दिवसामागून दिवस लढाई करावयाची व रात्रींमागून रात्र उघड्या मैदानावर कोठेंतरी मुक्काम करून काढावयाची, रोज हल्ले, प्रतिहल्ले व्हावयाचे व मराठ्यांनीं थोडें मागें हटावयाचें ! या कार्यक्रमास नबाब कंटाळून अगदीं रंजीस आला. शेरे मुताखरीनच्या लेखकानें वरच्या वर लिहिलें आहे कीं, मराठे नेहमीं मागें हटावयाचे व त्यांचें नुकसान व्हावयाचें ! व असें त्यानें जरी कित्येक जागीं लिहिलें असलें तरी नबाब या लढाईस कंटाळून रंजीस आला होता हेंही त्यानेंच लिहिलें आहे. यावरून नबाबानें मराठ्यांचा पराजय कांहीं केला नाहीं हेंच सत्य बाहेर निघतें. शत्रूस दमवून त्यास हैराण करून सोडण्याची ती मराठ्यांची लढण्याची, विशिष्ट प्रकारची, गनिमी काव्याची पद्धत होती. सरशेवटीं कंटाळून

जाऊन नबाबानें लढाईचें काम सर्वस्वीं अधिकाऱ्यांवर सोंपविलें. त्यांनाही तोच अनुभव आला. पुढें असें कळून आलें कीं, मिरजाफरखान व समशेरखान हे दोघे सरदार लढाईचा मोठा आव आणून खोटी लढाई करतात. थोडक्याच दिवसांत नबाबासतर स्पष्टच कळून आलें कीं, मिरजाफरखान व समशेरखान हे मराठ्यांना फितूर झाले आहेत ! स्वतःच्या हातून एखादें काम सफल झालें नाहीं म्हणजे हाताखालच्या अप्रिय मनुष्यावर दोष देऊन मोकळें होण्याची ही एक नीति आहे.

नबाब बेगमेचा रघूजीकडे तहाचा प्रयत्न !

शेरे मुताखरीनचा लेखक सयद गुलाम हुसेनखान याचा शिरकाव नबाबाच्या घरीं नबाबाच्या बेगमेपर्यंत असे, इतका या दोन्ही घराण्यांचा घरोबा होता. सय्यद गुलाम हुसेन खान ही लढाई चालू असतां नबाबाच्या तंबूंत एके दिवशीं बेगमशीं बोलत होता, नबाब एकाएकीं तंबूंत शिरून बैठकीवर चिंतित अंतःकरणानें बसला, त्याचा चेहरा काळजीनें व खिन्नतेनें व्याप्त दिसत होता ! तेव्हां बेगमनें प्रश्न केला " चेहऱ्यावरून सरकारना मोठी चिंता असलेली दिसते, ती काय आहे, हें समजेल काय ? " नबाबानें विषण्ण मनानें सांगितलें, " मराठ्यांशीं चाललेल्या या लढाईचा निकाल काय, कसा होणार आहे याबद्दल मला मोठी चिंता लागली आहे ! कारण आपल्या छावणींतले आपले कांहीं मोठे अधिकारी व सरदारच फितूर झाल्याचें मला समजलें आहे " ! हें ऐकून बेगमलाही काळजी उत्पन्न झाली. तेव्हां आपल्याकडून नबाबाच्या चिंतेचें निराकरण करण्यास कांहीं उपाय आहे काय याचा विचार करतांना आपण आपल्या जबाबदारीवर रघूजीशीं समेटाचें बोलणें चालू करून पहावें असें वाटून बेगमनें मुजफर अल्लीखान व फकीरअल्लीखान (याचा बाप औरंगजेबाच्या वेळीं बऱ्हाणपुरास दिवाण होता व तो इतिहास–लेखकही होता) या दोघां हुशार सरदारांना रघूजीकडे पाठविलें. समानतेच्या मुद्द्यावर तहाचें बोलणें करण्यास तिनें त्यांना हुकूम दिला होता. रघूजीच्या हालचालींचीं बंगालमधील सूत्रें हलविणारा मीरहबीब याजकडे प्रथम हे दोघे सरदार गेले. त्यानें दोघांना रघूजीच्या भेटीस नेलें. बेगमचें म्हणणें त्यांनीं रघूजीपुढें मांडलें. " अलीवर्दीखानापुढें आपलें कांहीं चालत नाहीं व चालणार नाहीं " हें लक्षांत असल्यानें वरील सरदारांच्या म्हणण्यास रुकार देण्यास रघूजी तयार होता, परंतु नबाबाचा कट्टा शत्रु मीर हबीब तेथें होता, त्यानें रघूजीस त्याच्या, नबाबापेक्षां वरचढ सामर्थ्याची जाणीव करून देऊन बेगमच्या बोलण्याकडे फारसें लक्ष न देतां मुर्शिदाबादेवरच स्वारी करण्याची सल्ला दिली. कारण तेथें फौज नव्हती, तें शहर तटबंदीचें नव्हतें व तेथें आणखी कांहीं गोष्टी साधण्याच्या होत्या व त्यामुळें बेगमच्या तहाच्या समानतेच्या अटी मान्य न होऊन ते सरदार परत गेले.

शेरे मुताखरीनच्या लेखकानें " नबाबापुढें आपलें कांहीं चालत नाहीं व चालणार नाहीं " हें रघूजीचें म्हणून लिहिलेलें म्हणणें कितपत खरें असेल याचा विचार वाचकांनींच करावा. नबाबाच्या छावणींत मोठमोठे सरदार फितूर झाल्याचें नबाबास समजलें होतें! लढाईचा निकाल काय होणार याची चिंता नबाबास पडली होती! ती नाहींशी करण्यास स्वतः पुढाकार घेऊन तहाचें बोलणें करण्यास सरदार पाठविण्याची पाळी खुद्द नबाब बेगमवर आली! या सर्व गोष्टी लेखकानेंच लिहिलेल्या आहेत व त्या खास विश्वसनीय आहेत यांत शंकाच नाहीं. कारण हा लेखक प्रत्यक्ष या वेळीं नबाबाच्या छावणींत होता व त्यांत विशेष हें कीं, त्याचा शिरकाव थेट नबाबाच्या बेगमकडे जाऊन बोलत बसण्याइतका होता. नुसत्या तर्कानें रघूजीचे म्हणून लिहिलेले विचार चूक असणें संभवनीय आहे परंतु प्रत्यक्ष बेगमशीं व नबाबाशीं बोलत बसणारा हा सय्यद गुलाम हुसेन खान लेखक आपल्या छावणींतल्या प्रत्यक्ष घडलेल्या व बोलाचालींत माहीत झालेल्या गोष्टी लिहितो, त्या तर्काच्या नसून खऱ्याच धरल्या पाहिजेत. तेव्हां त्यांतूनही असाच स्पष्ट ध्वनि निघतो कीं, या प्रसंगीं नबाबाची स्थिति हलाखीची होती व रघूजी त्याच्यापेक्षां खात्रीनें वरचढ होता.

मोंगली सैन्याची उपासमार

रघूजी व मीर हबीब यांनीं ठरविल्याप्रमाणें मुर्शिदाबादेवर चाल केली. हें समजल्यावर नबाबही मागोमाग निघाला. नबाबाचा दाणागोटा मराठ्यांनीं बहुतेक लुटला होता. धान्य, दाणा, वैरण, रयतेवर जबरदस्ती केल्याशिवाय मिळत नसे. त्यामुळें नबाबाच्या छावणींत महर्गता झाली. धान्यधुन्य मिळणेंच दूरापास्त झालें! मराठे वाट चालतांना शत्रूस धान्य मिळूं नये म्हणून गांवेंच्या गांवें लुटून व जाळूनही टाकीत! त्यामुळें वाटेनेंही नबाबास व त्याच्या सैन्यास धान्य मिळणें दूरापास्त झालें! दुसरीकडून धान्य आणावें तर शोणनद तुफान वाहत असल्यानें, नावांतून धान्य आणणें अशक्य होतें. अशा भयंकर आपत्तींत नबाब व त्याचें सैन्य पडलें होतें. एकटेंदुकटें तर सोडूनच द्या, परंतु बरोबर थोडें सैन्य घेऊन जाणेंही मराठ्यांनीं कसें अशक्य करून टाकलें होतें, याची कल्पना शेरे मुताखरीनमध्यें दिलेल्या नबाबाच्या दोन सरदारांच्या पुढील हकीगतीवरून दिसून येईल.

दोन मोंगली सरदारांची दुर्दशा

मेहता जसवंत नागर व मीर गुलाम अश्रफ असे दोन सरदार झैनुद्दीन अहमदच्या हाताखालीं पाटण्यास काम करीत असत. कांहीं विशेष कामाकरितां सर्व सैन्याबरोबर त्यांना निघतां आलें नाहीं, तेव्हां ते मागाहून सैन्याकरितां कांहीं सामानासह पाटण्याहून निघून मुख्य सैन्यास मिळण्यास येत होते.

वाटेंत मराठ्यांनीं नाकेबंदी केली आहे, जाणें येणें धोक्याचें आहे, या गोष्टी त्यांना माहीत असतांही मालकाला आपली स्वामिभक्ति व शौर्य दाखविण्याच्या इराद्यानें थोडेसे लोक घेऊन ते येत होते. थोडक्याच वेळांत व थोडक्याच अंतरावर मराठ्यांनीं एकदम त्यांना घेरलें व सर्व सामान व हत्यारें खालीं ठेवण्यास सांगितलें. ते कबूल होईनात, तेव्हां मराठ्यांनीं त्यांच्यावर हल्ला करून कांहींना मारून, कांहींना जखमी करून, सामानसुमान घेऊन, ते निघून गेले. मेहता जसवंत नागर व मीर गुलाम अश्रफ दोघेही जखमी होऊन पडले होते व शुद्धीवर येऊन पहातात तों दोघांच्या आंगावर जखमा असून मेहता जसवंत नागरचेंतर नाक कापलें होतें व दोघांच्या आंगावर कपडाही नव्हता !

अशा प्रकारच्या कृत्यांनीं उद्ध्वस्त झालेल्या प्रांतांतून अलीवर्दीखान कसाबसा वाट काढीत मोठ्या कष्टानें पाटण्यास आला. रघूजी राजधानीवर चालून गेल्याचें समजल्यावर विश्रांतिही न घेतां तो भागलपुरास आला व चंपानगरजवळ झाडा-खालीं त्यानें मुक्काम केला व मुख्य छावणी कोठें करावी हें पाहून येण्यास आपले अधिकारी पुढें पाठविले. रघूजीस नबाबाची बित्तंबातमी लागत असे. तो सहा हजार स्वार घेऊन नबाबासमोर एकदम उभा राहिला. नबाबाजवळही तितकीच फौज तेथें होती, ती घेऊन नबाबही लढाईस सज्ज उभा राहिला. या वेळीं नबाबाच्या सैन्यांतील दोस्त महंमद नांवाच्या एका तरुणानें आपल्या शौर्याचें प्रदर्शन म्हणून मराठ्यांच्या एका लहानशा टोळीवर हल्ला करून एका मनुष्यास पकडून नबाबापुढें उभें केलें व नबाबास सांगितलें कीं, रघूजीही या टोळींत होता, परंतु तो निसटला ! नबाबानें दोस्त महंमदची तारीफ केली व तो रघूजीशीं लढण्यास तयार झाला.

रघूजी नबाबादेखत मुर्शिदाबाद लुटतो !

रघूजी नबाबापुढें ६ हजार स्वार घेऊन उभा राहिला तो लढाई देण्या-करितां नसून त्यास त्या ठिकाणीं थोपवून धरण्यासाठीं उभा राहिला. अडथळे आणण्यास तेथें थोडे लोक ठेवून नबाबाच्या आधीं मुर्शिदाबादेस पोंचलें पाहिजे या इराद्यानें वळसा मारून भागलपूरच्या पुढें पूर्व दिशेनें डोंगरांतून व रानांतून वाट काढीत नबाबाच्या आधीं तो दोन दिवस मुर्शिदाबादेस पोंचला (२१ दिसेंबर १७४५). छापायडा व मिरजाफर गंज हीं दोन उपनगरें त्यानें लुटून जाळलीं ! दुसऱ्या दिवशीं नबाबाची स्वारी आली. नबाबाचें सैन्य अगदींच थकलें होतें, तेव्हां त्या लोकांना नबाबानें ४।५ दिवस विश्रांति दिली ! नबाबाचें सैन्य विश्रांति घेत असतां रघूजी नबाबाच्या डोळ्यां-देखत शहराचे निरनिराळे भाग व उपनगरें बेफिकीरपणें लुटून जाळीतही होता ! परंतु नबाबानें त्याचा प्रतिकार केला नाहीं ! हें आश्चर्य नव्हे काय ? मराठ्यांचा तळ भागीरथीच्या दक्षिणेस असावा, कारण ४।५ दिवसांनीं नबाबानें

भागीरथी उतरून अमानीगंज येथें आपली छावणी आणली. हें पाहून रघूजीनेंही आपला तळ आणखी खालीं कटवा येथें आणला. नबाब मजल दरमजल खालीं कटव्याच्या बाजूस आला व वाटेंत त्याची व रघूजीची लढाई राणीतलावाजवळ जुंपली. शेरे मुताखरीनच्या लेखकाच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें याही लढाईंत रघूजीची प्राणहानि पुष्कळ झाली असेंच त्यानें लिहिलें आहे!

येवढी गोष्ट मात्र खरी कीं, याच सुमारास नागपुराहून चांयाचा गोंड राजा निळकंठ शहा, रघूजीची खंडणी बंद केल्याची बातमी आल्यानें व नागपूरकडे निघून येण्याचीं निकडीचीं पत्रें आल्यानें, ४ हजार मराठी सैन्य व ६ हजार अफगाण सैन्य मीर हबीबजवळ ठेवून तो तांतडीनें परत आला. तरी ओढिसाकटक प्रांतांत त्याचा अमल चालू होता.

अशा तऱ्हेनें रघूजी बंगाल्यांतून निघून गेल्यानें तेथें त्याची बाजू ढिली पडली. तेव्हां याचा फायदा घेऊन हातांतून गेलेल्या ओढिसाकटक प्रांताची सोडवणूक व व्यवस्था करण्यास नबाबास फुरसत सांपडली.

सर्वाधिकारी मिरजाफरखानही उलटला!

नबाबानें आपला पुतण्या व जांवई सय्यद अहमदखान यास कटकची सुभेदारी दिली व मिरजाफरखानास नायब सुभेदार नेमून त्यास सर्वाधिकार दिला. मिदनापूर व हिजली येथील दोन्ही फौजदाऱ्याही त्यासच दिल्या; शिवाय सध्यां तो करीत असलेलें मुख्य बक्षींचें (पेमास्तर जनरलचें) कामही त्याच्याकडेच राहावयाचें होतें. हा एवढा मोठा अधिकारदानाचा समारंभही मोठा दरबार भरवून दणक्यानें त्यानें साजरा केला. नबाबानें त्यास खिलात, हत्ती, घोडा, पोनियार्ड, जवाहिरांनीं जडलेला शिक्का दिला. सय्यद अहमदनेंही आपल्यातर्फे म्हणून हत्ती जवाहीर देऊन मिरजाफरचा मोठाच गौरव केला. मिरजाफरखानानें आपल्यातर्फे स्वतःचाच भाऊ मीर इस्मायल यास बक्षीगिरीचें काम व स्वतःतर्फे दरबारांत प्रतिनिधि म्हणून नेमलें, व सुजनसिंग नांवाच्या एका गृहस्थास आपल्यातर्फे हिजलीचा फौजदार नेमलें. इतकी व्यवस्था झाल्यावर मिरजाफरखान ७ हजार स्वार व १२ हजार पायदळ घेऊन कटकला जाण्यास निघाला. वाटेंत मिदनापूरजवळ मराठे व अफगाण त्यास आडवे आले. त्यांना त्यानें मागें जालेश्वरच्या बाजूस हटवलें. व तो (केहांसा Kehansa) कसाई नदीच्या कांठीं थांबला, परंतु कटकच्या बाजूकडून आणखी मराठी फौज येत आहे अशा बातम्या त्यास येऊं लागल्यामुळें भीतीनें तो नदी उतरून न जातां तेथें तळ देऊन राहिला व थोड्याच दिवसांत मराठ्यांच्या भीतीनें त्यानें तळ उठवून नबाबाची परवानगी न घेतां अगर त्यास न कळवितां मिदनापुरावरून तो परत बरद्वान येथें आला. कारण काय तर जानोजीच्या अघाडीच्या टोळीनें मिरजाफरखानाचे हत्ती व सामान पळविलें (फेब्रुआरी १७४७)!

या नंतर आताउल्ला व मिरजाफर खानांनीं नबाबास ठार मारून त्याची नबाबी वांटून घेण्याचा कट केल्याचें उघडकीस आलें! तेव्हां नबाबानें त्यांस बोलावून त्यांची निर्भत्सना केली व त्यांस व कांहीं अफगाणांना कामावरून काढून घरीं बसण्यास सांगितलें व नूरउल्लाबेगखानास पेमास्तर जनरलचें म्हणजे बक्षीचें मुख्य काम दिलें.

जानोजी मुर्शिदाबादेवर चढाई करितो

जानोजीस घालविण्यास नबाब स्वतः बरेंच मोठें सैन्य घेऊन आला (मार्च सन १७४७). जानोजीची व त्याची बरद्वानजवळ लढाई होऊन जानोजीचा पराभव होऊन तो पळाला! असें शेरे मुताखरीनच्या लेखकानें लिहिलें आहे व प्रत्येक ठिकाणीं नबाबाचा जय व मराठ्यांचा पराजय! बंगालसैन्यानें मराठ्यांना मोठ्या शौर्यानें कापून काढलें! हीच भाषा सर्वत्र लिहिली आहे, परंतु प्रत्येक अशा प्रसंगीं मराठ्यांचा पराजय होत असतां ते पुढें मुर्शिदाबादेवर अगर पाटण्याकडे चाल करून जात होते कसे, हेंच समजत नाहीं. वरील लढाईंत जानोजीचें बहुतेक सैन्य यमसदनास पाठविल्याचें चापून लिहिलें आहे, परंतु लागलीच पुढच्या मजकुरांत जानोजी मुर्शिदाबादेवर चाल करून गेल्याची हकीगत आहे. तेथें त्यांनीं उपनगरेंही लुटलीं. प्रत्येक वेळीं मराठ्यांची फौज गारद होत असतां मुर्शिदाबादेवर चाल करून जाण्यास फौज येत होती कोठून? मुर्शिदाबादेवर गेल्यावर तेथें तो फारसें नुकसान करूं शकला नाहीं व नबाबाच्या सैन्यानें त्यास मिदनापूरपर्यंत पिटाळून लाविलें असा मजकूर आहे. याचा अर्थ असा दिसतो कीं, पावसाळा सुरू झाल्यामुळें ओढिसांत छावणी करण्याकरितां तो परत फिरला असावा (मे सन १७४६).

९ अफगाण अलीवर्दीवर सूड उगवितात

झैनुद्दीन अहमद व बंडखोर अफगाण

हाजी अहमद हा अलीवर्दीचा मोठा भाऊ होता. याच्या तिघां मुलांना अलीवर्दीनें आपल्या तिन्ही मुली दिल्यानें हे तिघे त्याचे पुतणे व जांवईही होते (नवाझिज महमद, सय्यद अहमद, व झैनुद्दीन अहमद). यांपैकीं झैनुद्दीन अहमद जास्त कर्तबगार व हुशार होता आणि महत्त्वाकांक्षीही होता. म्हणून त्यास नबाबानें पाटण्याची सुभेदारी दिली होती. दुसरे दोघे कधीं येथें, कधीं तेथें, अशीं सुभेदार अगर नायब सुभेदारीचीं कामें पहात, परंतु तीं फक्त नांवापुरतींच असून हे दोघेही बहुतेक मुर्शिदाबादेसच राहत असत.

झैनुद्दीन अहमदाच्या पराक्रमामुळें मुस्ताफाखानाचा पराजय होऊन तो जगदीशपूरच्या लढाईंत मारला गेल्यामुळें त्याच्या मोकाट सुटलेल्या बंडखोर

अफगाणांनीं बंगालबिहारमध्यें इतकी जाळपोळ व अत्याचार केले कीं, ते " न भूतो न भविष्यति " या सदरांत येतील. मराठ्यांनीं १० वर्षांत मिळून बंगालबिहारमध्ये केले म्हटलेले व ज्यांच्यासंबंधीं बंगाली लोकांनीं फारच गवगवा केला आहे, त्यांवर " महाराष्ट्र पुराण " लिहिलें होतें, नाटकें लिहिलीं आहेत, वर्तमानपत्रांतून व मासिकांतून (Bargi Raids on Bengal) " बर्गी लोकांचे बंगालवर हल्ले " यांवर लेखांवर लेख लिहिले आहेत व लिहीत असतात, त्या सर्वांतील त्यांनीं केले म्हटलेले अत्याचार एकत्र केले तरी ते या अफगाण टोळ्यांनीं कांहीं महिन्यांत केलेल्या अत्याचारांच्या पासंगासही पुरणार नाहींत, इतके होते ! तेव्हां हे असले भयंकर स्वरूपाचे अत्याचार थांबविण्यास त्यांचा नायनाटतरी केला पाहिजे अगर त्यांचे अत्याचार थांबवून त्यांना कह्यांततरी ठेवलें पाहिजे. वरील जयामुळें झैनुद्दीन अहमदाचें पारडें जरा जड होत चाललें होतें व तो महत्त्वाकांक्षी असल्यानें पुढेंमागें अलीवर्दीखानानंतर अगर त्यास बाजूस सारूनही त्याची नबाबीच (बंगाल बिहार ओडिसा) पटकावण्याचे विचार त्याचे मनांत घोळूं लागले होते, परंतु याकरितां सैन्यसामर्थ्य वाढविलें पाहिजे होतें, तेव्हां त्याच्या मनांत एक कल्पना येऊन त्यानें मीर अबदुलमाली (हा पूर्वी सादतखानाजवळ होता) नांवाच्या सरदारास नबाबाकडे कांहीं सूचना देऊन पाठविलें.

झैनुद्दीन अहमदाची सूचना

नबाब अमानीगंज येथें होता (आक्टोबर १७४७). त्याजवळ मीर अबदुलमालीनें झैनुद्दीनचें म्हणणें पुढीलप्रमाणें मांडलें. " मुस्ताफाखान मेल्यामुळें त्यांचे अफगाण लोक बिहारमध्यें लूटमार, जाळपोळ व अनन्वित अत्याचार करीत मोकाट भटकत आहेत. तुम्ही कामावरून काढलेले समशेरखान व शेरखान हे त्यांचे सरदार आहेत, तेव्हां यांना मोकळें सोडून रयतेचें, देशाचें व स्वतःचें नुकसान करून घेण्यापेक्षां या दोघां सरदारांना निवडक ३००० तीन हजार सैन्यासह आपल्या सैन्यांत भरती करून सामील केल्यास सहाजिक दंगेधोपे थांबून शांतता होईल, परंतु यांच्या पगाराची व्यवस्था बिहारच्या उत्पन्नांतून होण्यासारखी नाहीं. ती सोय मुर्शिदाबादेच्या मुख्य खाजिन्यांतून व्हावी. नबाबानें ही योजना मंजूर केल्यास अफगाणांची भरती करण्याची व्यवस्था करतां येईल. " नबाबास ही सूचना वास्तविक मुळींच पसंत पडली नाहीं. उलट झैनुद्दीनचा त्यास रागच आला परंतु यांत धोका असला तरी फायदा आहे व जांवई झैनुद्दीन यास या गोष्टीकरितां या वेळीं नाराज करूं नये म्हणून नबाबानें या गोष्टीस मंजुरी दिली (आक्टोबर सन १७४७). ती घेऊन मीर अबदुल-माली पाटण्यास गेला. त्याप्रमाणें झैनुद्दीन अहमद सुभेदारानें अफगाण सरदारांशीं, त्यांनीं सैन्यांत भरती व्हावें याबद्दल बोलणें चालू केलें. दोन्ही बाजूंनीं आणाशपथा

होऊन, दगाफटका होणार नाहीं अशा कबुल्या होऊन, अफगाण सरदार समशेरखान, मुरादशेरखान, सरदारखान, शेरखान, बक्षी बुलंदखान हे ३००० फौजेसह पाटण्यास नदीपलीकडे हाजीपूर येथें उतरले. परंतु ते सुभेदाराकडे प्रत्यक्ष भेटीस येण्यास भितात असें त्यांनीं दाखविलें. तेव्हां झैनुद्दीन अहमदच स्वतः एक दिवस नदी उतरून जाऊन त्यानें त्या सरदारांची भेट घेतली व आपला त्यांवर विश्वास आहे, असें त्यानें त्या सरदारांना दाखविलें.

झैनुद्दीन अहमदाचा त्याच्याच दरबारांत खून ! !

दुसऱ्या दिवशीं (ता. १३ जानेवारी १७४८) ते अफगाण सरदार आपापल्या सैन्यासह नदी उतरून सुभेदारास नजरनजराणे, कुर्निसात करावयास आले. दुर्दैव त्या झैनुद्दीन अहमदाचें ! आपला या लोकांवर किती विश्वास आहे हें दाखविण्याकरितां सुभेदारानें " या प्रसंगीं कोणींही लष्करी अधिकाऱ्यानें हजर राहूं नये " असा जगाविरहित हुकूम सोडला ! त्यामुळें दरबारास झैनुद्दीनच्या बाजूचा एकही लष्करी अधिकारी अथवा शरीरसंरक्षकही हजर राहूं शकला नाहीं ! व या परिस्थितीचा फायदा त्या बंडखोर अफगाणांनीं पूर्णपणें घेतला. प्रत्येकानें सुभेदारापुढें जावयाचें, नजरनजराणा समोर ठेवावयाचा व पानविडा घेऊन कुर्निसात करीत मागें मागें यावयाचें. अशा प्रकारें एकेकाचा कार्यक्रम सुरळीत चालला असतां अबदुल रसीदखानानें झैनुद्दीन अहमद यावर एकाएकीं वार केला परंतु तो लागला नाहीं म्हणून मुराद शेरखानानें जोराचा वार करून त्यास ठार मारलें ! अफगाणांनीं तेथील सर्व लोकांना मारून झैनुद्दीनच्या राजवाड्यावर हल्ला चढविला. तेथें लूट व जाळपोळ करून, बायका मुलांना पकडून त्यांचे हाल हाल चालविले. झैनुद्दीनचा बाप व अलीवर्दीचा मोठा भाऊ हाजी अहमद यास पकडून ७५ लक्ष रुपयांची दडवून ठेवलेली दौलत दाखविण्याकरितां त्याचे हाल करून त्यास पाटणा शहराच्या भर चौरस्त्यांत एका तिकाटण्यावर उलटा टांगून त्याला खालून भाजून काढलें !! अशा तऱ्हेनें सबंध शहरांत चालू ठेवलेल्या अनन्वित अत्याचारांना कोणची उपमा यावी हें आम्हांस समजत नाहीं !

अलीवर्दीखानाचें मनोधैर्य

प्रत्यक्ष सख्खा भाऊ व जांवई निर्दयतेनें, क्रूरतेनें मारले गेले, मुलगी, नातू व नातवंडें सर्व कैद होऊन हालअपेष्टेंत काळ कंठीत आहेत व बिहारमध्यें चालू असलेल्या अत्याचारांची नित्य नवी हृदयविदारक बातमी ऐकून एखाद्याची कंबर खचून गेली असती, परंतु अलीवर्दीनें मोठें धैर्य दाखवून, एक मोठा दरबार भरवून, अफगाणांच्या पाटण्याच्या अत्याचारांची हृदयस्पर्शी करुणकहाणी त्यानें स्वतः सर्व दरबारी व आमंत्रित मंडळींना निवेदन केली, व जर या अफगाणांचा बंदोबस्त ताबडतोब केला नाहीं तर सर्वांचेंच जीवित कसें धोक्यांत आहे हें सांगून

या अशा प्रसंगीं सर्वांनीं मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे वगैरे विनंतिवजा हुकूम सांगून सर्वांकडून मदतीच्या आणाशपथाही घेतल्या. त्यानें अर्थात् ही गोष्ट प्रांजळपणें कबूल केली कीं "सैन्याची बरीच बाकी थकली आहे ही गोष्ट खरी आहे, परंतु यावेळीं सर्वांनीं मनोभावानें मला मदत केली तर सर्वांचें हें देणें माझ्यावर कर्जच आहे असें मी समजतों व तें फेडल्याशिवाय मी राहणार नाहीं." या आश्वासनावर त्यानें मोठमोठ्या शेटसावकारांकडून, जगत्‌शेटकडून, नवाजिश महमदकडून, व मुलगी घसीटा बेगम हिच्याकडून, पुष्कळ रकम घेतली. पैकीं कांहीं रकम सर्व सैन्यांत चालू खर्चाकरितां वांटली. ही व्यवस्था तो करीत असतां मीर हबीब व मराठे चालून आल्याची बातमी आली, त्यांचे हल्ले हे एकदम व्हावयाचे व ते एकाच ठिकाणीं न होतां चारी बाजूंस चालू राहावयाचे. त्यामुळें मोठ्या सैन्यासही ते नेहमीं भारी होत; यामुळें अलीवर्दीखानास शहरसंरक्षणाची मोठी काळजी पडली. तेव्हां ही मराठी झुंड निघून जाईपर्यंत तेथें छावणी करून तो राहिला, व अफगाणांवर चालून जाण्याची जंगी तयारी चालू ठेवली. बाळाजी बाजीरावास मदतीस बोलावलें, आपला जांवई सय्यद अहमदखान यास 'बागवान गोला' येथें कांहीं फौजेनिशीं मराठ्यांच्या हल्ल्यांपासून पाटण्यास जाणारा रस्ता सुरक्षित ठेवण्याकरितां पाठविलें.

नवाबाचा जाहीरनामा – गरीब प्रजेचें रक्षण अशक्य !

त्याचप्रमाणें त्यानें एक जाहीरनामा काढून लोकांना असें कळविलें कीं "या घटकेस ज्या अफगाण बंडखोरांनीं त्याचा भाऊ व जांवई यांस विश्वासघात करून अत्यंत क्रूरतेनें ठार मारलें व त्यांच्या बायकापोरांस कैद करून त्यांचे हाल चालविले आहेत, पाटणा शहर व सर्व देश लुटून नासधूस चालविली आहे, त्या अफगाण बंडखोरांचा नाश करणें हें त्याचें सध्यां मुख्य कर्तव्य आहे. मराठ्यांच्या अनिश्चित होणाऱ्या हल्ल्यांकडे लक्ष देणें त्यास सध्यां शक्य नाहीं. त्यांचा समाचार मागाहून घेतां येईल. तेव्हां सध्यां मुर्शिदाबादच्या प्रजेचें संरक्षण मराठ्यांच्या हल्ल्यांपासून करण्यास तो अगदीं असमर्थ आहे ! ज्यांना ज्यांना शक्य असेल त्यांनीं आपापली चीजवस्त, बायकामुलें गंगेपलीकडे कोण्या गांवीं सुरक्षिततेकरितां न्यावीं व बाकी प्रजेनें वाटेल त्या उपायानें आपलें संरक्षण करावें. नाहींतर दैवावर हवाला ठेऊन जें होईल तें सहन करावें."

या जाहीरनाम्याप्रमाणें ज्यांना शक्य होतें ते गंगेपार जाऊन राहिले. बाकी लाखों लोक देवाची कृपा भाकीत गांवांतच राहिले. या प्रकारें प्रजेच्या व त्यांतल्या त्यांत गरीब प्रजेच्या संरक्षणाची व्यवस्था कोरड्या जाहीरनाम्यावर भागविली, त्यामुळें त्याला थोडें हायसें वाटलें ! व तो अफगाणांशीं यावयाच्या लढाईच्या तयारीस जोरानें लागला.

नबाब लढाईची तयारी करतो

नबाबानें लढाईची तयारी जारीनें चालू ठेवली. सैन्यास पैशाची मदत दिली, कांहींना बक्षिसें दिलीं, कांहींना बक्षिसांचीं वचनें दिलीं, कांहींना पदव्या दिल्या, कांहींना पदव्यांचीं आश्वासनें दिलीं ! त्यानें १४ हजार स्वार व ८ हजार पायदळ तयार केलें व त्याची छावणी अमानगिंज येथून हलवून चपाडी गांवाजवळ त्यानें मुक्काम केला (ता. १९ फेब्रुआरी सन १७४८) (मुर्शिदाबादेच्या पश्चिमेस ३–४ कोसांवर). जांवई व पुतण्या नवाजिश महमदखान यास राजधानी मुर्शिदाबादचे संरक्षणार्थ ठेवलें. सैन्यास धान्याचा तुटवडा मराठ्यांच्या हल्ल्यामुळें पडण्याचा संभव आहे म्हणून व्यापारी लोकांना सैन्याबरोबर नावेंतून व अलग अलग मार्गानें, माल नेण्यास फर्माविलें. पैसे दिल्याशिवाय सैन्य निघेना तेव्हां त्यांना पैसे दिले, व चपाडीहून पुढें निघाला. ही बातमी मराठ्यांना समजल्याबरोबर त्यांनीं मुर्शिदाबादेवर करावयाचा हल्ला सोडून ते अफगाणांस मदत करण्यास निघाले (सन १७४८ मार्च). अलीवर्दीखान मोंगीर येथें २।३ दिवस राहणार होता. पूर्णियाचा फौजदार शेफखान यानें दीनमहंमदच्या हाताखालीं १५०० लोक देऊन त्यास अलीवर्दीच्या मदतीस पाठविलें. तो करणगोला येथें गंगा उतरून सुलतानपूर येथें अलीवर्दीची वाट पहात राहिला. मराठ्यांनीं त्याला तेथें घेरलें, परंतु रात्र पडल्यामुळें मराठ्यांचा वेढा ढिला पडला होता. अलीवर्दीनें याच्या मदतीस उमरखानाचे चार मुलगे पाठविले होते, परंतु ते पोंचण्यापूर्वींच दीनमहंमद रात्रीच्या अंधारांत मराठ्यांचा डोळा चुकवून रात्रभर वाट चालून अलीवर्दीच्या मुख्य सैन्यास मिळाला. त्यामुळें अलीवर्दी त्यावर खुष झाला. याच सुमारास आताउल्लानें अफगाण बंडखोरांना लिहिलेलीं गुप्त पत्रें अलीवर्दीच्या हातीं सांपडलीं ! मीर हबीबनें भागलपूरजवळ नबाबाचें धान्य लुटलें. त्यामुळें नबाबाच्या सैन्यांत पुष्कळ गडबड उडून गेली (ता. १७ मार्च सन १७४८) !

अफगाण सरदार व मीर हबीब – भेट व परत भेट

इकडे अलीवर्दीखान लढाईच्या तयारीनें येत असल्याची बातमी अफगाणांना लागली. तेव्हां पाटणा सोडून, त्यांनीं आतांपर्यंत जमविलेलें व त्यांना येऊन मिळालेलें, असें सर्व अफगाण सैन्य ४० हजार जमलें होतें तें सर्व दारूगोळा तोफखान्यासह बार या गांवीं नदीपलीकडे छावणी करून राहिलें. याच वेळीं मीर हबीब व जानोजीही बारगांवा (पाटण्या) जवळ येऊन त्यांनीं मुराद शेरखानप्रभृति अफगाणांना आपण आल्याची बातमी दिली. मीर हबीबच्या सांगण्यावरून व त्यानें दिलेल्या आश्वासनावर अवलंबून या अफगाणांनीं येवढा मोठा कट करून व कारवाईनें झैनुद्दीन अहमदला व हाजी अहमदास मारलें, पाटणा काबीज केलें व म्हणून ते मीर हबीब व जानोजीस भेटण्यास आले.

मीर हबीब म्हणजे मोठा युक्तिबाज व डोक्याचा परंतु तापट स्वभावाचा व खुनशी होता. समशेरखान व मुराद शेरखान यांचा मीर हबीबनें गौरव केला व पाटण्याची सुभेदारी आतां त्यांचीच झाली असा बोलण्याचा रोख धरला. दुसऱ्या दिवशीं अफगाणांनीं त्यास परत भेटीस बोलावलें. तो तेथें गेला तेव्हां त्याच्याबरोबर मिरझा महमदखान व मोहनसिंग हे होते.

मीर हबीबची अक्कल हुशारी – संकट, अटक, सुटका !

अफगाण सरदारांनीं मीर हबीब व त्या मंडळीस मोठी मेजवानी दिली, परंतु तो परत निघण्यापूर्वी त्या अफगाण सरदारांनीं त्यास सांगितलें कीं, " तुमच्या सांगण्यावरून आम्हीं येवढी कामगिरी केली, ती तुमचे नोकर म्हणून केली, परंतु आम्हांला तनखा असा तुम्हीं कांहींच दिला नाहीं. झैनुद्दीनचा निकाल तुम्हीं सांगितल्या कारवाईनें केला, आज ५०००० फौज तुमच्या सांगण्यावरून आम्हीं जमविली. या लोकांचा ३५ लाख रुपये तनखा देणें बाकी आहे. तेव्हां हे रुपये तुम्ही द्या व मग परत जा ! " मीर हबीब या वेळीं अत्यंत बिकट परिस्थितींत सांपडला होता. परंतु तो मोठा डोक्याचा मनुष्य होता. त्यानें एक युक्ति योजिली. बरोबर आलेल्या कांहीं मराठे लोकांना छावणींतून जरा बाहेर जाण्यास सांगून " त्या सर्वांनीं एकदम अलीवर्दीचा हल्ला आल्याचा आरडाओरडा करीत आंत यावें " असें सांगून त्यांना बाहेर धाडलें व परत येतांना ते लोक आरडाओरड करीत मीर हबीब होता तेथें आले. त्यामुळें अफगाण सैन्यांत ती बातमी पसरून एकच गडबड झाली. या गडबडींत मीर हबीब जाण्यास निघाला, परंतु समशेरखान व मुराद शेरखान, त्यास जाऊं देईनात व पैशांबद्दल त्यांनीं मागणी केली. तेव्हां मीर हबीबनें सांगितलें कीं, याच नेमक्या ऐन प्रसंगीं तुम्ही मला अडवितां ही मोठी घोडचूक करीत आहां. नबाब चालून आला आहे, या वेळीं मला अडवून ठेविल्यास वास्तविक नुकसान कोणाचें होईल ? मी परत गेलों तरच पैशाचीही थोडी तजवीज करून, माझें सैन्य घेऊन मी दुसऱ्या बाजूनें नबाबास पायबंद देऊं शकेन व मला जाऊं दिलें नाहीं तर नबाबास जें पाहिजे तेंच नेमकें होईल. या वेळीं लढाईची मांडणी कशी करावयाची हें ठरवावयाचें का आपसांत झगडत बसायचें ? या वेळीं एकेक क्षण मोलाचा आहे. मी परत गेल्याबरोबर ताबडतोब तूर्त २ लाख रुपये पाठवून देतों " व त्याबद्दल एक सावकारही त्यानें जामीन दिला व मीर हबीब मोहनसिंग वगैरे सुरक्षित आपल्या छावणींत परत आले !

अलीवर्दीखानही थोडक्या दिवसांत गंगेच्या किनाऱ्यानें येत येत बार गांवाजवळ ता. १४ एप्रील रोजीं आला. नदीपलीकडे अफगाणांची छावणी होती. अफगाणांनीं नदीच्या किनाऱ्यावर जागजागीं तोफा लावून ठेवल्या

होत्या. नबाबानें अफगाणांच्या छावणीची व त्यांच्या लढाईच्या तयारीची व्यवस्था कशी होती ती एका तिकडील जमीनदाराकडून मागविली व रात्रीच्या वेळीं दोन मैल पश्चिमेस जाऊन नदी उतरून तो पलीकडे सैन्यासह गेला व दुसऱ्या दिवशीं सकाळीं १०।११ वाजतां एकदम अफगाणांवर त्यानें हल्ला केला. त्यामुळें अफगाण बऱ्याच तोफा व सामान टाकून पळाले. हा शुभ शकुन समजून परंतु यांत कांहीं धोका नाहीं हें पहाण्यास थोडें पुढें जाऊन तेथें रात्रीं भीतभीतच त्यानें छावणी केली, परंतु अर्धें सैन्य जागें तयार ठेवलें. सकाळीं नमाज पढल्यावर बारगांवची त्यानें स्वतः पहाणी केली. नदीचे ओघ आगें मागें गेल्यामुळें बनलेल्या बेचक्यांत राणीचौक गांवाजवळ आपली फौज लढाईच्या तयारीनें त्यानें उभी केली. फौजेची मांडणी करण्यांत निजाम उल्मुल्कशिवाय त्या काळीं एकटा अलीवर्दीखानच प्रख्यात होता, असें शेरे मुताखरीनमध्यें लिहिलें आहे.

(राणी सराईची ?) राणी चौकची भयंकर लढाई

वास्तविक ही लढाई अलीवर्दीखान व अफगाण यांच्यामध्यें झाली, परंतु या लढाईत मराठे अफगाणांना मदत करण्याच्या इरायानें व अलीवर्दीला दुसऱ्या बाजूनें शह देऊन त्याचें लक्ष वेधण्याच्या इरायानें लढाईत भाग घेत होते. नबाबानें आपल्या सैन्याची मांडणी पुढीलप्रमाणें केली होती:-- पुढील बाजूस अबदुल अल्ली खानाच्या हाताखालीं लांब पल्ल्याच्या तोफा व्यवस्थित लावल्या होत्या, त्याच्यामागें हैदरअल्लीजवळ हलका तोफखाना होता. त्याला रहीमानखान, मीर् महंमदखान व दोस्त महंमद मदतनीस होते. यांच्या डाव्या बाजूस बऱ्याच मागें मराठ्यांची फौज पसरली होती. तेव्हां मराठ्यांच्या तोंडावर नबाबानें आपला जांवई व पुतण्या सय्यद अहमदखान यास ठेवून त्याच्या मदतीस मिरझा रेजाखान, अल्ला यारखान, राजा सुंदरसिंग, राजा कंकरखान व दुसरेही कांहीं जोरदार व शूर सरदार मुद्दाम देऊन मराठ्यांच्या हल्ल्यास तोंड देण्यास पुरेशी मजबुती येथें केली होती. उमरखान नबाबाच्या झेंड्याच्या हत्तीवर होता. त्याचे चार मुलगे – असलत दिलेर, अहमद व महमदखान हे व शेदीन महमद दुसरे बाजूस संरक्षणास ठेवले. सर्वांच्या मध्यभागीं नबाबाचा हत्ती होता. त्याच्या समोर अफगाणांचें सैन्य पुढीलप्रमाणें होतें:— अफगाणांची तयार फौज ३० हजार होती. त्याशिवाय बक्षिबवालियाचें लष्कर होतें. हयातखान या प्रसिद्ध अफगाण सरदारास तोफखान्यासह नदीच्या कांठावर डाव्या बाजूस ठेवलें होतें, व तोफांचा मारा खुद्द नबाबावर करण्यास त्यास हुकूम होता. बाकीचें सैन्य पश्चिम बाजूस नदीकांठीं होतें. मराठे वर लिहिल्याप्रमाणें या सैन्यास कोन करून आडवे म्हणजे अलीवर्दीच्या डावे बाजूस पसरले होते. अशा प्रकारें अलीवर्दीखान हा या दोन शत्रुसैन्यांच्या बेचक्यांत होता. दोन्ही बाजूंनीं एकदम तोंड लागलें व घनचक्कर लढाई चालू झाली, परंतु फार वेळ झाला नाहीं तोंच अलीवर्दीच्या

तोफखान्यांतून एक गोळा सरदारखानास लागून त्याच्या डोक्याच्या व शरिराच्या चिंधड्या झाल्या ! समशेरखानापेक्षांही हा सरदार शूर होता, व त्याचेंच सैन्य बरेंच मोठें होतें. हा पडल्यामुळें त्याचें सैन्य पांगूं लागलें. या सैन्यावर हैदरखानाच्या पायदळानें मोठा हल्ला चढविला व जोराचा बंदुकींचा मारा केला. आकाश धुरानें धुंद होऊन शत्रुमित्र ओळखेना. अलीवर्दीनें शहाजहान, यारखान व फकीर उल्ला बेगखान यांस घोडदळाचा हल्ला चढविण्यास हुकूम दिला, परंतु ते हलले नाहींत.

मराठे मोंगली सैन्यांत घुसतात

अशा तऱ्हेनें मोंगली सैन्य अफगाणांशीं लढण्यांत चूर झालेलें पाहून त्यांचें लक्ष दुसरीकडे वेधण्याच्या दृष्टीनें पिछाडीकडून नबाबाची रसद मारून मराठ्यांनीं व मीर हबीबनें नबाबाच्या डावे बाजूवर हल्ला चढविला व ते मोंगली सैन्यास रेंटीत बरेच आंत घुसले. त्यांनीं मोठी हातघाईची लढाई चालू केली. " प्रसंग बिकट आहे, याच वेळीं मदत आली तर बचाव होईल " असे उद्गार शिराज-उद्दौल्यानें नबाबाजवळ काढले. नबाबाचें सर्व लक्ष अफगाणांशीं लढण्यांत व्यग्र झाले होतें. तेव्हां नबाबानें रागानें व तिरस्कारानेंच उत्तर दिलें " मराठ्यांची व मीर हबीबची काय परवा आहे, सध्यांच्या घटकेस प्रथम मला या अफगाणांचा निकाल करूं दे. मराठ्यांचा व मीर हबीबचा समाचार मागून घेतां येईल " इतकें सिराजउद्दौल्याला सांगून अफगाणांवर फिरून जोराचा हल्ला करण्यास फकीरउल्लाबेगला हुकूम दिला. रहीमखान, दोस्तमहमद व मीरकासीम यांनीं सर्वांनीं एकदम हल्ला चढविण्यास नबाबाकडून हुकूम मागितला. तो हुकूम देतांना नबाबानें एकदम फार पुढें न जाण्याचा त्यांस इशारा दिला होता. सर्वांचा हल्ला एकदम अफगाणांवर झाला व त्यांच्या मदतीस स्वतः नबाबही गेला. त्या वेळीं हातघाईची लढाई सुरू झाली. थोडक्याच वेळांत तेथें रक्ताचा चिखल झाला !

१० मराठे पुरून उरतात

अफगाणांचा मोड पण मराठे स्वस्थ वसूं देईनात

मुस्ताफाखानाचा जांवई मुराद शेरखान हा हत्तीवर होता व त्यास गोळी लागून तो जखमी झाला होता हें पाहून दोस्त महमदनें आपला हत्ती त्याचे हत्तीस भिडविला व त्याचेवर चढून मुराद शेरखानाचें शिर कापून आणून नबाबाकडे नेलें ! समशेरखानही जखमी झाला होता. दिलेरखानाच्या सैन्यांतील एका जीवबेग नांवाच्या लढवय्यानें समशेरखानाचें शिर कापून तेंही नबाबाकडे नेलें ! नबाबानें जयसूचक वाद्यें वाजवून एकदम सर्व बाजूंनीं अफगाणांवर हल्ला चढविला. इकडे हा वेळपर्यंत नबाबाच्या सैन्यांत मराठे बरेच आंत शिरले होते, परंतु शत्रूच्या सैन्यांत अशा तऱ्हेनें आंत शिरण्यासही मर्यादा असते व त्यासही मागील बाजूकडून

मदतीची अपेक्षा त्याच वेळीं असते. या वेळपर्यंत अफगाणांचे दोन तीन मुख्य सरदार मारले गेल्यामुळें, त्यांच्यांत अव्यवस्था माजून त्यांची पिछेहाट सुरू झाली होती व मराठ्यांच्या हल्ल्यानें स्वतःचें नुकसान झालें तरी पतकरलें परंतु त्या अफगाणांचा नायनाट ताबडतोब करण्याचा चंग नबाबानें बांधल्यानें त्यानें आपली सर्व शक्ति अफगाणांवरच लावली व तो अफगाण सैन्यांत घुसून त्यांचा त्यानें पिछा पुरविला व सेनापतीच्या अभावीं, व मजबूत संघटनेच्या अभावीं ३० हजारांच्यावर असलेल्या त्या अफगाण सैन्याचा या राणी चौक (राणी सराई) गांवच्या लढाईंत पूर्ण पराजय झाला. अफगाणांचे सरदार पडेपर्यंत व त्यांनीं पिछेहाट घेण्यास सुरवात करीपर्यंत मराठ्यांनीं ठरल्याप्रमणें आपल्या बाजूनें लढण्याची शिकस्त केली, परंतु अफगाण पळून जाऊं लागलेले पाहून, जानोजी व मीर हबीबनें धूर्तपणें आपल्या सैन्यास पिछेहाटीचा हुकूम दिला व आपलें सर्व सैन्य सुरक्षित जागीं नेलें. इकडे नबाबानें अफगाणांचा मोड करून आपलें निशाण तेथें रोविलें (ता. १६ एप्रिल १७४८) !

नबाबाची मुलगी (झैनुद्दीनची बायको) व नातू, नाती वगैरे अफगाणांच्या अत्यंत जाचांत खितपत पडल्या होत्या, त्यांस नबाबानें सोडविलें. तेव्हां त्यांना आनंदाचें भरतें आलें व स्वतःचा पुनर्जन्म झाल्यासारखें वाटलें !

जानोजी व मीर हबीबनें माघार घेऊन मुर्शिदाबादेवर चाल केली, परंतु जानोजीची आई नागपुरास आजारी असल्याची बातमी आल्यानें कांहीं मराठी फौज मागें ठेवून तो नागपुरास आला. मीर हबीबनें आपला तळ मिदनापूर येथें दिला. जानोजी परत गेल्यावर रघूजीनें धाकटा मुलगा साबाजी यास सैन्यासह बंगालमध्यें पाठविलें.

इकडे नबाबाचा जय होऊन तो परत मुर्शिदाबादेस आला. त्यानें बरेंचसें सैन्य कमी केलें. तो स्वतःला व राहिलेल्या सैन्यास विश्रांति देत बसला, परंतु मराठे व मीर हबीब त्यास स्वस्थ बसूं देईनात (ता. ३० नोवेंबर सन १७४८), म्हणून फिरून सैन्य जमविण्यास त्यानें सुरवात केली व तो कटव्यास आला. त्यानें बहादुर अल्लीखानाजवळ ७।८ हजार सैन्य व तोफखाना देऊन त्यास बरद्वान येथें पाठविलें.

खास नबाबाचा हुकूम सैन्य मानीना

नबाबही मागोमाग आला. त्यानें बहादुर अल्लीखानास मिदनापुरास जाण्यास हुकूम दिला. थोडी वाट चालल्यावर त्याचें सैन्य पुढें जाईना ! त्यांनीं पगाराची थकलेली बाकी मागितली. नबाबानें गुलाम अल्लीखानास व मिरझा हकीम बेगला सैन्याची समजूत पाडण्यास पाठविलें. त्यांनीं पुष्कळ खटपट केली परंतु उपयोग झाला नाहीं. तेव्हां नबाब स्वतः आला व त्यानेंही पुष्कळ प्रयत्न केला. " तुमच्यापैकीं कोणाही सरदारास मी पत्र देतों. त्यानें तें पत्र खजीनदारास द्यावें

म्हणजे पैसे मिळतील " असें सैन्यास त्यानें कळविलें. नबाबाचा खुनशी स्वभाव या लोकांना माहीत होता. हा केव्हां कोणच्या रस्त्यानें विश्वासघात करून सूड उगवील याचा नेम नसल्यानें व जर आमच्या सरदारांपैकीं कोणासही पत्र देण्यास व पैसे खजिन्यांतून आणण्यास सांगत आहे तर तो स्वतः कोणा सरदारास पाठवून रुपये कां मागवून घेत नाहीं वगैरे शंका त्या लोकांना येणें स्वाभाविक होतें, म्हणून ते लोक प्रत्यक्ष पैसे हातीं आल्याशिवाय पुढें कूच करण्याचें कबूल करीनात. सर्व पैसे रोख तेथेंच मिळाले पाहिजेत असा ते हट्ट घेऊन बसले. नबाबास पुढें आढळून आलें कीं, बहादुरशहाच्या रिसाल्यांत मीर अबदुल अली नांवाचा सरदार सर्वांना फितूर करीत होता. जें सैन्य नबाबांबरोबर येण्यास कबूल होतें तेवढ्यांना घेऊन तो मिदनापुराकडे निघाला व बाकीच्या सर्वांना त्यानें कामावरून काढून टाकलें. अर्थात् पैसे न मिळतांच त्यांना घरीं जावें लागलें !

मिद्नापूरजंगलांत लढाई

मीरहबीबास, नबाब त्याच्यावर येतो, अशी बातमी लागल्यावर त्यानें स्वतांची छावणी जाळून टाकली व जंगलांत लपून राहिला. नबाबानें मिदनापूर गांवांत तळ न देतां कोसाई नदी ओलांडून पलीकडे छावणी ठोकली. नबाबानें मीरकासीम व दोस्त महंमद व आणखी कांहीं सरदार यांना मराठ्यांवर पाठविलें. एक रात्र वाट चालल्यावर त्यांना मराठे दिसले. तेथें दोन्ही पक्षांचें जंगी युद्ध झालें. दोन्ही पक्ष शर्तीनें लढले. मराठे लोकांनीं कटकच्या बाजूस माघार घेतली. नबाब त्यांच्या मागोमागच होता. त्यानें बालासोर येथें छावणी केली. तेथें त्यास समजलें कीं, मीरहबीब, साबाजी हे दाट जंगलांत लपून आहेत. नबाब बालासोरवरून भद्रक हाजीपूरच्या पुढें गेला व कटकच्या अलीकडे १८ कोसांवर बारा गांवाजवळ त्यानें छावणी केली. कटकच्या बाराबटी किल्ल्यांत शिरन्दाजखान, सय्यदनूरखान व धरमदास असे मीरहबीब व भोंसल्यांतर्फे अधिकारी होते. त्यांनीं प्राणहानि वांचविण्याकरितां नबाबास शरण आल्याचें आगाऊच कळवून ठेवलें, परंतु नबाबानें बाराबटी किल्ल्यापेक्षां मीरहबीबास जंगलांतून हुडकून काढून पकडण्याचें ठरविलें व तो त्याच्या शोधास निघाला. मीरहबीब रोज थोडथोडा मागें हटत जंगलांत शिरत चालला व नबाब पुढें पुढें जंगलाच्या आंत घुसत चालला. होतां होतां तो इतका पुढें गेला कीं, सामानसुमानाचे गाडे बरेच मागें राहून चुकामूक झाली. कदाचित् ही ताटातूट मराठ्यांच्या हालचालीमुळेंच झाली असेल. त्यामुळें नबाबाच्या बरोबरच्या लोकांस खाण्यापिण्याची पंचाईत पडली ! त्या जंगलांत झाडें इतकीं उंच होतीं व झाडी इतकी दाट होती कीं, नबाबाचें जें सैन्य आंत घुसलें होतें त्या सैन्याची व नबाबाचीच पुढें चुकामूक झाली ! एकमेकांपासून ते किती अंतरावर कोणच्या बाजूस होते हें एकमेकांस समजेना. त्यामुळें पुढें जावें कोठें, हें

समजेनासें झालें व खुद्द नबाब एके जागीं अडकून राहिल्यासारखा झाला. तेव्हां त्यानें त्यांच्याजवळ जे कोणी लोक होते त्यांना चारी बाजूंस जाऊन मोठमोठीं रणवाद्यें जोरांत वाजविण्याचा हुकूम दिला. त्या युक्तीनें आवाजावरून त्याचे बरेच लोक एकत्र जमले. इतके पाठलाग करीत ते जंगलांत घुसले होते तरी त्यांना मीरहबीब व साबाजी प्रत्यक्ष कोठें होते, याचा थांग लागला नाहीं. तेव्हां तेथें थोडे लोक ठेवून बरोबर २ हजार लोक घेऊन नबाब कटकवर चाल करून गेला.

सिराज विश्वासघात करतो – नबाब कटक सर करतो

सबंध रात्र वाट चालून दुसऱ्या दिवशीं (ता. १७ मे सन १७४९) दोन प्रहरीं १२ वाजतां नबाबानें महानदी ओलांडली, व तो एकदम बाराबटी किल्ल्याच्या तटाशीं येऊन उभा राहिला ! १८ तास सारखी वाट चालल्यानें त्याच्या बरोबर ३०० लोकांपेक्षां जास्त लोक येऊं शकले नाहींत. त्या लोकांची इतकी भयंकर अवस्था झाली होती कीं, त्यांना नुसतें उभें राहण्याचीही ताकद नव्हती. अलीवर्दीसारख्या नबाबानें आपल्या सैन्याच्या सोशिकपणाचा अंत पहावा याचें आश्चर्य लेखकानें प्रगट केलें आहे ! परंतु मीर हबीबची मदत किल्ल्यांतील लोकांस मिळण्यापूर्वी किल्ला ताब्यांत घेण्याची नबाबाची तांतडी याच्या मुळाशीं होती. नबाबाचें नशीब बलवत्तर म्हणून नबाब स्वतः बरोबर असल्यानें जरी नबाबाचें सैन्य अगदीं थोडें होतें तरी तें पुष्कळ असावें अशी किल्ल्यांतील लोकांचो समज झाली. सय्यद नूरखान व धरमदास हे किल्ल्यांतील अधिकारी अलीवर्दीखानाकडे त्यानीं किल्ला खालीं करून देण्याची कबुली दिली होती त्याप्रमाणें आले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सूर्योदयाबरोबर शिरन्दाडखानानें किल्ला खालीं करून नबाबाच्या छावणींत यावें, तसें न झाल्यास सध्यां आपण होऊन आलेले, सय्यदनूरखान व धरमदास यांस ठार केलें जाईल असें ठरलें, व या कामावर शिराजउद्दौल्याची नेमणूक झाली. ठरल्याप्रमाणें सकाळीं शिरन्दाडखान नबाबाकडे आला, परंतु घोड्यावरून उतरतांच शिराजनें त्यावर तुटून पडण्यास हुकूम केला. तेव्हां मरायचेंच तर शत्रूला चार हात दाखवून मरावें म्हणून त्या सरदारानें आपली तरवार चालविली व तो थेट नबाबावर चालून गेला. परंतु त्याचा हात तुटला, व सर्वांनीं त्यावर एकदम हल्ला करून त्यास ठार केलें. सय्यदनूरखान व धरमदास यांस किशवरखानाच्या ताब्यांत दिलें होतें. त्यांनीं त्या दोघांस एकदम कैद केलें. ही बातमी किल्ल्यावर गेल्यानें तेथील शिबंदींनीं किल्ल्याचे दरवाजे बंद केले. नबाबानें मिरजाफरखान, फकीरअलीबेग, व दुर्लभराम यांस किल्ल्यास वेढा देण्यास सांगून नबाब कटक शहरांत शिरला (ता. १८ मे सन १७४९). [दोन नद्यांच्या बेचक्यांत संरक्षक व मोऱ्याची जागा पाहून केशरी वंशांतील नृपकसरीनें (सन ९२२-९३५) कटक ही राजधानी वसाविली].

बाराबटी किल्ल्यांत अधिकारी लोक नसतांनाही नुसत्या शिबंदींतील लोकांनीं किल्ला १५ दिवस लढविला ! परंतु यापुढें टिकाव धरणें व्यर्थ आहे असें समजून मिरजाफरखान व दुर्लभरामाकडून कोणासही इजा होऊं न देतां बाहेर जाऊं देण्याच्या अटीवर त्यांनीं किल्ला खालीं केला, व नबाबानें या प्रसिद्ध बाराबटी किल्ल्यांत मोठ्या इतमामानें व थाटानें प्रवेश केला (केशरी वंशांतील मत्स्य केसरीनें हा किल्ला १००० एक हजार वर्षांपूर्वीं बांधला आहे). हा किल्ला " बाराबटी " नांवानें प्रसिद्ध आहे. तो महानदी व कडजुडी या नद्यांच्या बेचक्यांत आहे. किल्ल्याचें काम पक्क्या दगडचुन्याचें होतें व भोंवतालीं पक्क्या दगडचुन्यानें बांधलेला रुंद खंदक अद्यापही आहे. पावसाळ्यांत दोन्ही नद्या तुफान वाढल्या म्हणजे कटकच्या महानदीच्या बाजूस ७५ फूट पाणी असतें व कडजुडीच्या बाजूस २८ फूट पाणी असतें. कटक शहराला पावसाळ्यांत नेहमींच धोका असतो म्हणून गांवाच्या दोन्हीं बाजूंस तितक्या उंचीचे धक्के बांधले आहेत (हे धक्के अथवा तट केशरी वंशांतील मरकत केसरीनें आपल्या कारकीर्दींत बांधले सन ९३५–९५१).

नबाबाच्या लष्करांत लायक अधिकाऱ्यांचा दुष्काळ

पावसाळ्यांत या देशांत राहणें धोक्याचें असतें, हें लक्षांत असल्यानें नबाबास राजधानी मुर्शिदाबादेकडे फिरावयाचें होतें. परंतु कटकच्या बंदोबस्तास कोणी लायक मनुष्यच मिळेना. त्याचप्रमाणें मराठे आसपास दबा धरून असल्याचें त्यास माहीत होतें. त्यानें कांहीं वरच्या दरज्याच्या लोकांस कटकची किल्लेदारी पतकरण्यास विचारलें, परंतु एकही मनुष्य तयार होईना. शेवटीं अगदीं खालच्या थरांतल्यापैकीं अबदुलसुभान नांवाच्या एका साधारण मनुष्यानें किल्लेदारी पतकरली. तें काम त्यास देऊन नबाब तावडतोब परत फिरला. आपल्या आजन्मांत कटकची किल्लेदारी मिळेल अशी कल्पनाही अबदुलसुभानच्या मनास शिवली नव्हती व म्हणून ही कांहींतरी आपल्यावर परमेश्वरी कृपा आहे असें समजून तो किल्लेदारी करूं लागला.

ओढिसांतील नद्या नबाबानें कशा ओलांडल्या ?

ज्या ओढिसा प्रांतांत नबाबाच्या व मराठ्यांच्या या चकमकी व लढाया चालू होत्या, तो ओढिसा प्रांत म्हणजे बंगालच्या उपसागराचा पश्चिम किनारा होय. कटकपासून तो मिदनापूरपर्यंतच्या या ओढिसा प्रांतांतून लहानमोठ्या अशा २० नद्या या बाजूनें बंगालच्या उपसागरास मिळतात. पैकीं ९।१० नद्या पाव मैलापासून दीड मैल रुंदीच्या आहेत. या प्रांतांतून लष्करी हालचाली व त्याही पावसाळ्यांत व त्या ऐतिहासिक कालांत करणें किती धोक्याचें व अनिश्चित होत असेल याची कल्पना वरील नद्यांच्या रुंदी लक्षांत घेतल्यास बरोबर होईल.

या बाजूस वैशाखज्येष्ठापासून वादळांना सुरवात होऊन रोज एकदोन सरी यावयाच्याच व नद्यांना पाणी जरी फार नसलें तरी पाण्याला ओढ फारच असते व वरील प्रसंगीं नबाबास पावसाळ्याच्या आरंभीं या प्रांतांतून बरद्वानकडे येतांना व या नद्या ओलांडतांना त्याची कशी तिरपीट उडाली हें पुढील हकीगतीवरून दिसून येईल.

कटकची व्यवस्था करतां करतां नबाबास कटकहून परत फिरण्यास आषाढ मास उजाडला व वरील एकेक नदी ओलांडतांना कित्येक जनावरें, माणसें व सामानसुमान वाहून जाई! शेरे मुताखरीन या ग्रंथाचा लेखक गुलाम हुसेन अल्लीखान याचा मुलगा युसफअल्ली हा या प्रसंगीं अलीवर्दीखानाबरोबर होता. त्यानें तम्हान (हें ब्राम्हणी नदीचें नांव असावें) नदी ओलांडतांना काय काय त्रास सोसावा लागला याचें शब्दचित्र लिहून ठेवलें आहे. नदी उतरून जाण्याचे सर्व उपाय हरले. तेव्हां लोहाराचा भाता जसा हवेनें तात्पुरता फुगवितात त्याप्रमाणें हवा भरून मोठमोठे चमड्याचे फुगे करून त्यांवर काठ्या, बास, झाडांच्या फांद्या बांधून किती कष्टानें अलीवर्दीखान व त्याचे लोक ती नदी उतरून आले तें त्यानें लिहून ठेवलें आहे. इतरही जे लोक या वेळीं त्या सैन्यांत होते त्यांच्यापैकीं कांहींच्या तोंडूनही शेरे मुताखरीनच्या लेखकानें या हकीगती ऐकल्या आहेत. मिदनापूरजवळच्या कोसाई नदीपर्यंत प्रत्येक नदी ओलांडतांना शेंकडों लोक व जनावरें मेलीं, वाहून गेलीं, सामान सुमानाचें नुकसान झालें त्याची गणतीच नव्हती! कोसाई नदी खोल व तिला ओढ अतिशय, त्यामुळें येथेंतर फार भयंकरच नुकसान झालें. दुसरी नमूद करण्यासारखी यासंबंधीं गोष्ट म्हणजे पावसाळ्यांत या प्रदेशांत जमीन अतिशय घसरडी व तीही दलदलीची, त्यामुळें जनावरांना व सैन्याला जो त्रास सोसावा लागला तो वर्णन करणें कठीण आहे, असें लेखकानें लिहून ठेवलें आहे. नबाबानें कटकहून निघण्यास आणखी उशीर केला असता तर तो मुर्शिदाबादेस केव्हां पोंचता कोण जाणे? शेरे मुताखरीनच्या लेखकानें या प्रांतांतील नद्या उतरतांना नबाबास येणाऱ्या अडचणींचा जो येवढा पाढा वाचला, त्या सर्व अडचणी या नद्या ओलांडतांना भोंसल्यांच्या सैन्याच्या ज्या हालचाली सारख्या होत होत्या त्यांनाही येतच असल्या पाहिजेत.

+ टीपः— कटकपासून मिदनापूरपर्यंतच्या दोनशें अडीचशें मैलांच्या टापूंतील कांहीं मोठ्या नद्यांचीं नांवें व त्यांच्या रुंद्याः— कुवाखाई पाऊण मैल, कडजुडी अर्धा मैल, महानदी दीड मैल, विरूपा पाव मैल, ब्राम्हणी अंदाज एक मैल, वैतरणी अर्धा मैल, सुवर्णरेखा पाव मैल, कोसाई अर्धा मैल. याशिवाय आणखी खरकाई, दुधाई, साळंदी, गुडीखाल, नतीबा, जुडी, बराबलंग इत्यादि लहान लहान १०।१२ नद्या याच भागांत आहेत.

त्यांतून ते कसे पार पडत असत, हें त्या मराठ्यांपैकीं कोणीं लिहून ठेवलेलें उपलब्ध नाहीं. तरीपण मोंगली सैन्यापेक्षां मराठी सैन्याच्या हालचाली पावसाळ्यांतही त्या मानानें जलदच होत असत. तेव्हां मराठ्यांचा याही प्रकरणीं दर्जा दाखवितांना या गोष्टीही विचारांत घेतल्या पाहिजेत.

कटक फिरून मराठ्यांच्या हातांत

इकडे नबाबानें कटक सोडलें तेव्हां मराठे आसपास दबा धरून असल्याचें लिहिलेंच आहे. अलीवर्दी तेथून निघून जाण्याचीच ते वाट पहात होते. पांच दिवसांतच मराठे कटकवर चालून आले. अबदुल सुभान थोड्या लोकांनिशीं त्यांच्याशीं लढण्यास उभा राहिला. लढाई म्हणजे काय व किल्ला लढविणें म्हणजे काय, त्या करितां काय काय योजना केल्या पाहिजेत यांसंबंधीं त्यास कांहींच शिक्षण मिळालें नव्हतें. बाराबटीसारख्या किल्ल्याची फौजदारी पतकरण्यास अलीवर्दीच्या सैन्यांत कोणीच तयार होईना, परंतु अबदुल सुभाननें अंगावर येणाऱ्या जबाबदारीचा कांहींच विचार न करितां "मी कबूल आहें" म्हटल्याबरोबर हें फौजदारीचें घोंगडें याच्या गळ्यांत अडकवून नबाब तांतडीनें परत फिरला, परंतु बिचाऱ्या अबदुल सुभाननें मिळालेली फौजदारी आठवडाभरही भोगली नसेल. नबाब बालासोरपर्यंत जातो न जातो तोंच "अबदुल सुभानला ६ जखमा झाल्या, त्याचा एक हात तुटला व मराठ्यांनीं त्याला कैदही केलें. बाराबटी किल्ला घेतला व कटकही मराठ्यांनीं फिरून सर केलें"! या बातम्या नबाबाच्या कानावर आल्या. आपल्या अधिकाऱ्याचा पराभव म्हणजे आपला पराभव व तोही मराठ्यांनीं केलेला म्हणजे तो आपला अपमान होय. यामुळें नबाबास अत्यंत खेद झाला व त्वेषही आला परंतु करतो काय? परंतु आंतल्या आंत दांत ओंठ खाऊन चुप्पच बसावें लागलें. त्यानें इतक्या श्रमानें मिळविलेलें कटक आठ दिवसांत परत मराठ्यांच्या हातीं गेलें! तेथून कटक इतकें जवळ असूनही वर लिहिलेल्या नद्यानाल्यांच्या अडचणीमुळें त्या पावसाळ्यांत परत फिरणें शक्यच नव्हतें. याबद्दलचा सूड पुढें घेण्याचा विचार ठरवून पुढचा मार्ग काढीत तो मिदनापूरपर्यंत कसा आला असावा हें वर लिहिलेंच आहे. तेथून झालेल्या भयंकर नुकसानीबद्दल तो अत्यंत कष्टी होऊन कसाबसा कटव्यापर्यंत पोहोंचला! तेथें नावांच्या पुलाची व्यवस्था करून ठेवली होती. त्यावरून अजय व गंगा नदी उतरून नबाबानें मोतिजिल नांवाचा राजवाडा बांधला होता, तेथें तो आला (जुलई सन १७४९). या ठिकाणीं त्याचा जांवई व पुतण्या नवाजिस महमदखान, हुसेन कुलीखान व इतर मोठमोठे अधिकारी भेटण्यास आले. या ठिकाणीं वीरुदत्त नांवाच्या एका हुशार हिंदूस त्यानें रामनारायण असा किताब देऊन त्यास आपल्या फडनिशीचे सर्वाधिकार दिले. हा मनुष्य पुढें बिहारच्या राजकारणांत फार प्रख्यातीस आला.

बंगाल, बिहार, ओढिसाची नबाबी-वारसदारांत भांडण

पाटण्याचा सुभेदार झैनुद्दीन अहमद यास बंडखोर अफगाणांनीं मारून टाकला, परंतु पुढें नबाबानें त्यांचा मोड केल्यावर पाटण्याची सुभेदारी नबाबानें त्याचा दुसरा पुतण्या व जांवई सय्यद अहमदखान यास देण्याचें ठरविलें. त्यामुळें त्याच्या घरांत भांडणें सुरू झालीं. कारण पाटण्याची सुभेदारी मिळणें म्हणजे अलीवर्दीखानानंतर बंगाल, बिहार व ओढिसाची नबाबी मिळण्याचा हक्क मिळणें असा त्याचा अर्थ असे. त्यामुळें पाटण्याची सुभेदारी सय्यद अहमदखानास मिळण्याचें ठरल्याबरोबर झैनुद्दीन अहमदचा मुलगा शिराजउद्दौला यानें आकाश-पाताळ एक केलें. शिराज हा नबाबाचा अत्यंत लाडका नातू होता. त्यास तो अगदीं जीव कीं प्राण करी. वरील कारणामुळें शिराज रागावला, रुसला. पळून जाण्याचा धाकच न घालतां खरोखरीच नबाबापासून तो पाटण्यास पळून गेला. नबाबानें त्याची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. " माझ्या मागून बंगालबिहार-ओढिसाची मिळून जी मुख्य मुर्शिदाबादची नबाबी ही तुलाच देण्याची व्यवस्था मीं करून ठेविली आहे " वगैरे प्रकारें समजूत घालण्याचे प्रयत्न त्यानें केले. सय्यद अहमदला पाटण्याची सुभेदारी न देतां पूर्णियाची नायब सुभ्याची जागा दिली व नबाबानें शिराजला वचन दिलें व कशीबशी त्याची समजूत केली व यामुळें नबाबास थोडी स्वस्थता लाभली.

नबाबी सैन्याची व्यवस्था !
पटावर १७०० स्वार, प्रत्यक्ष १०० ही नाहींत !

याच सुमारास नबाबाच्या सैन्याच्या हिशेबांत पुष्कळ अफरातफर होत असल्याच्या तक्रारी ख्वाजा अबदुलहद्दीखान व त्याचा सरदार महमद येसोल यांजकडून आल्या. गुलाम हुसेननें या दोघां सरदारांस नबाबाकडे नेलें. त्यांनीं सैन्याच्या हिशेबांत काय काय अंदाधुंदी चालू आहे त्याची माहिती नबाबास करून दिली. ती थोडक्यांत अशी कीं, ज्या ठिकाणीं पटावर एक हजार सैन्य लिहिलें असतें त्या ठिकाणीं प्रत्यक्ष शंभरही माणसें हजर नसतात, व याच प्रमाणांत घोडीं, त्यांचें सामान, खाणें, दाणा, वैरण याचा खर्च दाखविला जातो, परंतु प्रत्यक्ष कांहीं नाहीं ! ही सर्व रकम प्रत्यक्ष अधिकारीच खातात ! अलीवर्दीखानास या अंदाधुंदीचा अत्यंत राग आला. त्यानें मुख्य बक्षी, खजीनदार, फडणीस व त्या त्या सैन्यांचे अधिकारी यांस समोर बोलाविलें. ज्या अधिकाऱ्याजवळ पटावर १७०० स्वार होते, त्याजवळ प्रत्यक्ष ८० घोडे व स्वारही दाखविण्यास नव्हते ! या गोष्टी उघडकीस आणणाऱ्या वरील दोघां सरदारांना नबाबानें बक्षिसें दिलीं. सर्व सैन्याच्या हिशेबांत वरीलप्रमाणें चालू असलेली अंदाधुंदी पाहून नबाबाचें मन व्यग्र झालें.

मराठे फिरून मुर्शिदाबादेवर येतात

इतक्यांत मराठे मोठमोठ्या मजला मारीत फिरून मुर्शिदाबादेवर येत असलेले नबाबास समजलें. मुर्शिदाबादेंतील अधिकाऱ्यांवरील त्याचा विश्वास आतां अजीबात उडून गेला होता, म्हणून तो स्वतः मिदनापुराहून बरद्वानला आला. मराठे मुर्शिदाबादेच्या पश्चिमेस होते. नबाब त्यांच्या मागें लागला, परंतु ते प्रत्यक्ष कोठें आहेत याचा त्यास थांग लागेना. तेथील एका जमीनदारानें मराठ्यांना पकडून देतों म्हणून नबाबासही एका मोठ्या जंगलांत बरेंच आंत नेलें तीन दिवस नबाब सैन्यासह त्या जंगलांत इतस्ततः भटकत होता, परंतु त्यास एकही मराठा कोठें दिसला नाहीं. तेव्हां नबाब आपणास शिक्षा करील या भयानें आपणच स्वतःस मारून घेण्याच्या इरादानें त्या जमीनदारानें स्वतःवर सुरी मारून घेतली! नबाबही त्या जंगलांत अत्यंत त्रस्त झाला होता व म्हणून नाइलाजानें तो मागें फिरला व बरद्वानच्या राजाचा दिवाण माणिकचंद याच्या बगीच्यांत त्यानें मुक्काम केला. या सुंदर व रम्य स्थळीं कांहीं दिवस विश्रांति घेत राहण्याचा त्यानें बेत केला पण (एप्रिल सन १७५०)?

नबाबाच्या नशीबीं विश्रांति नव्हती

या विश्रांतीच्या काळांत सैन्याच्या हिशेबांत जी अंदाधुंदी दिसून आली तिची सर्व जबाबदारी त्यानें मिरजाफरखानावर ठेवली. कारण तो त्या सर्वांवर बक्षी होता (पेमास्तर जनरल). मिरजाफरास त्यानें बोलावून घेऊन त्याची निर्भत्सना करून वरील खर्चाच्या अंदाधुंदीचा जाब विचारला. त्याचाच भाऊ मीर इस्मायल त्याच्या हाताखालीं होता, त्यास एकदम नबाबानें कामावरून काढून टाकलें व त्याच्या जागीं ख्वाजा हडीखानास नेमलें. या वेळीं फिरून त्यास बातमी आली कीं, मराठे मिदनापुरावर चाल करून आले. तेथील फौजदार हैदरअल्लीखान त्यांना तोंड देण्यास समर्थ नाहीं, हें पाहून नबाब स्वतः तिकडे जाण्यास निघाला. पावसाळा जवळ आला होता. तेव्हां एका बाजूस ओढिसा व एका बाजूस कटवा–मुर्शिदाबाद यांच्या मध्यावर पावसाळा काढण्याच्या इरादानें त्यानें तेथील किल्ल्याची दुरुस्ती करून तेथेंच मुक्काम केला. मराठ्यांचा थांग त्यास कोठेंच लागेना. तेव्हां सैन्यास झोंपड्या करून तेथेंच राहण्यास त्यानें हुकूम दिला व आपलाही जनानखाना मुर्शिदाबादेहून मिदनापुरास बोलावला. त्याचें सैन्य व सरदार महिनेच्या महिने बाहेर असल्यानें निदान पावसाळ्यांततरी आपापल्या घरीं राहण्यास जाण्याची त्यांची इच्छा होती, परंतु नबाबाच्या हुकुमाप्रमाणें तात्पुरती सोय करून त्यांना तेथेंच राहणें भाग पडलें.

नबाब या ठिकाणीं विश्रांतीकरितां राहिला होता परंतु त्याच्या नशिबीं विश्रांति नव्हती. एकाएकीं बातमी आली कीं, शिराजउद्दौला * लुत्फन्निसा नांवाच्या लावण्यवान् व त्याच्या प्रेमपाशांत असलेल्या मुलीस घेऊन पाटण्यास जाण्यास निघाला ! शिराज म्हणजे नबाबाचा जीव कीं प्राण असा लाडका नातू होता. हें कृत्य नबाबाच्या इच्छेविरुद्ध झालें असावें. कारण त्यास परत आणण्याचे सर्व प्रयत्न हरले असें नबाबास समजलें. तेव्हां तो स्वतःच त्यास आणण्यास निघाला. कारण " माझ्या मागें लागाल तर मी प्राण देईन " असले जबाब त्यानें नवाजिस महंमदखानासारख्यास दिल्याचें नबाबास समजलें. सैन्याचे अधिकार मिरजाफरास व दुर्लभरामास दिले. मुर्शिदाबादेस फक्त एकच दिवस थांबून नबाब पाटण्यास जाण्यास निघाला. स्वतःस येऊन भेटण्यास शिराजला पत्रें लिहिलीं. तीं शिराजला भागलपुरास मिळालीं. त्यांचें उत्तर त्यानें दिलें कीं, " तुमची मजवरची ममता ही उगीच वरवरची दिखाऊ आहे. कारण माझ्या प्रतिस्पर्ध्यांना मोठमोठ्या पदव्या तुम्हीं दिल्या. मी बरद्वानवरून मुर्शिदाबादेस आलों तेव्हां माझ्या स्वागतास एकही मनुष्य आला नाहीं, त्यामुळें माझा अपमान झाला आहे ! मी माझ्या वडिलांची जागा घेण्यास जात आहें. " नबाबानें जबाब पाठविला कीं, " नुसती पाटण्याचीच काय, परंतु बंगाल, बिहार व ओढिसाची मिळून मुर्शिदाबादेची नबाबी मी तुला देणार आहें. "

शिराज पाटण्यास आल्यावर मेंदी निसारखानाच्या मदतीनें पाटणा ताब्यांत घेण्याची खटपट त्यानें केली, परंतु पाटण्याचा अधिकारी राय रायन यानें त्याचें चालूं दिलें नाहीं. नबाबानें पाटण्याच्या जवळ बार गांवीं शिराजची भेट घेतली व त्याची कशीबशी समजूत करून त्यास घेऊन तो परत मुर्शिदाबादेस आला.

नबाबाच्या सैन्यांत बेदिली

वाटेंत नबाबास भयंकर तापानें पछाडलें. त्याचें सर्व लक्ष मिदनापूरच्या सैन्याकडे होतें. कारण तेथील एक अधिकारी दुर्लभराम हा भेदरट व दुसरा मुख्य अधिकारी मिरजाफरखान हा अविश्वासी व त्या सैन्यांत बेदिली पसरली होती हें नबाबास माहीत होतें. म्हणून थोडें बरें वाटूं लागल्या-बरोबर तो मिदनापुरास जाण्यास निघाला. मिरजाफर व दुर्लभराम त्यास भेटण्यास बरद्वानपर्यंत मागें आले (दिसेंबर सन १७५०). नबाब मिदनापुरास आल्यावर मराठ्यांची व त्याची लढाई झाली व मराठे पश्चिम बंगालमधील डोंगरांत शिरले.

---

* ही अलीवर्दीखान नबाबाच्या सैन्यांतील मोहनलाल नांवाच्या एका हिंदू सरदाराची बहीण होती. हिचें मूळ नांव माधुरी. परंतु पुढे ' लुत्फन्निसा ' या नांवानें ती प्रसिद्धीस आली. (याबद्दल कलकत्त्याच्या अमृतबझारपत्रिका नांवाच्या इंग्रजी दैनिकांत ता. १२।९।१९३४ च्या अंकांत खुलासा आला आहे.)

रोज मराठ्यांनीं आंत आंत जंगलांत घुसावयाचें व ते सांपडतील म्हणून स्वतः जंगलांत त्यांच्या मागें नबाबानें जावयाचें. रोज नित्य तेंच तेंच काम व फिरून मराठे सांपडावयाचे नाहींतच. तेव्हां कंटाळून हें काम पुढील मोसमावर ढकलून नबाब परत कटव्यास आला (फेब्रुआरी सन १७५१).

दशवार्षिक युद्धांत हरले कोण ? नबाब कीं मराठे ?

अशा तऱ्हेनें अलीवर्दीखानाची व भोंसल्यांची ही चौथाईनिमित्त लढाई १० वर्षें कटक, कटवा, मुर्शिदाबाद, पाटण्यापर्यंतच्या ८०० मैलांच्या प्रदेशांत चालू होती. नबाबाचा सपशेल पराभव करून चौथाई देणें भाग पाडण्याइतकी भोंसल्यांची ताकद नव्हती असें नव्हे, परंतु त्यांचेच दुसरे मराठे भाईबंद त्यांस अडथळा करीत, नबाबास मदत करीत, त्यामुळें त्यांस शक्य झालें नाहीं, परंतु त्यांत हीही गोष्ट खरी होती कीं, भास्करपंडित व त्याच्या बरोबर २१ सरदार व आणखीही त्या १० वर्षांत जें त्यांचें नुकसान झालें त्यामुळें रघूजी भोंसल्यासारखा चिकट व पहिल्या प्रतीचा लढवय्या चौथाईचा हक्क हस्तगत केल्याशिवाय परत जाईल हें शक्यच नव्हतें. शेरे मुताखरीनच्या लेखकानें तहाचें बोलणें करण्यास सुरवात प्रथम मीर हबीबनें केली असें लिहिलें आहे.

हा लढा १० वर्षें चालू होता. नबाब त्यामुळें अत्यंत जिकिरीस आला होता. रयतेचेंही अतोनात नुकसान होत होतें. येवढ्या अवधींत मराठ्यांच्या लढाईच्या विशिष्ट पद्धतीमुळें त्यांची मनुष्यहानि त्या मानानें कमी झाली असली, तर ती, वरील विश्वासघातानें मोठमोठे २२ सेनानी जे कामास आले, त्या भयंकर नुकसानीचा व आघाताचा विचार केला म्हणजे मराठ्यांची एकंदर हानि ही पुष्कळ होती, तरी पण रघूजीनें माघार घेतली नाहीं. तर त्यानें दुप्पट जोरानें पिच्छा पुरवला. नबाबाची दैन्यावस्था पाहून त्याच्या बेगमनें तहाचा प्रयत्न करून पाहिला, हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां अलीवर्दीनें तहाचें बोलणें सुरू केलें नाहीं व तें मीर हबीबनें सुरू केलें, असें शेरे मुताखरीनच्या लेखकानें लिहिलें असलें तरी वरील गोष्टी विचारांत घेतल्या व शेवटीं ठरलेल्या तहांतील कलमें पाहिलीं, म्हणजे नबाबास मराठ्यां-पायीं नाकीं नऊ आले होते, हें नक्की दिसतें. नबाब या वेळीं ७५ वर्षांचा बुड्ढा झाला होता व नुकताच भयंकर तापांतून तो दोनदां उठला होता. त्याच्या घरांत त्याचा नातू शिराज व पुतणे-जांवई नवाजिस महमद व सय्यद अहमद यांच्यांत "मुख्य नबाबी" बद्दल आधींपासूनच भांडणें सुरू होतीं. मिरजाफर व आताउल्लाखानसारखे त्याचे पहिल्या प्रतीचे अधिकारी त्याचा खून करून त्याची नबाबी वांटून घेण्याचे कट करीत होते. नबाबाच्या सैन्याच्या हिशेबांतून पुष्कळ अंदाधुंदी चालू होती. सैन्यांत बेदिली फैलली होती. तेव्हां मराठ्यांचें हें चौथाईप्रकरण कसेंतरी मिटवून टाकावें ही इच्छा व तांतडी रघूजी अगर

मीर हबीबपेक्षां नबाबासच जास्त असावी असें अनुमान निघतें व तहाच्या निकालावरूनही तेंच ठरतें.

११ चौथाईच्या युद्धाचा आढावा

सन १७३९ मध्यें सुजाउद्दीन, नंतर सरफराजखान मुर्शिदाबादचा नबाब झाला. त्यास कट करून मारून अलीवर्दीनें मुर्शिदाबादची गादी बळकावली. तेव्हांपासून मुर्शिदकुलीखान (कटकचा सुभा) व त्याचा हस्तक मीर हबीब याचा पराभव करून त्यांना हैदराबादकडे पिटाळून लावल्यामुळें अलीवर्दीचा सूड घेण्याच्या इराद्यानें मीर हबीबनें नागपुरास रघूजीकडे संधान बांधल्यामुळें व चौथाईच्या निमित्तानें सन १७४२ मध्यें रघूजीनें भास्करपंतास बंगालवर पाठविलें, तेव्हांपासून बंगालमध्यें मराठ्यांशिवाय अगर मराठ्यांच्या मदतीनें लढणारा मीर हबीब व त्यानेंच चिथावून उठविलेले अफगाण यांशिवाय नबाबास दुसरा प्रतिस्पर्धी बंगाल, बिहार व ओढिसांत कोणीच नव्हता व तहाच्या वाटाघाटी सुरू होईपर्यंतच्या एकंदर लढाईचा निकाल म्हणजे मिदनापूरपर्यंत ओढिसाचा भाग मराठ्यांच्या ताब्यांत होताच व ज्या चौथाईकरितां मुख्यतः हा लढा होता तो हक्क नबाबाकडून कबूल करविल्यावरच रघूजी थांबला. शेरे मुताखरीनच्या लेखकानें नबाबाचा जय होत होता असें ठिकठिकाणीं लिहिलें आहे. तरी नबाब मराठ्यांना राज्याच्या हद्दीबाहेर कायमचे हाकलून देऊं शकला नाहीं, इतकेंच नव्हे तर मराठे बंगाल मध्यें वर्षोनवर्ष त्यांच्या छातीवर छावणी करून राहत होते ! नबाबाची राजधानी मुर्शिदाबाद येथून अवघ्या ४०।५० मैलांच्या आंत कटवा गांवासारख्या नाक्याच्या व मान्याच्या जागीं मराठ्यांची मुख्य छावणी असे ! कटवा गांवाजवळ अजय नदी व गंगा नदी यांचा संगम झाला आहे. त्याच्या खालीं गंगेच्या कांठीं ५।६ मैल पर्यंत दाहीहाट* गांवापर्यंत मराठ्यांच्या छावणीचा पसारा पडे. हल्लीं गंगेचा प्रवाह या गांवाला लागून नाहीं. तो अर्धा मैल पुढें सरला आहे. भोसल्यांच्या पहिल्याच स्वारीच्या वेळीं भास्करपंताच्या २० हजार फौजेची छावणी याच ठिकाणीं ६।७ महिने सारखी होती. अशा तऱ्हेनें मराठे नबाबाच्या राजधानीच्या आसपास १० वर्षें वावरत होते. यावरून निर्बल कोण व प्रबल कोण हें वाचकांनीं

* टीपः— बंगाली लोकांचें मुख्य दैवत दुर्गादेवी. हिचा उत्सव फार मोठ्या प्रमाणांत भास्करपंतानें ज्या इमारतींत (ता. २४ सपटंबर सन १७४२ पासून ५ दिवस केला होता परंतु नवमीच्या रात्रीं ता. २७ सपटंबर १७४२ रोजीं नबाबानें दोन्ही नद्या उतरून भास्करपंडितावर हल्ला केला) केला त्या इमारतीचा पडका अवशिष्ट भाग दाहीहाट गांवचे लोक अद्याप तेथें "समाजमंदिर" जवळ दाखवितात.

ठरवावें. तहाच्या वेळीं ताब्यांत असलेला ओडिसाचा भाग मराठ्यांनीं सोडला नाहीं. बंगालच्या चौथाईचे १० लाखांच्या ऐवजीं १२ लाख रुपये ठरून ते वसूल झाल्यावरच रघूजीनें बंगालमधील छावणी उठवली !

अलीवर्दीचा कट्टा दुष्मन मीर हबीब जो १२ वर्षे नबाबाच्या डोळयांत सलत होता, त्याला ओडिसाचा सुभेदार नेमण्यास नबाबानें सम्मति द्यावी. यांतून काय ध्वनि निघतो तो पहा. या पुढील अलीवर्दीची ओडिसावरील नबाबी केवळ नांवाकरितांच राहिली. वसूल व राज्यकारभार वास्तविक मराठ्यांनींच हातीं घेतला व आपल्या विश्वासांतला मीर हबीब यासच पहिला सुभेदार रघूजीनें नेमलें. शेरे मुताखरीनच्या लेखकानें हा तह कसा घडून आला ती हकीकत पुढील प्रमाणें दिली आहे.

शब्दयोजना अलग, निकाल तोच

मीर हबीबनें दोन सरदार मिरजाफरखाकडे पाठविले. त्यानें त्यांना नबाबाकडे नेलें. त्या सरदारांनीं " ओडिसाची सुभेदारी मराठ्यांकडे राहावी व बंगालच्या चौथाईचे १२ लाख रुपये मराठ्यांना दरवर्षीं मिळावे " या दोन गोष्टी मुख्यतः नबाबापुढें मांडल्या. असल्या त्याच्या नांवास कालिमा आणणाऱ्या गोष्टी नबाबानें कबूल केल्या नसत्या, परंतु ७५ वर्षे वयास झालेलीं, प्रकृतीनें खंगलेला, मराठ्यांशीं सारखा १० वर्षे लढत राहिल्यानें त्यास आलेला शीण व त्रास, मुस्ताफाच्या बंडामुळें जांवई मारला जाऊन जरी अफगाणांचा मोड झाला तरी सैन्यांत अफगाणांचा भरणा जास्त होता, त्यामुळें सैन्यांत असलेली बेदिली, व वरील कारणपरंपरेमुळें वर्षांनवर्षे रयतेचें होत असलेलें नुकसान, अद्याप मोकाट सुटलेल्या लहान लहान अफगाण लुटारू टोळयांनीं गंगेच्या दक्षिणेस देशाची, रयतेची, शेतीवाडीची केलेली नासाडी, वरील टोळधाडीनें वस्ती उठून गांवेंच्या गांवें उजाड झालेलीं पाहून नबाबाचें मन उद्विग्न होऊन फिरून ही वस्ती येऊन रयत सुखानें नांदत असलेली पाहण्याची नबाबास आतां झालेली उत्कट इच्छा ! या सर्व कारणांपेक्षां आतां त्यास पूर्ण शांतता पाहिजे होती. त्यामुळें नबाब तहास तयार आहे, हें आलेल्या सरदारांस कळवून त्यांच्याबरोबर नबाबाकडून मीर हुसेनअल्ली व मीर घाऊसअल्ली हे दोघे मीर हबीबकडे आले. मीर हबीबनें मिरझा साले या हुशार मनुष्यास तहाचें बोलणें करण्यास नबाबाकडून आलेल्या सरदाराबरोबर पाठविलें. तो नबाबास कटवा येथें भेटला. " मीर हबीब सांगाल त्या अटी कबूल करण्यास तयार आहे " असें त्यानें कळविलें. तो नबाबाबरोबर मुर्शिदाबादेस गेला व बऱ्याच वाटाघाटी होऊन एकदांचा तह ठरला ! शेरे मुताखरीनमध्यें तहाचीं कलमें पुढीलप्रमाणें आहेत.

" ओडिसाची सुभेदारी मीर हबीबला मिळेल तर तो नबाबाचा नोकर म्हणवून घेऊन तें काम करण्यास तयार आहे. ओडिसाच्या उत्पन्नांतून रघूजी

भोंसल्याच्या सैन्याच्या खर्चाची बाकी देणें देऊन टाकण्याची त्यास परवानगी मिळावी ! याशिवाय नबाबानें आपल्या खजिन्यांतून रघूजी भोंसल्याला १२ लाख रुपये प्रतिवर्षास देत जावे ! मराठ्यांनीं नबाबाच्या हद्दींत शिरूं नये. बालासोर-जवळची सोनामुखी (सुवर्णरेखा) नदी ही नबाबाच्या व मराठ्यांच्या प्रांताची हद्द असावी. "

तहाच्या अटींवरून जरी पाहिलें तरी नागपूरपासून ५०० कोस लांब परमुलखांत, परराष्ट्रांत, सतत १० वर्षें अलीवर्दीखानासारख्या जबरदस्त शत्रूशीं लढून शेवटीं चौथाईचा हक्क शाबीत करून घेऊन, ओढिसा प्रांतही स्वतःच्या अमलाखालीं आणून, रघूजी भोंसल्यानें मराठ्यांच्या दृष्टीनें जें यश मिळविलें त्यांत त्याची करामत, दीर्घोद्योग व अवर्णनीय चिकाटीच दिसून येते. केवळ १० वर्षांच्या अवधींत मराठी साम्राज्याचें टोंक पूर्व समुद्रास भिडवून तेथें भगवा ध्वज उभारण्याचें श्रेय रघूजी भोंसल्यासच आहे.

नबाबाच्या विश्वासघातकीपणाचा परिणाम

अलीवर्दीखानाला स्वतःच्या विश्वासघातकी स्वभावाचा सकृद्दर्शनीं फायदा झाल्यासारखा वाटला असला तरी १० वर्षांच्या आंतच त्याचे दुष्परिणाम त्याला भोगावे लागले. बक्षिसें, आमिषें, वचनें देऊन त्यानें आपल्या विश्वासू हस्तकांकरवीं स्वतःपेक्षां वरचढ शत्रूवर विश्वासघाताचे प्रयोग केले व ते तात्पुरते पचलेही. परंतु दिलेलीं आमिषें, वचनें पुरीं न केल्यानें त्या विश्वासू हस्तकांचाही कित्येकदां त्यानें विश्वासघात व वचनभंग केला. त्याचा परिणाम असा झाला कीं, हेच त्याचे विश्वासू हस्तक शेवटीं त्याच्यावर उलटले. त्यांनीं नबाबावर सूड घेण्याच्या इरायानें शेंकडों खून, जाळपोळ, रयतेची लूटफाट व अनन्वित अत्याचार बंगालबिहारकडे केले व त्याचा प्रत्यक्ष परिणाम त्याच्या रयतेस भोगावा लागला.

बंगाली लोक मराठ्यांवर लूटमारीचे व अत्याचाराचे जे आरोप करतात त्यांपेक्षां, नबाबानें, नबाबाच्या हस्तकांनीं, त्यांच्याच जातभाईंनीं, बंगालबिहार-ओढिसांत केलेले अत्याचार हे शतपट अधिक होते असें विचारी वाचकांच्या लक्षांत येईल.

वरील तह सन १७५१ मध्यें झाल्यावर भोंसल्यांचा अमल ओढिसांत सन १८०३ पर्यंत होता. या त्यांच्या ५२ वर्षांच्या मराठी अमलावर व कारकीर्दीवरही ती अव्यवस्थित व जुलमी होती असे आरोप आहेत परंतु त्यांचा विचार करतांना, तत्पूर्वीचा मुसलमानी अम्मल व नंतरचा ईस्ट इंडिया कंपनीचा अम्मल या दोन्ही अमलांशीं तेथील मराठी अमलाची तुलना तिकडील तत्कालीन इतिहास वाचून केल्यास त्या दोन्ही अमलांपेक्षां ओढिसांतील मराठी अम्मलच तेथील लोकांना चांगला होता असें निःपक्षपाती व विचारी वाचकांच्या लक्षांत येईल.

कालानुक्रमणिका

भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या

पहिल्या रघूजी भोंसल्यांच्या हालचाली

सेनापति भास्करराम कोल्हटकरांच्या हालचाली

इ. स.

१७३८ पहिली स्वारी (उपलब्ध ऐतिहासिक ग्रंथांत न उल्लेखिलेली)

१७४२ दुसरी स्वारी

१७४३ तिसरी स्वारी

१७४४ चवथी स्वारी (भास्करराम कोल्हटकर व त्याचे बावीस सरदार यांचा विश्वासघातानें खून)

१७४८ ते १७५१ पांचवी स्वारी

पहिल्या रघूजीच्या हालचाली

१७४० मे २० – रघूजी अर्काट सर करितो.

१७४० जून अखेर – साताऱ्यास प्रयाण करितो.

१७४१ मार्च तारीख १४ रामनवमी – त्रिचनापल्ली सर करितो.

१७४१ जून – रघूजी साताऱ्यास जातो व तेथें राहातो.

१७४२ सप्टेंबर, ऑक्टोबर, नवंबर अखेर – दक्षिणेंत शिराळयाजवळ उंदरी येथें राहातो. (पे. द. भा. २० पान १९)

१७४२ सप्टेंबर–उंदरीहून देवगडी प्रांतीं जाणार असें नानासाहेब पेशव्यास कळवितो.

१७४३ चे आरंभीं – बंगाल्यांत पराभूत होऊन नागपुरास परत आलेल्या भास्करराम कोल्हटकरास बरोबर घेऊन बंगालकडे जातो.

१७४३ नानासाहेब पेशव्याची व रघूजीची बिहारमध्यें भडोदेंजवळ लढाई.

१७४३ ऑगस्ट–सप्टेंबरमध्यें साताऱ्यास वास्तव्य.

१७४४ आगस्टमध्यें साताऱ्यास वास्तव्य.

सप्टेंबरमध्यें वाठारास वास्तव्य.

१७४५ नागपुराहून कटककडे प्रयाण.

मार्च – कटक हस्तगत करितो.

जून – कटक बरद्वान बाजूकडे चाल.

जुलई – रघूजी (अलीवर्दीखानाविरुद्ध बंड करणाऱ्या) अफगाणास मदत करितो.

ऑक्टोबर – रघूजीची व अलीवर्दीखानाची बिहारमधील महिलीपूर येथें लढाई.

डिसेंबर – मुर्शिदाबाद लुटितो.

डिसेंबर अखेर – राणीबतोष (कटवा मुर्शिदाबादमध्यें) येथें अलीवर्दीखानाशीं लढाई.

१७४६ फेब्रुवारी ९ – पाटण्याहून नागपुरास परत जातो.

सप्टेंबर – साताऱ्यास प्रयाण (पे. द. भा. २० पा. २९)

१७४७ मे – साताऱ्यास वास्तव्य (पे. द. भा. २० पा. ४०)

१७४८ सप्टेंबर – साताऱ्यास जाण्यास निघतो. (पे. द. भा. २० पा. ४१)

सेनापति भास्करराम यांच्या हालचाली

इसवी सन

१७४१ मार्च–चंदासाहेब त्रिचनापल्लीस असतां रघूजी त्यास वेढा घालतो. चंदासाहेबाचा भाऊ बोखान पांच हजार (५०००) स्वार घेऊन त्याचे मदतीस येत असतां त्यास भास्करराम वाटेंत अडवून त्याचा पराभव करतो; व त्यास ठार मारून त्याचें शव रघूजीकडे त्रिचनापल्लीस नेतो. त्रिचनापल्ली सर करून रघूजीनें चंदासाहेबास कैद केल्यावर त्यास भास्करराम वऱ्हाडाकडे नेतो.

१७४२ जानेवारी – बंगालकडे प्रयाण.

मार्च – बरद्वान येथें अलीवर्दीस घेरतो. मोठ्या प्रयासानें अलीवर्दी भास्кररामाचे घेरांतून निसटून कटव्यास पोहोंचतो.

सप्टेंबर पर्यंत कटव्यास (दाहीहाटगांवीं) छावणी करितो व दुर्गापूजेचा उत्सव करितो. अष्टमीच्या रात्रीं गंगा व अजय नदी उतरून अलीवर्दी भास्कररामावर एकाएकीं छापा घालतो.

नोव्हेंबर – भास्करराम छाप्यांतून निसटून मिदनापूरमार्गे नागपुरास परत येतो.

१७४३ आरंभीं – रघूजी व भास्करराम बंगालकडे जाण्यास निघतात.

१७४३ एप्रिल – नानासाहेब पेशवे व रघूजी यांची बिहारमधील भडोदें येथें लढाई.

१७४३ जून – भास्करराम मिदनापूर बाजूनें नागपुरास परत येतो.

१७४४ आरंभीं – शाहूचे हुकुमावरून बंगालवर स्वारी करण्याकरितां रघूजी भास्कररामाची रवानगी करितो.

१७४४ मार्च – एप्रिल – भास्करराम लढाईंत हार जात नाहीं असें पाहून तहाच्या वाटाघाटीकरितां अलीवर्दी भास्कररामास त्याच्या सरदारांसह आपल्या तंबूंत बोलावतो व विश्वासघात करून त्या सर्वांची कत्तल करितो.